
साप्ताहिक २९ जून ८५ / दोन रुपये

# माणूस



साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : पंचविसावे

अंक : पाचवा

¤

२९ जून १९८५

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

¤

साहाय्यक

**दिलीप माजगावकर**

**सौ. निर्मला पुरंदरे**

**मेधा राजहंस**

¤

वार्षिक वर्गणी

**साठ रुपये**

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

**सुरेश नावडकर**

# सप्रेम नमस्कार, माणूस

¤ पंचविसाव्या वर्षारंभानिमित्त आपण केलेले प्रकट निवेदन (१ जून अंक) 'माणूस' च्या वाचकांना विनम्रआवाहन व आव्हान आहे. माणूसने व्यावसायिक पद्धतीचा जरूर अवलंब करावा, पण माणूसच्या वैचारिक परंपरेला धक्का न लावता !

'माणूस' चे प्रकाशन थांबवायचा विचारच वाचकांना पटणार नाही. आजच्या उथळ उत्तान, भंपक, भडक साहित्य पसरविणाऱ्या वातावरणात 'माणूस' काळाची गरज आहे.

पुणे–मुंबई येथे माणूस वाचकांचे संमेलन, मेळावे आयोजित करून आगामी वाटचालीबाबत विचारमंथन करावे.

**३ जून** **गणेश ल. केळकर**
मुंबई

¤ २५ व्या वर्षारंभानिमित्त आपले संपादकीय वाचले. त्यात आपण म्हटले आहे की, थांबावे का नवीन सुधारणा किंवा बदल करावा? पण थांबणे आपल्या मनातून काढून टाका. बदलाबद्दल थोडे मतभेद होऊ शकतील. मला तर असे वाटते की, आहे ह्या स्थितीतच 'माणूस' कायम रहावा. आम्हा मध्यमवयीन वर्गातील लोकांना आजचे आपले रूप आवडेल. तुम्ही काही बदल केला तर नक्कीच किंमत वाढवाल व आम्हाला ती परवडेल का? गेल्या तीन अंकातील बडोदा, अहमदाबादमधले सविस्तर वृत्त वाचले. इतके सविस्तर वृत्त कोठेच आले नाही. 'वृत्तपत्रे व राजकारणी' हे श्री. निरंजन आगाशे ह्यांचं पत्र योग्यच आहे.

तुमच्या राजहंस पुस्तक हुंडीबद्दल अभिनंदन !

**४ जून** **ग. म. मुळे**
राहुरी

¤ आपण २५ व्या वर्षारंभानिमित्त जो लेख 'माणूस' मध्ये लिहिलात, तो वाचला. त्यात तुम्ही जे तीन पर्याय दिलेले आहेत, त्यापैकी पहिला पर्याय म्हणजे 'माणूस' आहे त्याच स्थितीत चालू ठेवणे. हा पर्याय स्वीकारायचा म्हटले तर तुमची आर्थिक अडचण आहे. दुसरा पर्याय म्हणजे 'माणूस' ला व्यावसायिक रूप देणे. ह्या पर्यायावर आपली अशी अडचण आहे की, माणूस वाचकांच्या आवडी-निवडींशी, जाहिरातींशी बांधला जाईल. हे जरी खरे असले तरी उरलेला तिसरा पर्याय म्हणजे 'माणूस' बंद करणे. हा पर्याय 'माणूस' च्या कोणत्याही खऱ्या वाचकांप्रमाणे मलाही आवडणार नाही. म्हणजे पहिल्या पर्यायात तुमची अडचण आहे तर, तिसऱ्या पर्यायात आमची अडचण आहे. मग दुसरा पर्याय निवडून सुवर्णमध्य साधायला काय हरकत आहे?

व्यावसायिक रूप देणं म्हणजे नेमकं काय करावं? याबाबत माझे मत पुढीलप्रमाणे आहे–

'माणूस' मध्ये सा. राशिभविष्य, फोटो, कथा, कविता, व्यंगचित्र, विविध सदरे, विविध वार्तापत्रे इ. द्यावेत.

मात्र सा. 'माणूस' ला 'श्री' चे स्वरूप येऊ देऊ नये. विविध सदरे, कथा व बातम्या (वार्तापत्रे) ह्यावर भर द्यावा.

आजपर्यंत माणूसने ज्या मालिका सुरू केल्या होत्या. (उदा. एलेनी, शर्यत) त्या प्रकारच्या मालिका सुरू कराव्या.

**७ जून** **न. गो. आगाशे**
पुणे

¤ पंचविसाव्या वर्षात पाऊल टाकताना त्या पावलात– नव्हे रोमारोमात– उत्साह हवा भरलेला; पण आपण तर पाऊल टाकता टाकतानाच थांबायचा विचार मनात आणताय! अहो, निदान आमच्यासारख्या एकनिष्ठ वाचक मित्रांचा तरी विचार करायचा होतात.

# माणूसचे पंचविसावे वर्ष

□ 'माणूस' साप्ताहिकान जून १९८५ मध्ये पंचविसाव्या वर्षात पदार्पण केलं आहे. 'माणूस'चे संपादक श्री. ग. माजगावकर यानी या संदर्भातील आपले निवेदन १ जून ८५ च्या वर्षारंभ अंकात प्रसिद्ध केल आहे. माणूसच्या २५ व्या वर्षापर्यंतच्या वाटचालीचा हे निवेदन एक प्रामाणिक आलेखच आहे. ही एवढी प्रदीर्घ वाटचाल समाजाविषयीची तीव्र कळकळ असल्याखेरीज करणे केवळ अशक्यच. विशेषत: माजगावकरांनी या साप्ताहिकाचे जे प्रांजळ अर्थकारण सागितले आहे, त्या पार्श्वभूमीवर माणूसने केलेली वाटचाल अतिशय गौरवपूर्ण म्हणावी लागेल.

पूर्वीच्या काळात पिढी बारा वर्षांनी बदलत असे. आता ज्ञानाचा आणि जीवनाचा वेग इतका वाढला आहे की, पिढीबदल फारच थोड्या वर्षांनी होत चालला आहे. काळाचा वेगच इतका वाढला आहे की, हा कालवेगाचा झपाटा सभाळून श्री. माजगावकर यानी या बदलाची चाहूल अतिशय सावधपणानं सतत घेतली. काळ वेगाच्या झपाट्याने ते कधी डगमगले नाहीत. आपले विचार अन् श्रद्धा त्यांनी कधी सोडल्या नाहीत; पण त्यांचा पीळ ठेऊनही ते कधी असहिष्णु झाले नाहीत. विकासात्मक पत्रकारिता त्यांनी निष्ठेनं जोपासली. आपल्या परीने समाज प्रबोधनाचे काम करीत असताना, 'ग्रामायन'सारख्या प्रत्यक्ष आणि प्रत्ययकारी चळवळी अंगिकारल्या. माजगावकराचे हे काम अतिशय अभिनदनीय आहे. साहित्यविषयक चळवळीचे पडसाद 'माणूस'मध्ये फार जोमानें उमटलेले दिसत नाहीत तरीही साहित्याच्या दालनात माणूसचे काम लक्षणीय आहे. कितीतरी ललित लेखकाना माजगावकरानी पत्रकारितेकडे वळवले असे दिसून येईल. कै. दि. बा. मोकाशीनी माणूसमधून केलेले लेखन हे त्याचे एक महत्त्वाचे बोलके उदाहरण सागता येईल. चरित्र आणि आत्मचरित्र या वाङमयप्रकारात माणूसची कामगिरी वैशिष्टयपूर्ण आहे. त्याचप्रमाणे नव्या नव्या लेखक-लेखिकाचा शोध माणूसने सतत घेतल्याचे आढळून येईल.

'माणूस'ची भूमिका नेहमीच अनाग्रही राहिलेली आहे. कोणत्याही एका विचारप्रवाहाचे अतिरेकी टोक गाठण्याची स्पर्धात्मक भूमिका माणूसने कधी घेतली नाही. त्याने वाचकांच्या सदसद्‌विवेकबुद्धीचा व मूलभूत विचारस्वातंत्र्याचा सतत आदर केला आहे. आणीबाणीच्या पर्वातही 'माणूस'ची कामगिरी अत्यत लक्षणीय होती असा निर्वाळा जेष्ठ पत्रकारानी दिलेला आहे. गेली कित्येक वर्ष समाजमनाच्या स्पदनाची एक तार माणूसमधून झकारली आहे; तिचे दुसरे टोक रसिक वाचकाच्या स्पंदनाशी भिडावे, असे घडले आहे.

एकात्म भारताच्या स्वप्नाचे जतन आणि विश्लेषण हा 'माणूस'चा एकमेव ध्येयवाद जाणवतो. यासाठी भारताच्या विविध भागात– काश्मिर, केरळ, गुजरात, तामिळनाडू, पजाब, आसाम– अशा सर्व ठिकाणी प्रतिनिधी धाडून तिथल्या मनगटातील स्पदने वाचकापर्यंत पोचवायचे काम समर्थ लेखनशक्तीला आवाहन करून माणूसने केलेले आहे. आजच्या घटकेला तरी हिंदुहिताची भक्कम बैठक असलेला अत्यत डोळस राष्ट्रवादी म्हणून श्री. माजगावकर याचे स्थान अनन्यसाधारण आहे. विधायक, प्रागतिक, डोळस असा सर्वसमावेशक परंतु वास्तववादी हिंदुत्ववादाचा पीळ यत्किंचितही न सोडता, गांधीजी-विनोबा ही हिंदुधर्माची सर्वात उच शिखरे आहेत, या वस्तुस्थितीचे भान श्री माजगावकर यांना आहे व संपादक या नात्याने त्याच्या साप्ताहिकावर या भूमिकेची स्पष्ट छाप लक्षात येते. रा. स्व. सघाच्या यशापयशाची कारणमीमासा त्याना या दृष्टिकोनातून नेहमीच स्वागतार्ह वाटत आलेली आढळून येईल; परंतु कारणमीमासा या बुरख्याखाली, रा. स्व. सघावर चिखलफेक करून अपसमज पसरविण्याच्या वृत्तीवर त्यानी वेळोवेळी कोरडे ओढले आहेत.

आपल्या निवेदनात श्री. माजगावकर यानी भविष्यातील वाटचालीसबधी काही प्रश्न उपस्थित केले आहेत व त्याची उत्तरे ते पचविसाव्या वर्षाच्या वाटचालीत शोधतीलच. आम्ही त्याचे आत्तापर्यंतच्या वाटचालीबद्दल मन पूर्वक अभिनंदन करतो. आमची इच्छा आम्हाला 'माणूस'ची सोबत अखंड लाभावी अशीच आहे

माणूसचे व्रत कालबाह्य झाले आहे असे जाणवत नाही. जुनी आणि नवी पिढी यामधला पूल माजगावकरांनी बरोबर आणि कुशलतेने बाधला आहे. त्यामुळे 'माणूस' एकाकी पडला आहे असे आम्हास वाटत नाही. 'माणूस'चे वाचकही त्याला एकाकी पडू देणार नाहीत असा विश्वास आहे.

श्री. ज. जोशी । वि. ग. कानिटकर । विद्याधर पुंडलिक । वि. शं पारगावकर । रंगा मराठे

---

व्यावसायिक पद्धतीचा अवलब करायचं तुमच्या मनात तरी कस येतं हो? का तुम्ही पण 'वरलिया रंगास' भुलून गेलात, इतरासारखेच? व्यावसायिक नियतकालिकाचा मराठीत उदड 'टाकळा' माजला आहेच. आम्ही त्याकडे ढुकुनदेखील पाहत नाही. तुम्हालाही आमची सगत नको असेल, तर व्हा बाबा व्यावसायिक. आमचं काय जातंय? आजच्या परिस्थितीचं मी एक बघून ठेवलंय. बुद्धिवादी आणि चारित्र्यवान माणसं रहातात आपल्याच कोशात, 'मला काय त्याच' या वृत्तीनं. दुष्ट प्रवृत्ती मग जातात फोफावतात चहुकडं. विजय तेंडुलकर म्हणतात त्याप्रमाणं ही हरण्यासाठी दिलेली टक्कर आहे, याची जाणीव आहे मला; पण हरण्यापेक्षा मुळात टक्कर द्यायची ईर्षा महत्त्वाची नव्हे का? की आपलं, हरणार-हरणार म्हणून रडतच बसायच किंवा सरळ शत्रूला सामील व्हायचं? इतके वर्ष प्रवाहविरुद्ध पोहलातच ना, मग आता धीर का बरं सोडता?

ते काही नाही. निराशेचे सारे विचार झटकून टाका. आर्थिक मदत लागल्यास

पृष्ठ ३६ वर

# पारखे पारितोषिक मिळवणारे कल्पक उद्योजक

अनिल शिंदे

नोकरी शोधणाऱ्यापेक्षा स्वतःच एखादे उत्पादनकार्य हाती घेऊन इतर अनेकाना रोजगार पुरविणाऱ्या कल्पक उद्योजकाची आज आपल्या देशाला गरज आहे हे मत गेली अनेक वर्षे, विशेषत: जनता राजवटीनंतरच्या काळात सातत्याने मांडले जात आहे. केवळ तात्विक पातळीवर अशा स्वरूपाचे मत प्रतिपादन करणारे अनेक लोक, अनेक संस्था असतात; परतु अशा कल्पक उद्योजकाना, संयोजकांना, संशोधकांना सक्रीय प्रेरणा देणारे मात्र फार थोडे असतात. त्यांच्या नव्या उत्पादनाचे कौतुक करून त्याचबरोबर एक नवी बाजारपेठ मिळवून देण्यासाठी आवश्यक असलेली प्रतिष्ठा मिळवून देण्यास म्हणजेच वेगळ्या अर्थाने शिफारस करणाऱ्या फार थोडया व्यक्ती वा संस्था असतात. अशी प्रतिष्ठा वा सन्मान मिळवून देणाऱ्या थोड्या सस्थांत, नुकताच सुवर्ण महोत्सव साजरा केलेल्या मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रिज व त्यातर्फे देण्यात येणाऱ्या गो. स. पारखे पारितोषिकाचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल.

दरवर्षी १६ जून या दिवशी दिल्या जाणाऱ्या पारितोषिकाची पार्श्वभूमी, ते ज्या उद्योजकांना आतापर्यंत मिळाले त्यांच्या उत्पादनातील फरक व उत्पादकांची वर्गवारी आणि या मान चिन्हाच्या योगे मांडता येणाऱ्या काही गोष्टी याचाच विचार या लेखात केला आहे.

## पारखे पारितोषिक : पार्श्वभूमी

१६ जून १९४७ या दिवशी, म्हणजेच भारताला स्वातत्र्य मिळण्यापूर्वी बरोबर दोन महिने आधी पारखे पारितोषिक वितरणाचा पहिला सोहळा पार पडला व आज ३८ वर्षानंतरही ही बक्षीस योजना अव्याहतपणे राबविली जात आहे.

उत्पादन कार्यासाठी आवश्यक असलेल्या श्रम, भांडवल, जमीन या तीन घटकाना बांधणाऱ्या कल्पक सयोजकाचे कौतुक करणारे हे पारितोषिक १६ जूनलाच दिले जाते. या १६ जूनमागे थोडा इतिहास आहे.

१६ जून १९४४ या दिवशी ज्या बाबुराव पारखेंनी सदर पारितोषिक ठेवले त्याच्या धाकट्या बंधूचे, गोपाळराव पारखे याचे ऐन तारुण्यात २४ व्या वर्षी अकाली निधन झाले. गोपाळराव स्वत: संशोधक वृत्तीचे होते. १९४२ मध्ये जेव्हा तात्रिक ज्ञानाला आजच्या इतके महत्त्व नव्हते तेव्हाच गोपाळरावांनी तांत्रिक प्रशिक्षण घेतले होते. बाबुराव पारखे यांनी आपल्या महाविद्यालयीन शिक्षणाच्या काळातच सुरू करून वाढविलेला व्यवसाय बाबूराव जपानला गेले असताना गोपाळरावानी सांभाळला – वाढविला.

संशोधकाचा पिंड लाभलेल्या गोपाळरावानी पेंट व व्हर्निशेसची पदविका मिळविल्यानंतर आपले स्वतत्र संशोधन चालू केले होते. पुठ्ठ्यापासून न फुटणारी अभंग पाटी व ऑईल क्लॉथ तयार करण्याची सर्व तयारी झाली होती, ते सशोधन पूर्ण होत आले होते तेव्हाच त्याना विषमज्वराने गाठले व त्यात त्याचे निधन झाले. एका स्वयप्रेरीत कल्पक संशोधक उद्योजकास महाराष्ट्र मुकला.

पण गोपाळरावांमधली संशोधक वृत्ती पुढे नवीन काही करू पाहणाऱ्याना मार्गदर्शक ठरावी व धडपडणाऱ्या कल्पक उद्योजकाचे कौतुक व्हावे या दृष्टीने मग गोपाळरावाच्या प्रथम श्राद्धदिनी बाबुरावजींनी साडेसहा हजार रु. ची ठेव मराठा चेंबर्सच्या स्वाधीन केली या रकमेच्या व्याजातून नवीन कल्पक उद्योजकाना काही रक्कम व मानचिन्ह देण्याची योजना पुढे आली. बक्षीसाच्या रकमेपेक्षा मिळणारे मानचिन्ह हे नव्यांना अधिक हवेहवेसे झाले. १६ जून १९४७ रोजी या पारितोषिकाचा पहिला वितरण समारंभ पार पडला तेव्हापासून आज ३८ वर्षे तो वितरण सोहळा अगदी नियमितपणे १६ जूनला पार पडतो.

## कल्पकतेचाच इतिहास

१६ जून १९४७ पासून .१६ जून १९८५ पर्यंत या पारखे पारितोषिकासाठी जी उत्पादने दाखल करण्यात आली होती व जी निवडण्यात आली त्याच्याकडे जर एक दृष्टीक्षेप टाकला तर प्रारंभीचे अगदी प्राथमिक पातळीवरचे संशोधन गेल्या ३८ वर्षात कसेकसे बदलत गेले ते जाणवते.

अगदी पहिल्या वर्षी म्हणजे १९४७ च्या मानचिन्हासाठी जी उत्पादने स्पर्धेत उतरली होती त्यात शिवणयंत्राच्या सुया, मोटारीच्या पडद्याची बर्न बटणे, सुवासिक तेले, वनस्पती तेलावर चालणारा वातीचा दिवा, मेजरिंग टेप, फोटो बसवण्याचे कोपरे, सचित्र हिंदुस्थान पुस्तिका, जोंधळा, मका, पोहे, कापडाच्या बाहुल्या, आटविलेले दूध (केकसाठी), उभ्या वातीचा दिवा, सिमेंट, प्लास्टरची मॉडेल्स, पितळी भांडी, रबरी खेळणी, इडेक्स फाईल क्लिप याचा समावेश होता. यावरून आज दृष्टी फिरविली तर हसू आल्यावाचून राहात नाही. इतक्या आज या वस्तू रुळलेल्या, रोजच्या वापरातल्या आहेत.

मात्र पहिल्याच वर्षी या पारितोषिकास जोरदार प्रतिसाद मिळाला होता. २१ स्पर्धकानी त्यात भाग घेतला होता पण पहिले पारितोषिक वितरण झाल्यानंतर नेमक्या कोणत्या वस्तूना येथे अग्रक्रम मिळतो हे उद्योजकाना समजले त्यामुळे अगदी बाळबोध स्वरूपाच्या वस्तुचे उत्पादन करणाऱ्यानी पुढे माघार घेतली. परंतु काहींनी आपली चिकाटी सोडली नाही. वर्धा येथील एक महिला, श्रीमती इंदिराबाई आपटे यानी सातत्याने ३ वर्षे (१९४७ ते ४९) या स्पर्धेत भाग घेतला आपल्या बाहुल्या सादर केल्या. शेवटी परीक्षक हरले व आपटे याना १९४९चे पारितोषिक मिळाले. श्रीमती आपटे याच पारखे मानचिन्ह मिळविणाऱ्या पहिल्या महिला ठरल्या.

पण हा पहिला टप्पा फार काळ चालला नाही. १९५० पासून पुढे शास्त्रीय उपकरणे,

छोटयामोठया मशिन्स, यंत्रे येण्यास सुरुवात झाली. परंतु मधून मधून चटणी पावडर मशीन, डासाची उदबत्ती, जादू का साप, आशा बिंदी, गजरा व एक काडी बागडी, मेणबत्त्या, मसाला सुपारी, अडकित्ता, अशा नित्य परिचयाच्या वस्तू थोडया बहुत फरकाने दिसत होत्या. मात्र १९६३–६४ नतर या ओळखीच्या वस्तूची नावे जवळ जवळ बाद होत गेली व नंतर अनेक अनोळखी नावे हजेरी लावून ओळख वाढवू लागली.

एक गोष्ट मात्र नमूद करणे आवश्यक आहे व ती म्हणजे जरी अत्यंत बाळबोध वस्तू या पारितोषिकासाठी येत राहिल्या तरी महाराष्ट्रातील उद्योजकात त्यानं जाग निर्माण केली होती. धडपडीला आवाहन केले होते, स्पर्धेसाठी आव्हान दिले होते. शिवाय निवडलेल्या वस्तूंबाबत एक गोष्ट नक्कीच सांगता येईल, व ती म्हणजे या वस्तू अगदी वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून निवडलेल्या आहेत.

## पुणेकरांचे वर्चस्व

आजपर्यंत ज्या उद्योजकाना पारखे मानचिन्ह लाभले, त्यांच्या गावाच्या नावावरून नजर फिरवता एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते व ती म्हणजे आतापर्यंत २६२ उद्योजकाना हा सन्मान मिळाला, त्यातील १६० जण केवळ पुण्याचेच होते. यावरून पुणेकरांनी या पारितोषिकावरची आपली हुकमत कायम राखली आहे. त्यानंतर मग मुंबई, नाशिक, ठाणे, वर्धा, अकोला, औरंगाबाद, धुळे, रत्नागिरी इ. ठिकाणचे उद्योजक दिसतात. यावरून टीका करणारे असे म्हणतात, याचा अर्थ असा की कल्पक उद्योजकांचे पुणे हेच एकमेव आगर असावे किंवा मग ही योजना महाराष्ट्रात सर्व भागात रुजलेली नाही व मुंबईसारख्या औद्योगिक शहरातील उद्योजक पुण्यातील स्पर्धेत उतरण्यास फारसे उत्सुक नाहीत.

पारखे औद्योगिक मान पारितोषिकांचा कालखंड संपल्यानतर पुढच्या कालखंडात जी नवी उत्पादने पुढे आली त्यात आयात पर्यायी वस्तू निर्माण करण्यावर मोठा भर उद्योजकांनी दिला असे दिसून येते. १९८५ साठी आलेल्या वस्तू तर बहुताशी आयात पर्यायी वस्तू दिसतात. आयात पर्यायाशिवाय आणखी एक दृष्टिकोन उद्योजकात दिसून येतो तो म्हणजे कमीत कमी खर्चात वस्तू उपलब्ध करून देण्याची धडपड. यातूनच मग आपल्या देशातील वातावरणाला पोषक स्वरुपाच्या वस्तू निर्माण करण्याचा एक प्रयत्न येथे दिसतो.

## नवे उत्पादन व बाजारपेठ

१९७१ हे पारखे औद्योगिक मान पारितोषिकाचे रौप्यमहोत्सवी वर्ष होते. त्यावेळी त्यापूर्वी हे पारितोषिक मिळालेल्या ११२ जणाचे एक सर्वेक्षण करण्यात आले. त्यात जवळ जवळ १२ जणाना आपले उद्योग बंद करावे लागल्याचे दिसून आले व त्यामागचे प्रमुख कारण पाहता बाजारपेठेची वानवा किंवा मागणी नाही हेही एक प्रमुख कारण होते हेही समजले. भांडवलाची चणचण, कच्च्या मालाची वाण यामुळेही कल्पक उद्योजकाचे उत्पादन व्यावहारिक पातळीवर करता येऊ शकले नाही. त्यामुळे पुढे पारखे पारितोषिकाच्या निकषात बाजारपेठेत लाभक्षमतेने उतरू शकणारे उत्पादन हा निकष वाढविण्यात आला व पारितोषिक विजेत्याचे उद्योग बद पडण्याचे मुळात जे प्रमाण कमी होते ते अगदी अत्यल्प झाले.

जाता जाता एका गोष्टीची आणखी नोंद करावीशी वाटते, ती म्हणजे गेल्या ३८ वर्षात महिला उद्योजकाचा या पारितोषिकासाठी फार कमी सहभाग दिसतो. ३८ वर्षांत केवळ पाचच महिला या स्पर्धेत यशस्वी ठरल्या आहेत श्रीमती आपटेंचा उल्लेख वर आलाच आहे. त्यांच्याशिवाय १९५३ ला ठाणे येथील श्रीमती सरस्वतीबाई जोशीना मेणबत्त्यासाठी, १९७१ मध्ये श्रीमती मिनाक्षी वाणी ( अकोला ) यांना पॉपकॉर्न यंत्रासाठी तर १९७१ मध्येच श्रीमती विनोदिनी व श्रीमती शरदिनी तासकर याना क्यूपोला ब्लास्ट व्हॉल्यूम मीटरसाठी हा पुरस्कार मिळाला. परतु एकूणच महिला उद्योजकाचा या स्पर्धेकडे फारच कमी ओढा दिसतो हे मात्र खरे.

पारितोषिकाची सद्यस्थिती – प्रारंभी बाबुरावजी पारखे यानी या पारितोषिकांसाठी साडेसहा हजार रु मराठा चेंबर्सच्या स्वाधीन केले होते. त्यानतर मराठा चेंबर्स व पेपर अँड पल्प कन्व्हर्जन लि यांनी त्यात पुढे भर घालीत घालीत साडेबारा हजार, नंतर १९७१ ला रौप्यमहोत्सवी वर्षात ५० हजार रु. पर्यंत ही ठेव नेली. १९८२ मध्ये ही रक्कम एक लाख रु. पर्यंत वाढविण्यात आली आहे. त्या ठेवीवरील व्याजातूनच हे मानपारितोषिक दिले जाते.

यावेळी एकूण ३६ स्पर्धकांनी भाग घेतला होता. (रौप्यमहोत्सवी वर्षात सर्वात जास्त म्हणजे ४८ उद्योजकानी भाग घेतला होता ) पैकी नऊजणांना हा पुरस्कार मिळाला. त्यात सातजण पुण्याचे तर प्रत्येकी एक मुंबई व औरंगाबाद येथील आहे (या उद्योजकाची माहिती स्वतंत्र दिलीच आहे )

...उद्योजक मग ते पुण्याचे असोत वा मुंबईचे, वा महाराष्ट्रातील अन्य कोणत्या भागातले, या मानपारितोषिकामुळे कल्पक लोकांना, नियोजनबद्ध प्रवास करणाऱ्या उद्योजकांना आपल्या मालास प्रतिष्ठा प्राप्त करून घेण्याची एक चांगली सधी मिळते. याबाबत दुमत होण्याचे कारण नाही. परतु या पारितोषिक वितरण समारंभाच्या ताजेपणाचा फायदा उठवीत हल्लीच्या लघुउद्योग क्षेत्रातील एका प्रकर्षाने जाणवणाऱ्या गोष्टीवर पुन्हा प्रकाश टाकावासा वाटतो.

पुणे परिसर, मुंबईतील उपनगरे, येथील लघुउद्योग पट्ट्यातून चक्कर मारता असे स्पष्ट दिसते की या पट्टयात नांदते आहे 'जॉब वर्क सस्कृती.'

'जॉब वर्क संस्कृती' म्हणजे या महानगराच्या परिसरात जे बडे उद्योग वसले आहेत, त्यांना लागणाऱ्या सुट्टया भागाची निर्मिती वा भागांवर प्रक्रिया करणे हे या लघुउद्योगाचे काम असते. त्यातही बहुतेक वेळा लागणारा कच्चा माल मोठे उद्योगच पुरवितात हे सुटे भाग करून वा काही प्रक्रिया केलेले भाग या मोठयाना पुरवून आमचे लघुउद्योजक ज्यात कित्येक प्रशिक्षित अभियंत्यांचाही समावेश आहे ते सतोष मानीत असतात.

मोठ्या उद्योगातील वेतन वरच्या पातळीवर स्थिरावलेले असतात, शिवाय इतर खर्चही वाढते असतात. त्यामुळे ते उद्योग या लघुउद्योगातील कमी वेतनाचा लाभ उठवीत कामे करवून घेतात. परिणामी कायम नव्हे तर एक बदली कामगार या स्वरूपाची भूमिका लघुउद्योगांना वठवावी

लागते. कित्येक मोठ्या कपन्या काही लघुउद्योजकांना अगदी कस्पटासमान लेखतात. कमी मोबदला, तोही वेळेवर नाही, वागणूक अपमानास्पद, रिजेक्शनचे मोठे प्रमाण, यामुळे हे लघुउद्योजक अगदी मेटाकुटीस आलेले असतात.

पण असे असूनही आमचे प्रशिक्षित, बुद्धिमान लघुउद्योजक मात्र मागणी नक्की आहे, नव्या वस्तुउत्पादनापेक्षा धोके कमी, स्थैर्य जास्त या गोष्टींकडे पाहात अगदी स्वतःचा उद्योग असूनही कामगारासारखे जीवन जगतात. कोणी केवळ नटबोल्ट पुरवते तर कोणी केवळ कटसंचे काम करते. यामुळे ही बुद्धिमत्ता कोठे तरी गंजत राहते व परदेशी निघून जाणाऱ्या बुद्धिमान लोकांप्रमाणेच केवळ जॉब वर्क संस्कृतीत रमणारे लोक देशाचे वेगळ्या अर्थाने मोठे नुकसान करीत असतात, याची स्पष्ट नोंद करावीशी वाटते.

यामुळेच मग पारखे पारितोषिक देताना एक वैशिष्टयपूर्ण असा, केवळ एकाच पारितोषिकासाठी अगदी वेगळा निकष जो केवळ आयात पर्याय किंवा जॉब वर्क संस्कृतीलाच नव्हे तर नवीन संशोधन अगदी तात्त्विक पातळीवर असले तरी त्याला मोठे पारितोषिक देण्याची योजना तयार करावी असे मनापासून वाटते. अर्थात ही योजना केवळ पारखेंनीच घ्यावी असे नाही. त्यांच्या मार्गदर्शनाखाली इतर कोणीही ती हाती घ्यायला हरकत नाही. पण पारखे मान पारितोषिकात आज वेगळाच सन्मान आहे. त्यामुळेच या पारितोषिकाच्या आयोजकांनाही या निमित्ताने विनंती !

□

# पारखे पारितोषिक विजेत्या उत्पादकांचा व त्यांच्या उत्पादनाचा परिचय



**१. आनंद वसंत बाम**– (उत्पादन– मिलकोपॅक) पॉली पिशवी दूध वा तत्सम द्रव पदार्थ भरून विकणे ही आता काही नवी पद्धत उरलेली नाही; पण दूध पॉली पिशवीत भरून ती बंद करणे यासाठी आतापर्यंत वापरली जाणारी यंत्रसामग्री ही केवळ बड्या उत्पादकांनाच उपयुक्त ठरणारी होती; पण आता श्री. आनंद बाम यांनी शोधून काढलेल्या मिलकोपॅकमुळे मध्यम प्रमाणावर व्यवसाय करणाऱ्यांना अत्यंत कमी मूल्यात ही पद्धत हस्तगत करणे शक्य झाले आहे.

मिलकोपॅकची सध्याची किंमत आहे साडेपंचवीस हजार रु. जर आयात केलेली यंत्रसामग्री वापरली तर एकतर ती अत्यंत गुंतागुंतीची असते, त्यामुळे त्यावरचा देखरेख खर्च अधिक राहतो. शिवाय ते यंत्र मोठे व ८ ते ८॥ लाख रुपये किंमतीचे असते. शिवाय मिलकोपॅक आता खूपच सुटसुटीत आहे, त्यात किमान गुंतागुंत आहे. टाकी केवळ ४ फुटावर त्यामुळे कोणीही माणूस– कामगार दुधाचा कॅन त्यात सहज उपडा करू शकतो. परिणामी येथे पंपाचीही गरज द्रव टाकीत नेण्यासाठी राहात नाही.

या टाकीची साठवणूक शक्ती ५५ लिटरची आहे. एक सामान्य कामगार तासाला तिनशे–चारशे पिशव्या सहजतेने पॅक करू शकतो. या मिल्कोपॅकचा वेग मात्र ६०० पिशव्यांचा आहे. शिवाय अर्धा वा एक लिटरचा भरणा करण्यासाठी आवश्यकतेनुसार एक बटण दाबले की काम भागते. श्री. बाम यांच्या मते यात केवळ +५ वा –५ चा फरक पडतो म्हणजे पिशवीमागे चमचा, अर्धा चमचा.

श्री आनंद बाम पारितोषिक वितरण समारंभाच्यावेळी अत्यंत उत्साहात होते. आपल्याला महाराष्ट्र सरकारबरोबरच मध्यप्रदेश, राजस्थान या राज्यांतूनही मागणी मिळाली आहे असे त्यांनी सांगितले. मागणी असेल तर महिन्यात चार यंत्रे बनविता येतात असेही त्यांनी सांगितले.



२. **श्री. श्रीरंग पुरुषोत्तम बापट**–(उत्पादन– विविध प्रकारचे ॲडजेस्टेबल क्लॅम्प्स) जॉबवर्क करणाऱ्यांना वरदान ठरावेत असे वेगवेगळ्या प्रकारचे क्लॅम्प्स श्री. बापट यांनी तयार केले असून ते त्यांनी यशस्वीरित्या बाजारातही आणले आहेत. त्यांनी तीन प्रकारचे क्लॅम्प्स विकसीत केले आहेत. त्यात हायराईज क्लॅम्पमुळे वेगवेगळ्या उंचीचे (१ हजार मि. मि. पर्यंत उंचीचा कोणताही जॉब) जॉब पकडता येतात २ टन ते ४ टन ही याची पकड क्षमता असते. साईड क्लॅम्प्स या त्यांच्या आणखी एक उत्पादन प्रकारामुळे प्लेन मिलींग, ड्रिलिंग, शेपिंग या सारख्या यंत्रांवरची उत्पादकता वाढविण्यास सहाय्य होते. या क्लॅंपची वैशिष्ठ्ये पुढीलप्रमाणे आहेत. त्याचा जॉब तिरका असा खाली येतो परिणामी जॉबवर दोन्ही दिशांनी दाब येतो व यंत्र चालू असताना जॉब उचलला जात नाही. मशीन बेडपासून १५ मि. मि. उंचीवर जॉब पकडला जातो त्यामुळे ड्रिलिंग, मिलींगला ते उपयुक्त ठरते. हा क्लॅंप दोन भागात असल्याने वेगवेगळ्या मापाचे जॉब पकडता येतात. मशीन बेडची पूर्ण क्षमता वापरता येते. कमी वेळात व सहजपणे जॉबवर दाब देता येतो व काढता

येतो त्यामुळेच उत्पादकता वाढते. याशिवाय स्ट्रॅप क्लॅंपचा आधार म्हणून उपयुक्त ठरणारा हाईट ब्लॉकही बापट यांनी विकसीत केला आहे. त्यामुळे उंची कमी जास्त करता येते. ¤



श्री. धारप



श्री. गाडगीळ

३) **श्री. गणेश गंगाधर धारप आणि श्री. गोपाळ नारायण गाडगीळ,** ओपेल इंडिया ('कॅरीस्कोप–१००' सिक्रोकार्डर) स्वयंचलित स्लाईड प्रोजेक्टर –


स्लाईड प्रोजेक्टरच्या जगात आज खूप वैविध्य आहे हे खरे; परंतु सर्व स्लाईड प्रोजेक्टर्समध्ये एक गोष्ट समान असते व ती म्हणजे स्लाईड–पारदर्शिका उभी वा आडवी सरकते व भिंगासमोर येते. यामुळेच सध्याच्या सर्व प्रोजेक्टर्समध्ये पारदर्शिका अडकण्याचा, प्रोजेक्टर बंद पडण्याचा संभव असतो, शिवाय पारदर्शिका खराब होते. या सर्वात पारदर्शिका वाया जाणे अधिक महाग पडते.

नेमकी याच दोषावर मात करण्यासाठी ओपेल इंडियाच्या श्री. धारप व श्री. गाडगीळ यांनी नवा व सर्व सुटे भाग देशी वापरून एक प्रोजेक्टर तयार केला. प्रारंभी १९७२ ला त्यांनी १० पारदर्शिकांचा तर आता १९८१ मध्ये १०० पारदर्शिकांसाठी प्रोजेक्टर तयार केला. त्यालाच–कॅरिस्कोप १०० असे नाव देण्यात आले.

या कॅरिस्कोप १०० मध्ये इतर प्रोजेक्टर्स प्रमाणे दूरनियंत्रित चेंबर व फोकिसग आहेतच पण याचे वैशिष्टय म्हणजे यात पारदर्शिका उभी वा आडवी नव्हे तर सरकतच नाही. म्हणजे आपली जागा ती सोडतच नाही. ती एका होल्डरमध्ये पक्की पकडली जाते. अशा १०० होल्डरचा एक पट्टा असतो व हा पट्टाच्या पट्टा फिरत असतो त्यामुळे पारदर्शिका अडकत नाही व ती खराबही होत नाही. या बेल्टमुळे दोन पारदर्शिकांच्या दरम्यान अंधार येत नाही. परिणामी डिझॉल्व इफेक्ट तयार होतो, व हा प्रोजेक्टर कितीही तास चालविता येतो. शिवाय पारदर्शिका दिव्यापासून खूप दूर असल्यामुळे त्याचाही पारदर्शिकेवर परिणाम होत नाही. परदेशात अशा प्रकारच्या यंत्राची किंमत ८० हजार रुपये इतकी आहे.

परदेशी प्रोजेक्टर्समध्ये स्लाईड सरकणे, भिंग सरकणे व फॅन चालविणे यासाठी एकच मोटार वापरली जाते त्यामुळेच त्यावर सर्व भार पडून ती बंद पडणे शक्य असते. मात्र कॅरिस्कोप १०० मध्ये मात्र या तिन्ही गोष्टींसंबंधी वेगवेगळ्या तीन मोटर्स वापरलेल्या असतात.

कॅरिस्कोप १०० बरोबरच ओपेल इंडियाने भाषणाबरोबर पारदर्शिका बदलता यावी यासाठी सिंक्रोकर्डर हे इलेक्ट्रॉनिक उपकरणही बनविले आहे. यात स्लाईड बदलण्यासाठी जी ब्लिप दिली जाते ती स्टुडियोत बनविण्याची आवश्यकता नाही. ती कोणीही देऊ शकतो व आवश्यकतेनुसार पुसूही शकतो.



श्री. भसाळे



श्री. जोगळेकर

## तिसऱ्यांदा पारखे पारितोषिक विजेते

४) **ट्रान्झियन्ट ॲनलायझर–उत्पादक– डॉ. अरविंद गोपाळ जोगळेकर व चंद्रकांत गोपाळ भसाळे–**


क्षेत्रीय वापरासाठी अत्यंत उपयुक्त ठरणारे ट्रान्झियन्ट ॲनलायझर हे आयात पर्यायी उपकरण श्री. जोगळेकर व श्री. भसाळे यांनी विकसित केले आहे. संरक्षण संशोधनातील रॉकेट उड्डाणाच्या चाचण्या या अतिशय महत्वाच्या व खर्चिक असतात, त्यामुळे त्याची अचूक नोंद होणे आवश्यक असते. ही गोष्ट हे उपकरण तयार करताना या दोन्ही संशोधकांनी आपल्या डोळ्यापुढे ठेवली होती.

अगदी अत्यल्प म्हणजे सेकंदाच्या लक्षांश भागाएवढ्या अल्प काळ टिकणारे वेव्हफॉर्म्स व ट्रान्झियन्टस् यांची नोंद हे उपकरण करते. त्यासाठी किमान तांत्रिक संपर्काचा (कॉन्टॅक्टस्चा) वापर करण्यात आला. १२ इंची सी. आर. टी. डिस्प्ले कन्सोलवर मेनुड्रिव्हन सॉफ्ट वेअरच्या सहाय्याने चाचणीचे सर्व घटक प्रीसेट करता येतात. तसेच त्या नोंदी छापताही येतात. वेगवेगळ्या प्रकारचे १६ संदेश संकेत या यंत्रास जोडता येतात.

श्री. जोगळेकर व श्री भसाळे यांनी हे आपल्या इकॉन इलेक्ट्रॉनिक सिस्टिमसाठी लागोपाठ तिसऱ्यांदा पारखे मानचिन्ह मिळविले. हे मुद्दाम नमूद करणे आवश्यक आहे.

या नव्या संशोधनामुळे आता प्रगत अव-

काश संशोधन, विद्युत प्रकल्प, कंपन पृथः-करणाच्या चाचण्या यासाठी परदेशी उपकरणांवर अवलंबून राहण्याची गरज राहणार नाही.




**५) कलर मोशन व्हिडियो अनिमेशन सिस्टिम उत्पादक– श्री. दिलीप कोठारी.**

स्थिर पारदर्शिका व सचेतन दृश्य दाखविणारे आधुनिक महाग गणकयंत्र यातील अंतर भरून काढणे आवश्यक होते. पुण्याच्या दिलीप कोठारी यांनी साधी, स्वस्त व संपूर्ण नवी पद्धत शोधून काढली आहे. त्यांच्या कलरमोशन तंत्रात आता कृष्ण धवल वा रंगीत पारदर्शिका घेऊन हव्या त्या आकारात व रंगात विशिष्ट प्रक्रिया, डिस्प्ले पॅनल्स तयार केली जातात. यात अनेक हालचाली वा क्रिया नैसर्गिक-रीत्या चित्रित केल्याने स्थिर चित्रात जिवंत-पणा येतो. उदा. फिरती चक्रे, विजेचा प्रवाह, नलिकांतून वाहणारे द्रव.

जाहिराती, शैक्षणिक संस्था, संरक्षण विभाग, विमान, विजनिर्मिती, रुग्णालये यांना जुनी स्थिर चित्रे, नकाशे यावर अवलंबून रहावे न लागता आता या कलर-मोशन तंत्राद्वारे सजीव रूपाने दाखविता येते. हृदयाचे स्पंदन, रक्ताभिसरण या गोष्टी विद्यार्थी जवळजवळ प्रत्यक्ष स्वरूपात पाहू शकतील त्यामुळे अनेक शब्दांचे काम क्षणात होईल.

सध्या १ मिटर × १.४ मिटर एवढ्या मोठ्या आकाराची डिस्प्ले पॅनल्स तयार केली आहेत. यासाठी पडदा वा अंधाराची गरज लागत नाही हे याचे आणखी एक वैशिष्ट्य. त्याची दूरदर्शन वा इतरांसाठी फिल्मही घेता येते. त्यामुळे शैक्षणिक फिल्म तयार करणे सहज सोपे काम होऊ शकेल.





**६) इलेक्ट्रॉनिक पर्जन्यमापक–उत्पादक – श्री. गौतम लेले, श्री. प्रमोद अभ्यंकर**

पर्जन्य मापन ही भारतासारख्या पावसावर अवलंबून असलेल्या देशात एक अत्यावश्यक गोष्ट आहे. आतापर्यंत ही नोंद वा हे मापन यांत्रिक उपकरणाद्वारे ठेवले जात आहे; पण आता श्री. लेले व श्री. अभ्यंकर या संशोधकांनी इलेक्ट्रॉनिक पर्जन्य मापक हे संपूर्ण भारतीय बनावटीच्या स्वरूपात तयार करण्यात यश मिळविले आहे.

तांत्रिक मापकातील गियर्स, लिव्हर्स, लिकेज इ. फिरणारे भाग, तसेच शाईचे पेन, कागद हे भाग या नव्या उपकरणात वगळण्यात आले आहेत. या नव्या मापकात एक स्मृतिकोश लावून उपकरण चालू केले की १५–२० दिवस मापन केंद्रावर जाण्याची आवश्यकता नसते. दर तासाला किती पाऊस पडला याची नोंद स्मृतीकोशात असते. १५–२० दिवसानंतर हा स्मृतिकोश काढून दुसरा लावता येतो. काढलेला स्मृतिकोश डिजीटल रिडआऊटला जोडता क्रमाने नोंदी मिळतात त्या लिहिता येतात. जोपर्यंत हा कोश पुन्हा लावला जात नाही, तोपर्यंत त्यावरच्या नोंदी पुसल्या जात नाहीत.

---



**७) उद्वाहक पट्टे**
**उत्पादक – श्री. अमरेंद्र गोपाळ मुळे (मुंबई)**


यावेळी पुण्याबाहेरच्या ज्या दोन कल्पक उद्योजकांना पारखे पारितोषिक मिळाले त्यात श्री. अमरेंद्र मुळे या मुंबईच्या संशोधकाचा समावेश आहे.

हल्ली जागेची समस्या मोठी आहे शिवाय अनेक कारखान्यात समान प्रक्रियेसाठी वा पॅकिंगसाठी वरच्या मजल्यावर वगैरे न्यावे लागते तेव्हा अडचण येते ती अशी की सध्या उपलब्ध असलेल्या पद्धतीत फारफार तर १८ अंश उंचीच्या कोनातच सामानाचे उद्-वाहन होऊ शकते त्यामुळे जागा तर जास्त लागतेच परंतु सामानही खाली पडू शकते.

श्री. मुळे यांनी जी पद्धत शोधून काढली, त्यातील पट्टे काटकोनाच्या पातळीतही सामान उंच जागी वाहून नेण्याचे काम करू शकतात. पट्ट्याचा पृष्ठभाग सपाट असतो. पृष्ठभागावर सोयीप्रमाणे विशिष्ट अंतरावर उंबरठ्यासमान उंचवटे आणि कडांना आवश्यक तेवढ्या उंचीच्या संरक्षक भिंती बनवून द्यायचे कामही या उत्पादनाचाच एक भाग आहे. त्यामुळे आपले सामान मजबूत खोक्यात ठेवल्यानुसार सुरक्षित राहते.

**८) झेरॉक्स मशीनला लागणारे हॅलोजन इन्फारेड दिवे–उत्पादक–श्री. महेंद्र के. शहा**

सर्व प्रकारच्या देशी–परदेशी झेरॉक्स मशिनमध्ये हॅलोजन व इन्फारेड दिव्यांची आवश्यकता असते. आजपर्यंत त्यांची आयातच केली जाई; परंतु श्री. महेंद्र शहा यांनी




**श्री. महेंद्र शहा**

हे दिवे ज्यांना 'कॉपीअर दिवेही' म्हणतात ते तयार केले आहेत.

एक्सपोजर हॅलोजन व हिटर इन्फारेड दिवे यांची या यंत्रात वेगवेगळ्या कारणाने आवश्यकता असते. सर्वत्र प्रकाशाची सारखी विभागणी करण्यासाठी प्रत्येक कॉपीअर यंत्राला वेगळ्या दिव्याची गरज असते. त्यासाठी या दिव्यातील टंगस्टन फिलामेंटची ४ ते ८ प्रकाशी भागात विभागणी केलेली असते. प्रत्येक प्रत काढण्यासाठी हा दिवा १ ते ४ सेकंद लावावा लागतो. दुसऱ्या इन्फारेड दिव्यामुळे हीट रोलरचे विशिष्ट तपमान कायम राखले जाते.

श्री. शहा यांच्या लायटेक्स कंपनीत सध्या २५ प्रकारचे वेगवेगळे दिवे तयार करण्यात येतात. हे दिवे म्हणजे आयात पर्यायी वस्तू असल्याने देशाचे मोठे परकीय चलन यामुळे वाचू शकेल.



**९) 'टीसी' प्रोफेशनल 'एनटीसी' थर्मिट'-उत्पादक श्री. अतुल कृष्णाजी ठकार**

श्री. अतुल ठकार हे औरंगाबादचे कल्पक उद्योजक असून त्यांना विद्युतयंत्राच्या सुरक्षिततेसाठी व कार्यक्षमतेसाठी तपमानातील बदल शोधणे, मोजणे व दर्शविणे यासाठी लागणारे उपकरण तयार केल्याबद्दल पारखे मानचिन्ह देण्यात आले.

श्री. ठकारांचा थर्मिस्टर तपमानातील बदलानुसार आपला विद्युत गुणधर्म बदलतो. एनटीसी थर्मिस्टरमध्ये तपमान वाढले की विद्युत प्रतिरोध कमी होतो. ठकारांचे हे थर्मिस्टर म्हणजे आयात पर्याय आहेत. □

# भांडणे – सामंजस्याने

प्रि. खं. कुलकर्णी

**भां**डण, मग ते कौटुंबिक अगदी नाजूक प्रकारचे असो, शेजाऱ्याशी असो अथवा एकाच ऑफिसमध्ये टेबलाला टेबल लावून बसणाऱ्या सहकाऱ्याशी असो. त्यासंबंधी आपल्या काही पारंपारिक कल्पना असतात. घरगुती असेल तर अगदी शेजारी–पाजाऱ्यांची करमणूक करणारे कडाक्याचे असू शकते किंवा शेजाऱ्यांच्या चटदिशी लक्षात न येणारा अबोला या स्वरुपात होऊ शकते. तेव्हा भांडणाचे मूळ कारण काहीही असले तरी त्यातून आवाज चढविणे, उखाळ्या पाखाळ्या काढणे, कटु शब्द बोलणे या गोष्टी आपण गृहीत धरतो. या भांडणानंतर अनेक दिवस, परस्परांच्याकडे क्रुद्ध नजरेने पाहणे हा प्रकारही चालू राहतो. या गोष्टीतून भांडणाचे मूळ कारण तसेच शिल्लक राहते. फक्त त्यात तणावाची भर पडते. नवीन वैद्यक शास्त्र आपल्याला सांगतेय की, रक्तदाब व हृदयविकार यांचे मूळ कारण 'तणाव.'

आता याला काही पर्याय आहे का? कारण मतभेदाचे मुद्दे, घरात काय, शेजारी, सहकारी यांच्याशी नेहमी येणारच. तमाम जनतेच्या शिक्षणासाठी आपल्या सरकारने दूरदर्शनचा पसारा वाढविला आहे व त्यावरील कार्यक्रम आपण पाहात असतो. त्यातून आपल्याला पुष्कळ शिकता येण्याजोगे आहे. विमान युगामुळे एक झाले की, मोठमोठे पुढारी, राष्ट्रधुरीण यांच्या गाठी वारंवार पडतात. राष्ट्राच्या संबंधातील अत्यंत महत्त्वाचे प्रश्न, महाभेद, कठीण समस्या सोडविण्यासाठी अशा भेटींची अर्थात जरुरी असते. याचे दूरदर्शनवरील वृत्तांत आपण पाहतोच. मोठ्या व्यक्तींच्या भेटी, विमानात चढता उतरतानाचे प्रसंग, हारतुरे हे आपल्या परिचयाचे झाले आहेत. यानंतर गाठीभेटी किती वेळ झाल्या तेही कळते. या मोठ्या व्यक्ती एकमेकांशी काय बोलल्या याचा तपशील जरी आपल्याला कळला नाही, तरी दूरदर्शनवरील निवेदक असे सांगतात की, या व्यक्ती एकमेकांकडे पाहून हसल्या, त्यांनी प्रेमाने हस्तांदोलन केले. त्यानंतर ज्या वाटाघाटी झाल्या त्या सौहार्दपूर्ण वातावरणात झाल्या. वाटाघाटीतून एकमेकांच्या भूमिका स्पष्ट झाल्या इ. इ. त्यानंतर कोणी कोणाला भोजन दिले, निरोपाचा 'टा टा' किती भावपूर्ण होता याचीही माहिती आपल्याला मिळते. कधी कधी असे दिसते की 'मूळ प्रश्न' आहे तिथेच असतो; पण महत्त्वाचे हे, की सर्व बोलणे सामंजस्यपूर्ण वातावरणात होते आणि तणाव वाढत नाही.

या मोठ्या लोकांच्या वागण्याच्या पद्धतीतून आपल्यासारख्या सामान्यांना नक्कीच शिकता येईल. प्रथम पाहिलेच की, आपल्या आयुष्यात मतभेदाचे प्रसंग घरगुती, शेजारी, सहकारी यांच्याशी येतात. या मतभेदातून पारंपारिक पद्धतीची भांडणे आपल्या परिचयाची आहेत पण मोठ्या लोकांचे अनुकरण करून सामंजस्याने भांडण कसे चालू ठेवता येईल हे एक उदाहरण घेऊन स्पष्ट करतो.

समजा तुमच्या शेजारी, फ्लॅटमध्ये राहणाऱ्या कुटुंबाने कौतुकाने पामेरिअन जातिवंत कुत्रे आणले आहे. त्याची किंमत, जातकुळी याच्या कथा तुम्हाला ऐकायला लागणारच. पण तुम्हाला कुत्रा जवळ आलेला

आवडत नाही आणि तुमच्या बायकोला कुत्र्याची भीती वाटते. आता पामेरिअन झाले, तरी कुत्रे भुंकणार, अंगावर उड्या मारणार आणि नको तेथे घाण करणारच. तुमच्या पायात नको असताना घोटाळणार आणि तुम्ही त्याला पायाने दूर करायचा प्रयत्न करणार अथवा 'हड' म्हणणार. जातिवंत पामेरिअन कुत्र्याला 'हड' म्हटलेले तुमच्या शेजारीणबाईंना थोडेच खपणार? यातून प्रथम कुरबुर, त्यानतर छोटे प्रसग व अखेर कडाक्याचे भांडण यांची चढती भाजणी (गणितातील एक लुप्त झालेला प्रकार) कशी होईल याची वाचकाना सहज कल्पना करता येईल. आता भाडणातून काय होणार तर शेजाऱ्यांशी पूर्वी हास्य-मुद्रेने हात वर करणे हे थाबून कठोर दृष्टिक्षप येणार. *बायकांच्या सवयीप्रमाणे*, हवेत फेकले जाणारे वाग्बाण वाढणार. यामुळे पामेरिअन कुत्र्याचे वागणे बदलेल का? नाहीच. फक्त तणाव वाढला या ऐवजी दूरदर्शन पाहून जे शिक्षण झाले त्याच्या व्यवहारात असा उपयोग करता येईल

प्रथम तुम्ही मोठ्या मनाने शेजाऱ्याना निमंत्रण देता की, आज सध्याकाळी उभयता चहाला या. आपण थोडे बोलू या. शेजारी ते आमंत्रण स्वीकारतात. सध्याकाळी शेजारी-शेजारीणबाईंचे स्वागत तुम्ही उभयता, 'ब्रॉड स्माइल' ने (सर्व दात दाखवणारे) करता. बसल्यानतर एकमेकाचे कुशल पुशिले जाते. नंतर तुमची पत्नी बटाटेवडा आणि चहा आणते. यामुळे वातावरण स्निग्ध आणि सौम्य होते.

नंतर मुख्य बोलण्याला सुरुवात होते. तुम्ही सागता की, पामेरिअन कुत्र्याच्या अवेळी भुंकण्यामुळे तुमची रविवार दुपारची झोप बिघडते. शिवाय कुत्र्याला अंगावर उड्या मारायची संवय आहे. त्यामुळे पत्नीला फार भीती वाटते. कारण लहानपणी शाळेत तिच्या मैत्रिणीला कुत्रे चावले होते व त्यासाठी चौदा इंजेक्शने घ्यावी लागली. याबद्दलची तिची आठवण अद्यापी ताजी आहे. तुमची पत्नी याला दुजोरा देते व आणखी काही तक्रारींची भर सौम्य शब्दात घालते.

तुमचे शेजारी उत्तरतात. रविवारच्या जड जेवणानंतर दुपारी झोपणे हे अनारोग्यकारक आहे असे अनेक डॉक्टरांचे मत आहे तेव्हा रविवारची झोप जर बिघडली तर तो अप्रत्यक्ष फायदाच म्हटला पाहिजे. शेजारी असेही नम्रपणे *सुचवितात की, 'जॉनीला'* तिचा उल्लेख कुत्रे म्हणून केलेला आवडत नाही. जॉनी ही अगावर उड्या मारते ती प्रेमाने, चावण्याकरिता नाही आणि चावलीच तरी ती जातिवंत असल्यामुळे काही होणार नाही, याची हमी आम्ही घेतो. तेव्हा वहिनींची भीती *व्यर्थ* आहे. उलट जॉनी प्रेमाने जवळ येत असताना, पायाने तुम्ही तिला ढकलले तर तिच्या मनात तणाव निर्माण होतो व झाला आहे. त्यासाठी तिला मानसोपचार तज्ज्ञाकडे नेण्याचा खर्च करावा लागेल. त्याची जबाबदारी कोणावर? इ. इ.

या सर्व बोलण्याचा फायदा असा की, परस्पराच्या भूमिका सामजस्यातून स्पष्ट होतात.

यानंतर इतर प्रश्नांवर चर्चा चालू राहते. तुमच्या हाऊसिंग को-ऑपरेटिव्हच्या सेक्रेटरीचे व्यवहार सरळ नाहीत असे तुम्ही मत प्रदर्शित करता. शेजारी याच्याशी सहमत दर्शवितात. नंतर शेजारीणबाई म्हणतात, 'वरच्या ब्लॉकमधल्या सुदेष्णाबाई घरी, सुझुकी गाडी आल्यापासून 'ह्या' वागतात.' तुमच्या पत्नी त्याला दुजोरा देतात–'ह्या का अगदी ह्याच वागतात.' मोलकरणीचा संप बारगळल्याबद्दल सर्वजण समाधान व्यक्त करतात. काल पाऊस फार झाला व आज दुपारी फार उकडले यावर मतैक्य होते. नतर शेजारी असे सुचवितात की, पुढील चर्चा त्यांच्या घरी सोईच्या दिवशी व्हावी. याला तुम्ही आनंदाने संमती देता.

आता पामेरिअन झाले तरी कुत्र्याचे भुंकणे व घाण *करणे या गोष्टी कायम रहाणारच.* तरी पण प्रश्न या पद्धतीने हाताळण्यामुळे परस्परात सामंजस्याचे वातावरण रहाते. काही वाचक म्हणतील की, हे सामजस्याने भांडणे खर्चिक प्रकार आहे; पण तणावामुळे हृदरोग होतो, हे त्यानी विसरू नये. सामजस्याने भाडणे हे नवीन शास्त्र बनत आहे हे आपण नीट घ्यानात ठेवले पाहिजे.

**वाचकांच्यासाठी गृहपाठ**

वरील विवेचन नीट समजून घेऊन खालील संभाव्य भांडणाचे प्रसंग कसे सोडवाल?

१) लग्नाचा वाढदिवस साजरा करण्यासाठी, तुमच्या पत्नीने (मैत्रिणीने घेतली तसली) रु ५००/– च्या साडीची मागणी केली आहे. हा नाजूक प्रसग कसा हाताळाल?

२) तुमच्या साहेबांनी तुम्हाला केबिनमध्ये बोलावून कामाबद्दल शाबासकी दिली असताना, तुमचा सहकारी, साहेबानी तुमची 'चपी' केली असा अपप्रचार मित्रमडळीत करीत आहे या प्रश्नावर सहकाऱ्याशी चर्चा कशी कराल?

टिप्स् –

प्रश्न सुटण्यापेक्षा त्यावर चर्चा चालू ठेवणे व तो सुटत आहे असे वाटत रहाणे हे जास्त महत्त्वाचे असते.

मुख्य प्रश्नाशी ज्या गोष्टीचा काही संबंध नाही अशा अनेक गोष्टींवर मतैक्य होऊ शकते. अशा गोष्टी शोधून काढा. □


## परसूच्या पशुकथा

**वसंत सबनीस । किंमत १२ रुपये**

परसू म्हणजेच परशुराम. बुटका, पहेलवानी देहाचा, बारीक डोळ्याचा आणि पिसाट केसाचा परसू, अचानक शाळा सोडून गेला तो वीस व र्षांनी भेटला. या काळात तो सारं जग भटकला. प्राणिसंग्रहालयातील नोकरी, संस्थानिकांबरोबरच्या शिकारी, मलायात हिंस्र श्वापदाचा व्यापार व शेवटीसर्कसबरोबर केलेली भटकंती असा त्याचा हा प्रवास होता. या प्रवासातील त्यानी सांगितलेल्या शिकारीच्या, जंगलातील वास्तव्याच्या व वन्य प्राण्यांच्या अनेक स्वभाववैशिष्ट्यांच्या या कथा...

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०.

# मुंबई श्रीमंत आहे; पण महापालिकेजवळ पैसा नाही... महापौर

# सावरकरांवर पूर्ण लांबीचा चित्रपट निघावा..शिवसेनाप्रमुख

दोन मुलाखती । सुभाष काळे

एप्रिलमध्ये मुंबई महापालिकेचा निवडणूक 'हंगामा' चालू असताना एक आठवडाभर मुंबईत होतो. सर्वच राजकीय पक्षांची परिस्थिती फारशी चांगली दिसत नव्हती. जोर जाणवत होता तो शिवसेनेचा. शिवसेनेनी 'मुंबई' केंद्रशासित करण्याच्या तथाकथित प्रयत्नाला जोरदार आव्हान दिले होते. साहजिकच त्याची प्रचारावर पकड दिसून आली. अर्थात एवढा विजय मिळेल असे वाटले नव्हते. पूर्वीपेक्षा परिस्थिती सुधारेल असा माझा अदाज होता; पण प्रत्यक्ष निकाल बाहेर पडले तेव्हा शिवसेनेनी अभूतपूर्व मुसंडी मारलेली दिसून आली. शिवसेनेचा विजय हा मराठी माणसाच्या अस्मितेचा आविष्कार ठरला. १९७७ पासून काहीशी निष्प्रभ झालेली शिवसेना परत एकदा तेजाने चमकू लागली. 'बांबेचे मुंबई', 'स्वच्छ मुबई', 'सुंदर मुबई'ची घोषणा शिवसेनेने केली. त्याचबरोबर शिवसेना प्रमुखानी मुंबई बाहेरून येणाऱ्याना प्रतिबध करण्याचा विचार बोलून दाखविला. त्यावर उलट सुलट चर्चा सुरू झाली.

या संदर्भात मी महापौर श्री. छगन भुजबळ यांची भेट घेतली. ते १९७३ पासून नगरसेवक आहेत. विसर्जित महापालिकेतील शिवसेना गटाचे ते प्रमुख होते. शिवाय माझगाव विधानसभा मतदार संघातून ते विधानसभेवर निवडूनही आले आहेत. मागच्या एका भेटीत परिचय झालेला असल्याने चिठ्ठी पाठविताच त्यानी केबिनमध्ये बोलावून घतले. आत जाऊन त्याच्या उजव्या बाजूला बसलो. महापौराच्या खुर्चीमागे काचेवर 'यतो धर्मस्ततो जयः' हा श्लोक लिहिलेला.

'काय कसे काय ? ठीक चालले आहे न? आज कोणीकडे दौरा?' ... भुजबळ

'साप्ताहिक माणूससाठी मुलाखत हवीय म्हणून मुद्दाम आलो.' ...मी.

'ठीक आहे, जरा बसा. वेळ आहे ना ? या सर्वांची काम मार्गी लावून मग बसुयात गप्पा मारीत.'...भुजबळ.

'काही हरकत नाही '...मी

चागले तासभर बसावे लागले; पण त्या काळात बरेच काही पाहताही आले. एक मुस्लीम स्त्री महापौरांना भेटायला आली होती. ती सागत होती ती पाकिस्तानची आहे. पासपोर्ट वगैरे काहीच न काढता नवरा मला येथे घेऊन आला आहे. परत पाकिस्तानमध्ये चला म्हटले, तर त्याची यायची तयारी नाही. घर नसल्यामुळे मुलाबाळाचे हाल होत आहेत. मला पाकिस्तानमध्ये जायचे आहे तर आपण यात लक्ष घाला. महापौरानी पोलीस कमिशनरला फोन करून केस त्यांच्या कानावर घातली.

दुसरा किस्सा एका इंग्रजी पत्राचा. शिवछत्रपती स्मारकाच्या सदर्भात नेरूरकरानी इंग्रजीत पत्र लिहिले होते. पत्र पहाताच महापौर भडकले. मला इंग्रजी येत नाही. पत्र शिवाजी महाराजासबंधी आहे ते मराठीत घेऊन या म्हणून त्यानी शिपायाला पिटाळले. इंग्रजी येत नाही असे नाही पण त्यानी आपल्या रागडया, मराठमोळ्या वृत्तीने मराठीचा आग्रह चालविलेला आहे

साधारणतः तासानंतर सर्व केबिन रिकामे झाले तेव्हा माझ्याकडे वळून,

'हं बोला काळे करा सुरुवात ?'

¤

**बाँबेचे 'मुंबई' करण्याच्या दृष्टीने आपण कोणती पावले टाकली आहेत ?**

— महापालिकेने पूर्वी ठराव केलेला आहेच.

**पण नूतन मुख्यमंत्र्यांना आता परत नवा ठराव हवा आहे. त्याचे काय ?**

— ठीक आहे त्याना हवा तर परत एकदा ठराव घेऊन तो पाठवून देऊ. आमच्या ठरावाची दखल घेऊन मुख्यमंत्र्यांनी परत विधीमडळात ठराव घ्यावा व केंद्रावर दबाव टाकून बाँबेचे मुबई करून घ्यावे हा झाला कायदेशीर मार्ग; पण कोणतेही परिवर्तन कायद्याच्या माध्यमातून होत नसते याची आपणाला कल्पना आहे. त्यासाठी मानसिक तयारी, लोकशिक्षण आवश्यक आहे. त्या दृष्टीने मी ठिकठिकाणी मराठी व मुंबई या नावाचा आग्रह धरायला सुरुवात केली आहे. माझा उल्लेख मी 'मेयर ऑफ मुंबई' असाच करतो. हे पहा माझे ओळखपत्र, त्यावर पण इंग्रजीत मुंबईच लिहिलेले आहे. गाडीचा नबर मराठीत आहे वृत्तपत्रे निरनिराळ्या सस्था दुकाने वगैरेनी मुबई असे लिहावे असा आमचा लोकाना आग्रह आहे. एकदा जनमानसात मुबई हे नाव प्रचलित झाले की, मग शासन काय निर्णय करते याला महत्त्व देण्याचेही कारण उरणार नाही.'

**मुंबईतील गर्दी कमी करण्याच्या हेतूपूर्तीसाठी मुंबईत येणाऱ्यांना प्रतिबंध करता येईल काय ?**

— आता आपण एक तासापासून काय चालले आहे हे पहाताच आहात. भेटायला येणाऱ्या दहा माणसात आठ माणसे नोकऱ्या किंवा स्टॉल्स परवाना मागायला येतात. या सर्वांना नोकऱ्या किंवा स्टॉल्स पुरविणे कसे शक्य आहे ? जरी ही माणसे मराठी असली तरी सर्वांनाच हे सर्व पुरविता येणार नाही. ठरवून दिलेल्या मर्यादेतच काम करावे लागेल. भरमसाठ लोक येतात, अनाधिकृतपणे राहतात. झोपडया उठवितात. येथे क्षमता ५० लाख लोकाची आणि प्रत्यक्षात



¤

**श्री. छगन भुजबळ**
**मेयर ऑफ मुंबई**

¤

आहेत पंचाऐंशी लाख लोक. तेव्हा कुठे तरी प्रतिबंध करायलाच हवा ना?

**ते ठीक आहे. पण त्याची निश्चित काही रुपरेखा, कॉंक्रिट आयडिया आपल्या जवळ आहे का? कोणालाच मुंबईत प्रवेश द्यायचा नाही असे तर करता येणार नाही. त्यासाठी प्रसंग परत्वे येणारे, कायम वास्तव्यासाठी येणारे याचा विचार करून परवाना किंवा अन्य निश्चित स्वरूपाची काही यंत्रणा उभी करावी लागेल. कारण हा भारतातला पहिलाच प्रयोग आहे.**

— होय ते तर करावेच लागेल. त्यादृष्टीने आम्ही विचार विनिमय करतो आहोत.

**वाढत्या अनधिकृत बांधकामास आपण कसा आळा घालणार आहात?**

— मुंबईत कोठेही जाऊन कोणी झोपडपट्टी उभी करू शकतो, बांधकाम करू शकतो अशी बेकायदेशीर उद्योग करणाऱ्या लोकांची समजूत आहे. ती समजूत प्रथम आम्हाला काढावी लागेल. त्यासाठी कठोर उपाय योजावे लागतील, कारण प्रशासन यंत्रणा दुबळी असेल तर अनधिकृत कामास उत्तेजन मिळते. त्या दृष्टीने प्रशासन यंत्रणेचा वचक आम्ही निर्माण करू. कोठेही अनधिकृत बांधकाम होत असल्याचा सुगावा लागताच, महापालिका अधिकारी तेथे पोचतील व ते काम पाडून टाकले जाईल.

**मुंबईतील प्रदूषणाबाबत आपण काय करायचे ठरविले आहे?**

—एक तर कचरा, घाण हटविणे हा एक भाग झाला. तो नाहीसा करणे, स्वच्छता राखणे हे आमचे काम आहे. 'स्वच्छ मुंबई, सुंदर मुंबई' हे माझ्या कार्याचे लक्ष्य आहे. दुसरा भाग हवेतले प्रदूषण. ते कमी करण्यासाठी लक्षावधी रोपांची लावण आम्ही या पावसाळ्यात करणार आहोत. सध्या अस्तित्वात असलेले बगीचे अधिक सुंदर—आकर्षक करण्याचा प्रयत्न राहील. शिवाय महापालिकेकडे रिकाम्या असलेल्या जागेवर नव्याने बागा लावल्या जातील. त्याला थोडा कालावधी लागेल इतकेच.

**धारावीतली त्याचप्रमाणे अन्य ठिकाणच्या झोपडपट्टयांचा सुधारण्याच्या दृष्टीने काय करणार?**

—त्यासाठी राज्य व केंद्राने पंचवीस कोटी रुपये मंजूर केलेले आहेतच. त्याचा पाठपुरावा करणे, काम करून घेणे हा आमचा कार्यक्रम असेल. मी विधीमंडळाचा सदस्य असल्याने ते शक्य आहे. पाच वर्षाच्या काळात आमचा येणारा प्रत्येक महापौर त्याचा पाठपुरावा करेल.

**या नुसत्या पाठपुराव्याने काम होईल का?**

—नाहीतरी त्यासाठी आम्ही दुसरे काय करणार? मुंबई श्रीमंत आहे. मुंबईतले लोक श्रीमंत आहेत, याचा अर्थ महापालिका श्रीमंत आहे असा होत नाही. तुमच्या पिंपरी—चिंचवडसारखे आमचे कोटयावधी रुपये पडून नाहीत. आमचे प्रत्येक काम पैशासाठी नडते. महापालिकेजवळ तेवढा पैसा नाही. कारण आम्ही श्रीमंतांवर टॅक्स बसवू शकत नाही. त्यांच्या उत्पन्नावर टॅक्स वसूल करते ते केंद्र व राज्य सरकार. मुंबईत ४५ लाख लोक कर भरतात. त्यांची व्यवस्था आम्ही सहज करू शकतो; पण ४५ लाख लोकांच्या टॅक्समधून आम्हाला ८५ लाख लोकांची सोय करावी लागते. त्यांना पाणी, वीज, औषधे, शिक्षण या किमान सोयी माणुसकी म्हणून सर्वांनाच पुरवाव्या लागतात आणि त्याचा खर्चही बराच आहे. रस्ते दुरुस्ती, वगैरे अन्य बाबीही आल्याच. त्यामुळे आर्थिक ओढाताण फार होते. केंद्र व राज्य सरकारची मदत झोपडपट्टी सुधारण्यासाठी घेणे अपरिहार्य आहे.

**मुंबई महापालिका कारभार सुधारण्यासाठी आपण कोणकोणते नवीन उपक्रम हाती घेणार आहात?**

मुंबई महापालिका म्हणजे १४ महिने बंद पडलेली एक गाडी आहे. गाडी दुरूस्त करायची तर ती प्रथम टोचण करून किंवा ढकलत ढकलत गॅरेजला न्यावी लागते. मग दुरुस्ती, रंग रिपेरी वगैरे. प्रशासकाच्या १४ महिन्याच्या काळात बंद पडलेली ही मुंबईची गाडी आता कुठे आमच्या शिवसेनेच्या गॅरेजमध्ये जनतेने पाठविलेली आहे. यापुढे आम्ही पाना लावणार.

**पण पाना लावायच्या आधी फॉल्ट तर लक्षात यायला हवा ना? गाडी एअर लॉक असायची आणि आपण गिअर बॉक्स खोलायचे हे योग्य आहे का? थोडक्यात सांगायचे तर मुंबईच्या नागरी समस्यांचा प्रथम पूर्णपणे अभ्यास व्हायला हवा, असे मला वाटते.**

हो ते तर खरेच आहे. आता कुठे आम्हाला येऊन दोन महिने झाले आहेत. बघू या करता येते ते.

**मुंबईत मराठी माणसांची पिछेहाट होत असल्याबद्दल आपण बोलता पण ही पिछेहाट थांबविण्याच्या दृष्टीने आपल्यासमोर कोणता कार्यक्रम आहे?**

—प्रत्येक उद्योगातील भरतीवर लक्ष ठेवून त्या त्या प्रमाणात मराठी माणसाला काम मिळावे असा आमचा प्रयत्न असेल. थोडक्यात मी तुम्हाला इतकेच आश्वासन देऊ शकतो की, शिवसेनेच्या आगामी पाच वर्षातील कारकिर्दीत मराठी माणसाची शान आणि मान उंचावलेली असेल.

**आता शेवटचा प्रश्न विचारतो. काल मी आपल्या महापौर निवासस्थानी गेलो होतो. एकीकडे आपला सुंदर, अलिशान बंगला तर दुसऱ्या बाजूला अर्धवट बांधकाम असलेले सावरकर स्मारक दिसले. मनाला काहीसे विचित्र वाटले. आपल्याला त्यात काही करता येणे शक्य नाही का?**

—आम्ही काय करावे? दहा-पंधरा लाखाची जागा आम्ही मोफत दिली. स्मारक समितीला काम होत नसेल तर त्यांनी बाळासाहेबांसारख्या व्यक्तीला त्यात सहभागी करून घेऊन स्मारकाचे काम पूर्ण

करावे. आपण बाळासाहेबांना भेटणारच आहात. तेव्हा त्यांच्याशी हा विषय बोला म्हणजे ते निश्चित काही तरी सांगतील.

¤

महापौरांच्या भेटीनंतर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्याकडे गेलो. पहिल्या दिवशी भेट झाली नाही. दुसरे दिवशी वेळ मिळाली; पण पावसामुळे भेट रद्द करावी लागली. तिसरे दिवशी ते भेटले. चांगल्या तासभर गप्पा झाल्या. एकंदर मुलाखत चांगलीच रंगली.

**वीस एप्रिलचा सा. माणूसचा अंक कसा काय वाटला ?**

– वा ! फारच छान. कव्हरेज आणि मांडणी आवडली. आपली लेखनशैली चांगलीच धारदार आहे. एकंदर अंक सुंदर होता यात वादच नाही.

**बॉम्बेचे ' मुंबई ' करण्याच्या दृष्टीने काही हालचाली ?**

– महापालिकेत आमची सत्ता आली आहे, आता तो प्रश्न आम्ही निश्चितपणे मार्गी लावू.

**मुंबईत येणाऱ्या लोकांचा लोंढा थांबविण्याची आवश्यकता आपण प्रतिपादन करता, पण त्याबाबत आपल्याकडे काही निश्चित योजना आहे का ?**

– निश्चित कल्पना नाही असे नाही. पण त्याचा विपर्यास केला जात आहे. लोकांना जबाबदारीची जाणीव हवी. केवळ भारतीय आहेत, पोट भरायला आले आहेत म्हणून त्यांना मुंबईत घुसू द्यावे, कसेही राहू द्यावे, असे मला वाटत नाही. मुंबई महाराष्ट्राची राजधानी आहे. मुंबईचे बहुढंगित्व कायम राखण्यासाठी प्रयत्न व्हावेत हे मला मान्य आहे. पण त्याचा अर्थ मुंबईचा शिकॅगो करावा असा होत नाही. आज शिकॅगो शहरात दिवसाढवळ्या खून पडत आहेत. तसे मुंबईत घडले तर चालेल का ? आज मुंबईत जी काही गुन्हेगारी चालते ती या झोपड्यांच्या आधारानेच. मुंबईचा अनियंत्रित विस्तार वाढत जाईल तसतशी गुन्हेगारी वाढत जाणार हे सांगायला ज्योतिष्याची गरज नाही. मुळात हा प्रश्न आहे तो जबाबदार आणि बेजबाबदार वृत्तीच्या नागरिकांचा. जबाबदारीचा विचार न करता वागले की बेजबाबदारी वज्रलेप होते. अन्न, वस्त्र, निवारा, पाणी या माणसांच्या मूलभूत गरजा. त्याची उपलब्धता किती आहे आणि त्यात कितीजण सामावले जाऊ शकतात याचा विचार व्हायला हवा. मुंबईतील पंचेचाळीस लाख लोक कर भरतात आणि त्या पैशात मुंबई महापालिकेला पंच्याऐंशी लाख लोकांची व्यवस्था करावी लागते. याचा कुठेतरी विचार करावा लागेल की नाही ? हा प्रश्न प्रांतीयवादाचा नाही. ' कलकत्ता इज अ डाईंग सिटी ' असे म्हणून राजीव गांधींनी ज्योती बसूंना गोत्यात आणले खरे; पण दिल्लीच्या बाबतीत ते स्वतःच अडचणीत आले. ' कलकत्ता इज अ डाईंग सिटी' तर ' मुंबई इज अ सिंकिंग सिटी ' असे म्हणावे लागले. मराठी अर्थ योग्य तो लावा–म्हणजे मला कलकत्ता हे मरू घातलेले शहर आहे तर मुंबई बुडत घातलेले शहर आहे असे म्हणावयाचे आहे. मी बोललो की ' बाळ ठाकरे ' संकुचित प्रांतीयवादी आहेत म्हणून लगेच कोल्हेकुई सुरू होते. पण हीच अडचण पंतप्रधान गांधींनी बोलून दाखविली की ते वास्तववादी ठरतात. हे सर्व सांगण्याचा हेतू इतकाच की, मूळ प्रश्नाकडे लक्ष दिले जावे. एकीकडे विचार आणि



¤

**अजून समाधान नाही**
**–श्री. ठाकरे**

¤

दुसरीकडे मतांसाठी लाचारी हा धंदा झाला. काय वाचवायचे, कोणाला वाचवायचे, कसे वाचवायचे याचा नीट विचार व्हायला हवा. यावर काही शहाणे तोडगा सुचवितात की–ग्रामीण भागात मोठे उद्योगधंदे काढावेत ! हे मूर्खपणाचे विचार आहेत. मुंबई महाराष्ट्राची राजधानी आहे. मराठी माणूस कामधंद्यासाठी मुंबईची नाही तर मग काय बंगलोर–मद्रासची वाट धरेल ? महाराष्ट्राच्या राजधानीवर प्रथम कोणाचा हक्क असेल तर तो मराठी माणसाचा. उपाययोजना करायला हवी ती परप्रांतीयांवर. सत्यनारायणाच्या प्रसादासारखे उद्योगधंद्यांचे परवाने वाटले जातात. त्याचा प्रतिबंध व्हायला हवा. कोणत्या प्रांतात किती, कोणते व कशा स्वरूपाचे उद्योग-धंदे काढायचे यावाबत राष्ट्रीय धोरण आखले जायला हवे. इतकेच नव्हे तर त्याचा कठोरपणे पाठपुरावा करायला हवा. मुंबईतील मराठी माणसांची काळजी आम्ही नाही घेतली तर उपरे त्यांची वाट लावतील ! त्यासाठी परवाना पद्धतीची गरज आहे. आम्ही त्याचा पुरस्कार करतो.

**आपण निरनिराळ्या अनेक संस्था मुंबईत चालविता, त्याला सढळ हाताने मदत करता असे असताना सावरकर स्मारकाकडेच आपले दुर्लक्ष का ?**

– दुर्लक्ष मुळीच नाही. सावरकर स्मारकाची जो जागा आहे ती शिवसेनेनेच मिळवून दिलेली आहे. जागा मिळविण्यापुरता स्मारक विश्वस्त मंडळींनी आमच्याशी संपर्क ठेवला. त्यानंतर बैठकीला नाही की कार्यक्रमाला बोलावणे नाही. ' कामा पुरता मामा ' हे या स्मारक विश्वस्त मंडळींचे धोरण. जयंतराव टिळक तिथे आहेत ना ? ते काय करतात ? पुण्यात टिळक स्मारक बांधताना त्यांनी जे जे काही केले ते ते सावरकर स्मारकासाठी ते का नाही करीत ? टिळक स्मारकासाठी त्यांनी राज्या–राज्यांच्या मुख्यमंत्र्यांपासून ते पंतप्रधान इंदिरा

गांधीपर्यंत अनेकांकडून लाखो रुपयांच्या देणग्या गोळा केल्या. तशा सावरकर स्मारकासाठी त्यांना जमविता येत नाहीत का ? का नुसतेच स्मारक समितीचे अध्यक्षपद भूषविण्याचा त्यांचा विचार आहे ? काळे, हे वाक्य टाळू नका. आहे तसे नोट करा. टाळण्याचे काही कारण नाही. लोकमान्य टिळक त्यांचे आजोबा होते आणि सावरकर त्यांच्या नात्यातले नाहीत, असे तर नाही ना ? जयतरावांनी आपली काँग्रेसमध्ये आहे ती पुण्याई खर्च करून सावरकर स्मारक पूर्ण करावे. विनाकारण रेंगाळू नये. पण काळे ह्या प्रश्न तुम्ही मला का विचारता ? *बाळ ठाकरेंशिवाय तुम्हाला कोणी सापडत नाही का ?*

तसे नव्हे. आपण तो मार्गी लावाल ह्या तर भाग झालाच; पण काल मी महापौर निवासात गेलो होतो. त्यावेळी शिवसेनेचे महापौर एकीकडे अलिशान बंगल्यात राहतात आणि बाजूला एका क्रांतिकारकाचे स्मारक अर्धवट अवस्थेत पडून आहे, हे पाहून अस्वस्थ झालो. बरोबर आपले मनोहर जोशी होते. त्यांनाही मी वेदना बोलून दाखविली शिवसेनेच्या प्रत्येक महापौराला ही गोष्ट टोचली तर त्यांच्यापैकी कोणी तरी आव्हान स्वीकारून काम पूर्ण करेल. म्हणून हा प्रपंच. असो. आपला चित्रपट सृष्टीशी चांगला घनिष्ट संबंध आहे. तेव्हा सावरकरांवर एखादा चित्रपट का नाही काढत ?

– दोन तीन चित्रपट निघाले आहेत ना ? मला वाटते अडवानी माहितीमंत्री असताना एक निघाला आणि दुसरा शताब्दीच्या काळात.

पण ते पंधरा वीस मिनिटांचे झाले. मी पूर्ण लांबीच्या चित्रपटाबद्दल बोलतो आहे.

– चित्रपटासाठी सहकार्य करायचे नाही असे काही नाही सावरकरांच्या जीवनावरील *नाटकासाठी आम्ही माधव खाडीलकरांना* मदत केली. नाटकाला उठाव मिळावा म्हणून जे जे काही करणे आवश्यक होते सर्व काही आम्ही केले.

नाटक काढणे फार अवघड आहे असे मला वाटत नाही. शिवाय त्यात विशेषता काही नाही. अर्थात हे मी चित्रपटाच्या तुलनेने बोलतो आहे. आपण ' पॅपिलॉन ' चित्रपट पाहिला का ?

– नाही ! मी तो पाहिलेला नाही.

त्यात एका गुन्हेगार कैद्याने तुरुंगात भोगलेल्या हालअपेष्टा आणि तेथून सुटका करून घेण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे चित्रीकरण आहे. भयानक हालअपेष्टांच्या सहानुभूतीपोटी, परदेशात एका कैद्यावर चित्रपट निघतो, तर सावरकरांसारख्या ज्वलंत देशभक्तावर का निघू नये ? हे आपल्या सर्वांसाठीच लांच्छनास्पद आहे.

– काळे तुमचे म्हणणे मला पटते. चांगली स्क्रिप्ट घेऊन सावरकरांवर असा जर कोणी पूर्ण लांबीचा चित्रपट काढीत असेल तर त्याला लागणारा सर्व पैसा पुरविण्याची व त्याशिवाय अन्य सर्व सहकार्य करण्याची माझी तयारी आहे; पण त्यासाठी माझ्या काही अटी आहेत जर त्या मान्य असतील तरच.

म्हणजे एक प्रकारे हस्तक्षेपच ना ?

– नव्हे ! एवढा खर्च करायचा तर प्रयोग म्हणून नाही. तर एक उत्कृष्ट चित्रपट व्हावा, प्रत्येक पै कारणी लागावी ही त्यामागची इच्छा.

बोला मला आपल्या अटी जाणून घ्यायच्या आहेत.

– प्रथम चांगली स्क्रिप्ट हवी. तरुण पिढीवर चांगला परिणाम घडेल अशा प्रभावी भूमिका करणारे, भूमिका जगणारे कलाकार पाहिजेत. आजकालच्या मराठी चित्रपटात शिवाजी महाराज दाखविले जातात पण त्यांचे कल्ले कसे असावेत हेही ज्यांना समजत नाही, अशा दिग्दर्शकांचे सल्ले मला मान्य नाहीत. मराठ्यांचे कल्ले आतल्या बाजूला तर राजपूतांचे बाहेरच्या बाजूला वळलेले असतात. हे त्यांना समजायला हवे. धिग्रा–धिंग्रासारखाच असला पाहिजे. नाटकी नको. मी स्क्रिप्ट, कलाकार, दिग्दर्शक या गोष्टींना मान्यता दिल्यानंतरच *चित्रीकरणाला प्रारंभ करता येईल. या माझ्या अटी आहेत.* दोन भागात चांगला चित्रपट होऊ शकेल.

दोन भागात म्हणजे दोन स्वतंत्र चित्रपट ?

– हो जन्म ते बॅरिस्टर होईपर्यंतचा काळ. नंतर सुधारक सावरकर. दोन नाही तर निदान संपूर्ण लांबीचा एक चांगला चित्रपट होऊ शकतो. गांधीवर चांगला चित्रपट निघाला. सावरकरांवरही चांगला चित्रपट निघणे अत्यंत आवश्यक आहे. यात वादच नाही. बरे झाले तुम्ही एका चांगल्या विषयाला तोंड फोडले ते. माझे त्याला संपूर्ण सहकार्य राहील.

आता थोडे राजकारणाबद्दल– ' महाराष्ट्राच्या सत्ताबदलाबाबत ' आपली प्रतिक्रिया काय ?

– दिल्लीश्वरांनी दादांना ज्या पद्धतीची वागणूक दिली ती पाहता दादांनी राजिनामा दिला ते योग्यच केले. स्वाभिमान गुंडाळून ठेवून राजकारण खेळायचे, महाराष्ट्राच्या अस्मितेचा विचार न करता लोटांगणे घ्यायची, त्यापेक्षा खुर्ची सोडलेली काय वाईट ? दादांच्या कृतीचे मी जाहीरपणे स्वागत केलेले आहे

पण यापूर्वी दादांवर असे किती तरी अपमानाचे प्रसंग येऊन गेले. विशेषत. इंदिराजींच्या काळात. असे असताना याचवेळी दादा एवढे निकराला का आले ?

– दादा त्यावेळी गप्प बसले खरे पण तो काळ वेगळा होता. तेव्हा गप्प बसले म्हणून आताही गप्प बसावे असे काही नाही.

नूतन मुख्यमंत्री आपली टर्म पूर्ण करतील का ?

– टर्म किती वर्षांची ? पाच वर्षांची ? दोन वर्षांची की वर्षाची? अलीकडे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांची आणि मुंबईच्या महापौराची टर्म सारखीच झाली आहे. वर्षाला मुंबईचा महापौर बदलतो तसे मुख्यमंत्रीही बदलतात. फार काळ निलंगेकर टिकतील असे वाटत नाही.

या अस्थिरतेचे दुष्परिणाम राज्यावर होतात त्याचे काय ?

– कोणते दुष्परिणाम ?

निवडणुकीत दिलेली आश्वासने पूर्ण न करण्यामुळे होणारे दुष्परिणाम.

– अहो, निवडणुकीत आश्वासने नाही तर काय द्यायचे ? आणि कोणता काँग्रेसवाला कधी या आश्वासनांचा विचार करतो ? राजीव गांधी मात्र काही तरी चांगले करतील असे वाटते आहे. काल त्यांची मी टि. व्ही. वर अमेरिका भेट पाहिली. त्यांच्या बोलण्यात मुत्सद्दीपणा दिसला, विचारात प्रगल्भता जाणवली. शिवाय अडचणीच्या प्रश्नांना हसून बगल देण्याचे त्यांचे कसबही चांगले आहे. इंदिराजींनी ज्या चुका केल्या त्या टाळून त्यांनी राज्य केले तर धोका नाही; पण

अडचण होते ती कॉकसची–सल्लागारांची. मी त्याला गोतावळा म्हणतो. हे गोतावळ्यातले लोकच त्यांना नतर पोखरतात. तेवढी त्यानी सावधगिरी बाळगली तरी पुरेसे आहे. फक्त शका येते ती ही की संघर्षाचे राजकारण कितपत पेलवते ?

**दिल्लीकडून जरा आता जवळ मिरजेकडे. खैरुन्निसाबद्दल यापूर्वी मी आपल्याशी चर्चा केलीच आहे. तिचा स्टे व्हेकेट करून तिला मिरजेबाहेर हाकलले तरच तिचे चाळे बंद पडतील, नसता नाही. आता तर ती दोन वार्डातून नगरपरिषदेवर निवडून आली आहे. थोडक्यात चुकले, नसता ती नगराध्यक्षाच व्हायची.**

– चालायचेच ! आपल्याकडे लोकशाही आहे ना. त्या निवडून येण्याला फारसा अर्थ नाही. हा लोकशाहीचा दोष आहे. त्यात फक्त डोकीच मोजली जातात. गुणवत्ता नाही, पात्रता नाही. त्यामुळे मला लोकशाहीची चीड आहे असो. महाराष्ट्र सरकारने खैरुन्निसाची पार्श्वभूमी लक्षात घेऊन तिला रासुकाखाली डांबायला हवे. ती पाकिस्तानातली असेल तर खणा–नारळाने ओटी भरून तिची रवानगी झियाच्या राज्यात करायला हवी असे आमचे म्हणणे आहे. महाराष्ट्राचे नूतन मुख्यमंत्री ना. शिवाजीराव पाटील निलंगेकर त्याप्रमाणे पावले टाकतील अशी खात्री बाळगायला हरकत नाही.

**दादा एवढे खबीर प्रशासक, त्यांना तिची इत्थंभूत माहिती असताना त्यांनी तिला हलविले नाही तर निलंगेकर कसे हलविणार ?**

– काळे, सरकारात आहे कोण ? तर त्याचेच लागेबांधे असलेले लोक–एजट. तुम्ही पत्रकार आणि मी व्यंगचित्रकार. आपण लिहिण्यापलीकडे काय करू शकतो ? काळ बदलला आहे. आज रामशास्त्री प्रभुणे असते तर त्यांना रासुकाखाली तुरुंगात खितपत पडावे लागले असते. आजचे रामशास्त्री, रामशास्त्री नाहीत. आनदीबाईही निराळ्याच आहेत. राघोबाही निराळेच आहेत.

**शिवसेनेला १९ वर्षे पूर्ण झालीत. नुकताच आपण महापालिकेत चांगला विजय मिळविलेला आहे. पण शिवसेनेचा प्रारंभ कसा झाला हे मला जाणून घ्यायचे आहे.**

–'मराठी माणसांची पदोपदी होणारी मानहानी, अनुभवल्यानंतर काही तरी करायला हवे असे सतत वाटू लागते. त्या वैचारिक द्वंद्वातून शिवसेना जन्माला आली. जन्मानतरचा प्रारंभाचा जो काळ होता, त्यात आपल्या मराठी वृत्तपत्रानी आम्हाला सहाय्य केले असते तर त्याच वेळी काही वेगळे घडले असते.

**पण आपले व मराठी वृत्तपत्राचे संबंध त्यावेळी फार चांगले होते असे मी ऐकतो.**

–हो होते. त्यावेळी होते. तसे आजही चांगले आहेत. परवा ही सर्व मडळी माझ्याकडे पार्टीला येणार आहेत. पण या संबधाचा उपयोग काय ?

**प्रत्येक पत्रकार आपला सहानुभूतीदारच असेल असे आपण का समजता ? मी पण शिवसेनेचा टीकाकारच आहे. पत्रकारांनी चुकेल तिथे टीका करायलाच हवी.**

–अवश्य टीका करा. पण चुकेल तिथेच ना ? टीका पूर्वग्रहदूषित नको तर विधायक हवी. तो आध्रातला पत्रकार कोण ?

**रामोजी राव !**

–हं ! या रामोजी रावने एन. टी. आर. ला सत्तेवर येईपर्यंत मदत केली पण सत्तेवर आल्यानतर त्याने स्पष्ट बजावले की, तुम्ही चुकाल तिथे खडसावणार आणि त्याप्रमाणे त्याने एनाडूतून एन. टी. आर. ला सोलून काढले. तर दृष्टिकोन असा हवा होता पण मराठी वृत्तपत्रानी मराठी माणसाच्या हितावर निखारा ठेवला असे मला वाटते. मराठी माणसाच्या अहिताचे पाप त्यानी स्वत.च्या माथी मारून घेतले आहे काही मडळीना वाटायचे ते हे की 'कालचा हा व्यगचित्रकार एवढ्या वर कसा काय चढतो ?' त्यानी आंधळेपणाने आमचेवर हल्ले चढविले. त्यात भर नाठाळ लोहियावादी समाजवाद्याची. याना स्वत:ला कधी काही करता आले नाही. इतराचेही बघवत नाही. अर्थात हा झाला मागचा भाग. मराठी माणूस आज व्यावसायिक वृत्तीकडे वळला आहे हे शिवसेनेचे यश आहे. शिवसेनेने हे घडवून आणले. कोणी मान्य करो की न करो. मराठी माणसाची मान ताठ ठेवण्यासाठी आम्ही हे केले. हे आम्ही नम्रपणाने पण अभिमानाने सागू शकतो. कोणी म्हणाले तर घमेंडीनेदेखील. ही घमेंड कोणी जागी करू नये इतकेच !

**आम्ही म्हणजे पत्रकार त्याला घमेंड समजत नाही. मराठी माणसाची अस्मिता मानतो.**

–अहो शब्द वेगळा पण अर्थ तोच. साधे शिक्षण म्हटले तर विशेष वाटत नाही. पण प्रशिक्षण म्हटले की माणूस जरा मोठा, पोचलेला वाटतो शिक्षणाचे प्रशिक्षण, शासनाचे अनुशासन वगैरे भारदस्त शब्द आहेत पण त्याचा अर्थ एकच.

**एक व्यंगचित्रकार म्हणून कला क्षेत्र सोडून आपण गेली १९ वर्षे धकाधकीच्या राजकीय जीवनाचा अनुभव घेत आहात. खरोखरच त्यात आपण समाधानी आहात काय ?**

–मुळीच नाही. कालचेच पहा ना. मी तुम्हाला रात्री आठची वेळ भेटीसाठी दिली होती. त्याप्रमाणे इतक्या लाब तगड्यातोड करीत आपण येऊन गेलात. माझे पुस्तक 'कुचला आणि पलीते' प्रसिद्ध करताहेत ते प्रदीप दळवी येऊन जात आहेत. पण मला त्यात आनंद असूनदेखील काही करता येत नाही. ग्रंथाबाबत विचारविनिमय चर्चा करायची. पण मी गेले दोन दिवस अस्वस्थ आहे. त्याचे कारण मुबईत पाणी तुंबले. पाणी तुबले म्हटले की मी निराश झालो. महापौराना फोन केला. त्यांना बाहेर पडायला सागितले. त्यांनी सर्व नगरसेवक गोळा केले आणि रात्रभर आम्ही सर्वजण राणीच्या बागेत पावसात भिजत होतो. झाले काय तर, नगरसेवकानी आपापल्या भागातील कचरा गोळा केला पण तो वेळीच हलविण्याची व्यवस्था न केली गेल्याने तो सर्व पावसाबरोबर गटारात जाऊन गटारे तुबली. भरती आली की समुद्रातले पाणी गटारातून शहरात येते व पाणी तुबते. आम्ही लोकाना आश्वासने दिलीत, तेव्हा हे सर्व निस्तरणे आमचे काम आहे. स्वच्छ मुंबई, सुदर मुबईची कल्पना तर राबविणार आहोतच पण लोकाच्या सहकार्याची गरज आहे. निवडून येऊन दोनच महिने झाले. ही सर्व कामे करायची तर वेळ हा लागणारच. त्यात मुबईची जडणघडण जुनी आहे. मुबईचा विस्तार अवाढव्य असल्याने वेळ लागणे अपरिहार्य आहे. सागायचे इतकेच की, मी समाधानी नाही. या धकाधकीच्या जीवनातल्या समस्यानी मी व्यग्र आहे.

पृष्ठ २६ वर

# कोरेगावाभिवर
## ग्रामायन शिबिराच्या निमित्तानं...

● गिरीश प्रभुणे ●

शिबीर घ्यायचं निश्चित झालं आणि एका सकाळी एस. टी. नं राहूला उतरलो. हिरवंगार पाचूचं बेट असल्यासारखं राहू. मुळामुठेच्या बारमाही पाण्यावर जोपासलेलं. समृद्धीनं नखशिखांत निथळणारं.

बसमध्ये शिंदे नावाच्या गृहस्थानी ' राहू ' नावामागचं रहस्य विनोदानं सांगितलं. आजूबाजूची पंचक्रोशी उजाड. डोंगराळ भागातून लोकांना लांबून लांबून यावं लागायचं. इथं आल्यावर त्याला परतावंसंच वाटायचं नाही. पाहुणे मंडळी म्हणत, ' राहू दोन दिस ! ' जो येईल तो म्हणू लागला ' राहू '. म्हणून हे राहू !

असं हे ' राहू–राहूसं ' वाटणारं राहू सोडून एका पाऊलवाटेनं मी निघालो. वाटेत शिंद्यांच्याकडे सरबत मिळालं. म्हणाले, ' उन्हाचं दिस हायत. रस्त्यात कुठं पाणी नाय गावायचं. लिंबूपाणी घ्या म्हंजी बरं. ' त्यांनी आणखीन एक भांडभर दिलं. एका अपरिचित खेडुत व्यक्तीमधल्या जिव्हाळ्यानं सध्याच्या कोरड्या रखरखीत शहरीपणाची सवय झालेल्या मनाला थंडगार झुळुक यावी तसं झालं.

' या प्रेमामुळेच लोक इथं चिकटून राहू लागले असावेत. ' मी मगाचाच ' राहू 'चा धागा पकडला. बाबा हसले. ' माऊलींच्या दर्शनाला गेलो होतो आळंदीला तिथं ह्ये आसंच हाय. पान्याला उताराची वाट दाखवावी नाय लागत. त्ये आपसुक जानं. तसं प्रेमाचं हाय. जितकं द्यावं तितका पान्हा अधिक फुटतो ' शिंदेबाबा म्हणाले. त्यांच्या मधुर वाणीनं मन ओलंचिंब झालं. त्यांच्या जेवून जायच्या आग्रहाला न जुमानता प्रसन्न चित्तानं पुढची वाट धरली. एका पाऊलवाटेनं पुढे चाललो. झुळझुळणारे पाण्याचे पाट, ओढे, हिरवीगार शेतं, उसाचे मळे यांच्यामधून डोंगराच्या दिशेनं वाट चालली होती. पाऊलवाट संपून गाडीवाटेला लागलो होतो. आता चढ जाणवू लागला होता. समोर छोट्या छोट्या टेकड्यांची रांग दिसत होती. याच टेकड्यांच्या पलीकडं मुक्कामाचं गाव होतं. उन्हाचे चटके जाणवू लागले होते. हळूहळू राहू मागे पडून टेकडीआड लोपलं. समोर दूरवर डोंगराच्या छोट्या छोट्या रांगा. सर्वत्र कुभुबाळीचं जंगल. बाभुळीच्या फराट्यांनी गाडीरस्त्यावर तोरणांसारख्या कमानी केलेल्या. चालता चालता सतत खाली वाकून बाभळीच्या झाडांचं काटेरी स्वागत चुकवत, नम्रतेनं स्वीकारत चालावं लागे.


किती वेळ गेला हे समजलंच नाही. उन्हाच्या झळांनी अंगाला चटके बसत होते. घामाच्या धारांनी कपडे चिंब भिजले होते. कपडे अंगाला चिकटत होते–त्याचा विचित्र गारवा असह्य होत होता. रस्त्यावर चिटपाखरूही दिसत नव्हतं. जाणारा–येणारा नाही. गाडी नाही. सायकल नाही. सर्वत्र बाभळीचं अरण्य. जणू हा रस्ता फक्त पुढे जात होता. जाण्यासाठीच होता ? न संपणारी वाट. वाटेत कुठं सावली देणारं झाड नाही. पाण्याचा मागमूसही दिसत नव्हता. बाभळीसुद्धा खुरट्या. नुसत्या फराट्यांनी वाढलेल्या. स्वतःच्याच सावलीला पारख्या झालेल्या. कुठं पक्षी उडताना दिसत नव्हते. कसला आवाज नाही. वारा हलत नव्हता. सर्वत्र एक विचित्र निस्तब्धता पसरलेली. श्रद्धांजली वहायला उभे असल्यासारखे उघडेबोडके डोंगर ! वरती असह्य होणारा सूर्य.

मागे वळून पहायला मार्ग नव्हता. पुढं जाणंच भाग होतं. एखाद्या खोलगट कढईसारखा भाग दिसत होता. हळूहळू चढणीला परत सुरुवात झाली. चढण संपून उंच पठारावर आलो आणि मन प्रसन्न करून सोडणारी झुळूक आली. अंगावर सरसरून रोमांच उभे राहिले. एका मागोमाग एक येणाऱ्या थंडगार झुळुकीच्या शिडकाव्यानं सारा शिणवठा निघून गेला. थोडं थांबून सर्वत्र नजर फिरवली. पठारावर सर्वत्र दगडांच्या राशी पसरलेल्या दिसत होत्या जिकडे पहावं तिकडे दूरवर दगडांच्या राशी. एखाद्या उध्वस्त प्राचीन नगराच्या अवशेषांसारखे दृश्य दिसत होतं.

पठाराच्या टोकावरून रस्ता परत वळणावळणाने एका छोट्या टेकडीला वळसा घालून जात होता. समोरच्या छोट्या टेकडीवर गावाचे चिन्ह दिसत होते. छोटे देऊळ, दीपमाळ आणि काठीवर फडफडणारे, रंग उडून पांढरे झालेले निशाण.

सभोवार खालती शेतं दिसत होती. वेडीवाकडी वळणं घेत येणारी भीमा दिसत होती. अधूनमधून चमकणाऱ्या पाण्याशिवाय वाळूने भरलेलं पात्रच नजरेत भरत होतं.

खालाटीतून येणारे गार वारे पाऊल पुढे उचलू देत नव्हते. आता गाव अगदी जवळ होतं. समोरची दरी ओलांडायची, टेकडीला वळसा घातला की आलंच. उत्साहानं मी टेकडी उतरायला लागलो. टेकडीवर सर्व निवडुंगांचं बन होतं. सभोवार निवडुंग माजला होता. हिरव्यागार निवडुंगावर लालचुटुक फुलं फुललेली होती. एक निळ्या रंगाचा नाजूक पक्षी उडत उडत निवडुंगावर बसला आणि कुतूहलानं पाहू लागला. त्याची शेपटी लालसर पिवळी होती आणि पाय नाजूक पिवळसर होते. त्याचा आवाज ऐकण्यासाठी आता कान अधिर झाले होते. मी श्वास रोखून त्याच्याकडे पहात राहिलो. माझा थांबण्याचा उद्देश समजूनच की काय, तो किंचित नाराजीनंच पुटपुटल्यासारखा




चोचीतल्या चोचीत शिळ घातल्यासारखा आवाज काढून हलकेच आकाशात उडाला. दूर गेलेल्या पक्षाकडं पहात निवडुंगाच्या रानातन वाट काढीत चालू लागलो.

¤

दुरून टेकडीच्या आडून न दिसणार गाव. तसच बरंच मोठ होतं. समोरच जुन्या काळच्या वेशीचे अवशेष पडलेले. वेशीच्या बाहेर मारुतीचं मदिर. देवळाच्या परिसरात छोटी छोटी बुटकी पाच-सहा देवळं. देवळाच्या पलिकडे दोन खोल्याची मंगलोरी कौलाची नवी इमारत–शाळेची. जमीन चोपण्याचे काम चालू होतं. वेशीच्या आत एक तीन मजली उंच माडी होती. गावातलं एकमेव तीन मजली घर. तिसऱ्या मजल्याला सज्जा होता. गावच्या जुन्या जमिनदाराची ही माडी. गावातली बहुतेक जमीन पूर्वी यांचीच होती. कुळकायद्यानं काही जमीन गेली. पण त्यापूर्वीच खूप हुषारीनं जमिनदार कर्नावट यांनी आपल्या सपूर्ण इस्टेटीचा ट्रस्ट केला. सर्व कुटुबीय त्या ट्रस्टचे सभासद–विश्वस्त ! त्यामुळे आजही खूप उत्पन्न घरात येते. पूर्वी सावकारी होती. त्यातली काही सावकारी बुडली; पण सावकारी बुडल्याची खत सध्याचे वारसदार सुधीरशेठ याना नव्हती. गावात त्यांना मान होता. सुधीरशेठ याची जमीन लिफ्टमध्ये येत नव्हती तरीही लिफ्टच्या प्रत्येक कामात त्याचे सहकार्य असे. सुधीरशेठ आणि त्यांची पत्नी बिन्नी सतत कामात आणि गप्पात दंग असणारे जोडपे. सामान्यपणे जैन कुटुबातील सोवळे-ओवळे याच्याकडे नव्हते. गावातील कुणीही याच्या स्वयंपाकघरात बसून गप्पा मारताना दिसत असे. जेवायला ग्रामस्थांपैकी नेहमी एक-दोघंजण असणारच. गावात नवीन कुणी आला की सुधीरशेठचा पाहुणचार घेतल्याशिवाय तो जाणारच नाही. सर्वांच्या मदतीस धावून जाणाऱ्या या जोडप्याचा गैरफायदाही अनेकजण घेतात. एक दिवस रात्री त्याच्या शेतावरती चोरी होताना त्यानी एक-दोघाना पकडलं. खळ्यावरून रात्रीची बोचकी बाधून धान्य नेत होते. तो प्लॅन सुधीरशेठच्या सावधगिरीने फसला. त्यांच्याकडे नेहमी कामाला येणाऱ्यापैकीच कुणीतरी हे केलं. सुधीरशेठना त्याचा मनस्ताप झाला; पण चोरी करणारा गरीब आहे म्हणून केवळ त्याला जरब देऊन त्यांनी सोडून दिलं. एवढच नाही तर त्याला कामावरही ठेवून घेतल. काळाप्रमाणे जमिनदारी वृत्तीत फरक पडून इतराप्रमाणेच आपण असे समजणारे हे कुटुब.

¤

छोटया टेकडीच्या कुशीत वसलेल्या गावाला पूर्वी 'किल्ल्याचं कोरेगाव' म्हणत असत. पूर्वी आदिलशाही बुडाल्यावर पेंढाऱ्याचं राज्य आल. त्यावेळी या गावावर कुणी एक बाई राज्य करीत असत. पेंढाऱ्याच्यापासून रक्षण करण्याकरता सपूर्ण गावकरी या किल्ल्यात आसरा घेत असत. प्रसगी त्या तडफदार स्त्रीनं हातात तलवार घेऊन गावाला धीर दिला होता. टेकडीवर किल्ल्याचे अवशेषच बाकी आहेत. आणि एक देऊळ निसनाई देवीच. त्या देवळावर एक शिलालेख खोदलेला आहे. दीपमाळेच्या समोर मोठमोठे दगड पडलेले आहेत. त्यावर शेंदूर फासलेला. देवळावर एक काठी. त्यावर कधीतरी भगवा रग असलेले, सध्या शरणागतींचा सफेद रंग झालेले, वाऱ्याने जीर्ण झालेले निशाण.

सध्या गावचे पोलीस पाटील असलेल्या श्री. कदमबांडे याच्या वडिलांची नेमणूक ४२ साली प्रथम पोलीस पाटील म्हणून झाली. त्यावेळची आठवण सागताना पचाहत्तर वर्षांचे शामराव कदमबाडे म्हणाले, 'तेव्हा गावची परिस्थिती फार बिकट होती. लोक खोपटातून झोपडयामधून रहात असत. मारवाड्याची एकच उंच माडी फक्त. शाळा नाही. देउळं होती जुनी पण लोकाना तमाशाचा भारी नाद. रात्रदिवस वाजवीत बसायची मी हळूहळू देवळात भजनाची बैठक जमवली. मारुतीच्या देवळात. पण मारामाऱ्या, कज्जे, दारू पिणं यामुळ गाव बेकार बनल होतं. तालुक्यासनं दिवेकर नावाचे गुरुजी आणले. दोन–चार वर्ष त्यांनी कष्ट घेऊन गावातल्या उनाड पोराना वळण लावलं. पेटीवरती भजन शिकवली, गावात एक तालीम बाधली. पोरं हळूहळू तालमीत घुमू लागली. कोल्हापूरला राहून तयार होऊन येऊ लागली. खायच प्यायचं, मजा करायची, रानोमाळ भटकायच हा उद्योग हळूहळू कमी होऊन गावात गावपण आणल. सरकारी शाळा आली. मास्तर एवढ्या लाब रहायला कंटाळत असत, मी त्यांना माझ्या घरी जेवायला घालीत असे. पूर्वी सरकारी अधिकारी आले की मुक्कामाला रहात असत. पूर्वी या भागात जंगल होतं. शिकारीला शिकारी, अधिकारी येत असत. जंगल गेलं आन्–जित्राबं गेली, हरणाचं कळप पळताना पाहिलेत आम्ही. आता काही राहिलं नाही. सरकारी अधिकारी आता मुक्कामाला नसत्यात. आले तरी गाडीतन खाली नाही उतरत.'

वृद्ध शामरावाच्या बोलण्यातून एक प्रकारची खंत व्यक्त होताना दिसत होती. कदमबाडे नगरजिल्ह्यातील आळकुटीचे वतनदार देशमुख. त्या ठिकाणी त्याचा शनिवारवाड्याएवढा वाडा आहे. इथं आल्यानतर इथ वाडा बाधला. आळकुटीला इतर भाऊ असतात. निसनाई हे त्यांचं कुलदवत स्वत च्या तालमीच्या नादानं गावाला तालमीचा नाद लावला इतका की एकेकाळी पचक्रोशीत नावाजलेल्या पैलवान चद्रराव फडतऱ्याच्या नावाने 'चंदरचे कोरेगाव' म्हणून गावाला



ओळखू लागले. यात्रेच्या दिवसात पुढे चदर आणि मागे गावातली तरणीबाड, कसलेल्या गोटीवद शरीराची पोरं, अशी बाधावरन पटके उडवत ऐटीनं या गावावरनं त्या गावी जाऊ लागली की, बाया–बापे त्याच्याकडे वळून वळून बघायची. यात्रेतील कुस्त्याचा फड पोरं गाजवून येणारच हे ठरलेलं. लाबलाबून निमत्रणं यायची. या गावात पधरा दिवसाला पोतं पोतं खारीक खपत असे! आता पोराच्या घुटीला खारीक सापडणं मुश्किल.

¤

'ग्रामायन'च्या संकल्पित शिबिराची माहिती–पूर्वतयारीच्या दृष्टीनं देण्यासाठी हिंडत होतो. वस्तीवस्तीवरून जात होतो. राघू लवंगे, त्यांची पत्नी, सीताराम चौधरी, रतन लवंगे, नारायण काडगे, गुलाब ओरपे, मांजऱ्याची वस्ती, नवल्यांची वस्ती, फडतऱ्याची वस्ती सरपंच बबनराव काळे यांची वस्ती, पैलवान अर्जुन काळे याची वस्ती. प्रत्येकाचं गावात आणि वस्तीवर शेतात अशी पक्की घरं. मुक्कामाला शेतातल्या घरी. दिवसभरात कामाच्या निमित्ताने एखादी चक्कर गावातल्या घरी मारायची. कुठे राहू–शिक्रापूर–तळेगावला बाजारला जायचं. कुटुंबातील एकजण शेतात काम करायला, बाकीचे त्याला मदत करणार. आणि एका कर्त्याकडे बाहेरची सर्व कामे–बी-बीयाणे, बँकाची कर्जे मिळवणं, हप्ते भरणं, खाजगी पैसे उभं करणं–फेडणं, धान्य नेऊन बाजारात विकणे, भाडण–कज्जे साभाळण, सर्व काही एकाकडे असते. अशा कामसू माणसाला 'कारभारी' म्हणतात. घरात याच्या शब्दाला वजन फार. अशा 'कारभारी' मडळीच्याकडेच गावचाही कारभार आपोआपच येत असतो. ग्रामपंचायतीचे सभासद बहुतेक असे कारभारीच असतात. लहान कुटुबात ही सर्व कामे एकालाच करावी लागतात, त्यामुळे अशी कुटुबे मागास राहिलेली आढळतात. एकत्र मोठे कुटुब हे शेतीला चांगले असते. बाहेरचे मजूर कमी लागतात. कामाची वाटणी व्यवस्थित होते. कामे वेळेवर पार पडतात. म्हातारे–वृद्ध याचा भार वाटत नाही. यादृष्टीने कोरेगावमध्ये फडतरे, माजरे, नवले याची घरे पहाण्यासारखी आहेत. माजरे याचे वस्तीवरचे घर विसबावीस खणाचे लांबलचक आहे. सर्व भावडे, सुना–मुले एकत्र रहातात. एकाच चुलीवर सर्वांचा स्वयपाक होतो अशी एकत्र असणारी कुटुंबं आज गावात सधन समजली जातात. आणि वेगळे वेगळे झालेल्यांच्या पुढे अनेकप्रकारच्या अडचणी–मजुराच्या, पैशाच्या, पाण्याच्या–अडचणीचे डोंगरच सर्व बाजूनी. मग अखेर जमीन कुणालातरी करायला' द्यायची वाटयानं आणि स्वत: दुसरीकडं कामाला जायचं किंवा अखेर मुलीच्या लग्नाला जमीन विकून टाकायची.

लोक बोलत होते. बाया बोलत होत्या. जुन्या आठवणी सांगत होत्या. लिफ्ट सुरू होण्यासाठी सुरुवातीपासून प्रयत्न करणारे ज्ञानोबा शुक्ल आणि सुरेश काळे यानी लिफ्टच्या सुरू होतानाच्या आठवणी सांगितल्या.

१९८२ साली गावाच्या आयुष्यातलं नष्टचर्य संपलं. ग्रामायनचे कार्यकर्ते सुरेश पवार बंद लिफ्टच्या शोधात गावात येऊन पोहोचले होते. त्यांच्या प्रयत्नाने अनत अडचणींचे डोंगर पार करून लिफ्ट अखेर सुरू झाली. विकासाच्या मार्गातील अडथळे दूर होऊन शिवारातून पाणी खळाळू लागलं आणि हळूहळू गावाला आकार येऊ लागला. हिरव्या बाटुकावरची जनावरं जशी तरारतात तसं गाव तरारू लागल. शेतात कष्ट करू लागल. नवनवी पिकं घेऊ लागलं. कांदा पिकू लागला. बाजरीच्या जोडीला ज्वारी आली. हरबरा गहू येऊ लागला. थोडाफार भाजीपाला होऊ लागला. वांगी–गवार–भेंडी–मिरची होऊ लागली. दहा पंधरा वर्षं दुष्काळामुळे सुकलेल्या जमिनीला पाणी मिळताच ती–भरभरून दान शेतकऱ्याच्या पदरात ओतू लागली. गेली काही वर्षं हरपलेलं चैतन्य गावात सळसळू लागल. हळूहळू गावाचं नाव चांगल्या अर्थानं पंचक्रोशीत निघू लागलं.

ज्ञानोबा शुक्ल म्हणजे लिफ्टचा चालता बोलता इतिहासच. धोतर शर्ट, पांढरी टोपी असा साधा वेश असलेल्या ज्ञानोबांच्या बोलण्यात ज्ञानेश्वर तुकारामाच्या अभंगाबरोबरच कबीराच्या दोह्यांचा भरणा अधिक.

## अवघड कामाला सुरवात

'आम्ही मूळचं या गावचं नव्हं. आमच्या आज्जाच्या बाला आठ मुलं हुती. हवा लागून फळं जशी टपाटपा गळून पडावीत तशी सात मुलं गेली. आमचा आज्जा फक्स्त राहिला. तवा रेड्यावर प्रपंच घालून आज्जाचा बा या गावात आला. वीर धरणाकडले कुठलेतरी आम्ही. दुष्काळामुळे इकडे आलो. इकडेही दुष्काळच. त्यावेळी या कोरेगावाला 'भिकार कोरेगाव' म्हणत असत! सर्व्या दुनियेतली भिकार इथं माळरानावर उतरायची. गोपाळं, फासेपारधी, गारूडी, नाचणारे नदीबैलवाले, सोंग काढणारे, लमाण, जादूगार साऱ्यांची पालं माळावर पडायची. आजूबाजूच्या गावात आपली कला दाखवून चोऱ्या माऱ्या करून धान्य–पैसा जमा करायची. आठ आठ महिने त्याचं वास्तव्य असायचं त्याच्यामुळे गावाला 'भिकार' नाव पडले. दुष्काळामुळे अलिकडे भिकारं यायची बंद झालीत.'

ज्ञानोबा शुक्ल सागत होते. ज्ञानोबा पूर्वी पुण्यात स्टेट फार्मिगमध्ये कामाला होते. घोड्यांची निगा राखायचं काम होतं; पण एकदा अचानक घोडा उधळला. त्याच्या टापेच्या प्रहाराने तोंडातले दात गेले आणि ज्ञानोबाना अकाली वार्धक्य आलं. त्यामुळे बोलताना जरा त्रास होत असे. त्यानतर ते परत गावी आले शेती करायला, तर दुष्काळ आला आणि सारं गाव रोजगार हमी योजनेवर खडी फोडायला, नालाबंडिंगच्या कामावर जायला लागलं. ज्ञानोबा आपल्या बायकोसह जाऊ लागले. त्याचे काम पाहून लवकरच त्याची मुकादम म्हणून नेमणूक झाली. जीवनात अनत अडचणी आल्या त्यावर अध्यात्मामुळे मात करता आली, असं त्यांना वाटतं. अनत कष्ट आणि दुःख सोसल्यामुळे जीवनाकडे पहाण्याचा दृष्टिकोन उदार. चटचट काम करण्याच्या वृत्तीमुळे उगाचच कुठं रेंगाळायची सवय नाही.

'सुरेश पवारांची आणि आमची गाठभेट झाली आणि हे ग्रामायनचं वेड घेतलं बगा. पवारानी सर्व्हे केला. पवारांच्यापूर्वी असे कैक जण येऊन गेले. जे येऊन गेले ते फसवून गेले पैसे घेऊन गेले. पवारानी सागितल्यावर आम्ही एक दोवजण शिवतक्रार म्हाळुंगीला प्रत्यक्ष जाऊन ग्रामायनचं काम पाहिलं आणि जवा का ईश्वास बसला तवा कामाला साथ दिली. नामदेव माळी आणि नारायण फडतरे यांचं काम पाहिलं आणि वाटू लागलं इथली कामाची पद्धत वेगळीच हाय. दरिद्री शेतकऱ्याच्यात सुधारणा करणारी प्रामाणिक मंडळी हायत, पवारांना काही कमी पडू दिलं नाही. आमच्या गावातला


सुरेश काळे आणि मी, रात्र म्हणू नका की दिवस म्हणू नका, वीस वीस किलोमीटर चालून आमी कागदपत्रांची पूर्तता केलीय. काम पूर्ण झाल्याबिगर तोडात अन्न नाय की पानी नाय सुरेश पवाराकडं पाहून वाटायचं, हे एवढंस प्वार काय लिफ्ट चालू करणार ? पर म्हणत्यात ना देवाची करनी आन नारळात पानी. आजकाल नारळबी नासकच निगत्यात जास्त. पर ह्यो नारळ चांगला निगाला. अवो चांगलं काही घावंनाच, जो त्यो फसवितुय, पैसा खातुंय. त्यामुळे कुनावरच इश्वास राहिला नाही. प्रत्यक्ष परमेश्वर जरी उभा राहिला तरी आता विश्वास बसनार नाही. इतकी दुनिया बदललीय. पवारांनी फारमोठं काम क्येलं. सर्व गाव एकत्र झालं. त्याकरिता खूप कष्ट घ्यावे लागले. पूर्वी इथं याचं तोंड इकडं तर त्याचं तिकड. दारू प्यायल्याबिगर मिटिंग होत नसे.'

'त्या दृष्टीने हे गाव किती खट आहे हे तुम्हाला आता नाही समजायचं सुरेश पवारांच्या आमच्या धावपळीकडे लोकाच लक्ष नसे. लोकाना संघटित करणे किती अवघड काम नेहमी काही ना काही विघ्नं येतच होत. कागदपत्राची पूर्तता होऊन लिफ्टच्या दुरुस्तीची कामे सुरू झाली होती तरीही काही लोकांना अद्याप विश्वास येत नव्हता त्यांची चेष्टा टिंगल सुरूच असायची. 'हे मोठे आले काम करणारे, चोर कुठले !' आम्ही जे दोनं चौघजण काम करायचो; लोक म्हणायचे, 'काही तरी मिळत असणार पैसे. त्याशिवाय का राबतात ? वाईट वाटायच लोकांच्या या बोलण्याचं. पण वाटायचं एकदा का लिफ्ट सुरू झाली की या सर्वांची तोडं बंद होतील. पण जसजशी लिफ्टच्या कामात प्रगती होत होती, तसतसे कुटाळकपूंच्या गप्पांना ऊत आला होता. जे लिफ्टच्या या पुर्ननिर्माणात सहभागी झाले होते त्यांना फितविण्याचा प्रयत्न होत असे. रात्रीचा दिवस करून हे काम आता मोटारी दुरुस्तीपर्यंत आलं होत. दुरुस्तीसाठी मोटारी ट्रकमध्ये भरल्या जात असताना या कुटाळकपू लोकांनी पाहिल्या आणि गावात उठवले मोटारी विकायला चालल्या ! मोटारी चढवायला कुणी हात लावेना. दुरुस्त होऊन आल्यावर मोटारी जागेवर बसल्या आणि लोकांमध्ये विश्वास आला.'

असं होणं साहजिकच होतं. कारण सर्वत्र फसवणूक होत असताना कुणी प्रामाणिकपणे या जगात नि.स्वार्थीपणे काम करेल ;यावर लोकाचा विश्वास कसा बसावा ? त्यामुळे दुधानं तोंड पोळल्यावर ताकही फुंकून प्यायची सवय लागते. सुरुवातीला विरोध करणारे हळूहळू सामील होऊ लागले. श्रमदानात सहभागी झाले. या सामुदायिक लिफ्टची गरज नसणारेही काही जण होते. तेही यात सामील झाले. आणि दहा वर्ष बंद पडलेली लिफ्ट सुरू झाली. ज्ञानोबा शुक्ल सुरेश काळे या जोडीने आपल्या घराकडे न पाहता पवारला साथ दिली. हे काम उभं रहाण्यासाठी समर्थ हात हवे होते. ते मिळाले पैलवान अर्जुन काळे, सरपंच बबनराव काळे बबनराव नवले, दत्तोबा फडतरे किसनराव ओरपे याचे त्यामुळे लिफ्टपुढील अनेक अडचणी दूर झाल्या लोप पावत चाललेली सहकार्याची भावना ग्रामायनमुळे वाढीस लागली.

¤

जगाशी दैनंदिन संपर्क नसलेल्या कोरेगावभिवरसारख्या आडगावात जाऊन मुक्काम ठोकून ग्रामीण जगातील दुर्गुणांशी झगडत,



दुष्काळानं मोडून पडलेलं गाव आकाराला आलं

¤

त्याच्यातील सद्गुणांना हाक देत त्यांच्याच हाताने बदल घडवून आणायचा, एखादा चमत्कार वाटावा इतकं अवघड काम ग्रामायनच्या कार्यकर्त्यांनी केल. आणि राहू बेटातील पचक्रोशीत 'ग्रामायन'चं नाव झालं. देवकरवाडी दहिटणं, पिंपरीसाडस, सांगवी साडस इ. ठिकाणचे शेतकरी त्यांच्या बद पडलेल्या लिफ्टसाठी स्वत हून येऊ लागले.

कोरेगावभिवर–भिवरेच्या–भीमेच्या काठी वसलेले कोरेगाव खूप वर्षापूर्वी कोरेगावभिवर हे भीमेच्या अगदी काठावर होते. त्या ठिकाणी मंदिरं होती. ऋषीमुनीचे वास्तव्य होतं. यज्ञयाग होत असत यात्रेकरूंचं विसाव्याचं ठिकाण होतं हे. एका बाजूला विशालपात्र असलेली भिवरा–भीमा. दुसरीकडे हिरव्यागार वनश्रीने नटलेल्या टेकड्या. सुखी समाधानी लोक. एका तिरावर भीमाशंकराचं मदिर दुसऱ्या कोरेगावच्या तिरावर पार्वतीचं, पांढराईचं मंदिर. हिमालय सोडून भिमेच्या रम्य परिसराच्या मोहात सापडलेल्या शंकराला न्यायला भस्मफासून संन्यासिनी बनून आलेली पार्वती-पाढरी-पार्वती अशी कथा सागणारे ते तिर्थक्षेत्र. भीमेच्या महाकोपात वाहून गेले ! आपल्या प्रेमात पार्वतीला सहभागी होताना पाहून भिमेच्या महापुरात पुरातन मदिरे जमिनदोस्त झाली. दगडाच्या राशीच्या ढिगाऱ्यांमध्ये शिवलिंग ओकेबोके पडलेले. पांढराई पार्वतीच्या खुणा अजूनही त्या तीरावर सापडतात. भस्माचा छोटासा डोंगर आजही तिथे आहे. शंख शिपले सापडतात. श्रावणात गावकरी आजही पाढराईला जातात. नवस करतात.

महापुरात केव्हातरी मदिराबरोबच गावही वाहून गेलं आणि नदीकाठचे कोरेगाव त्या टेकडीच्या आसऱ्याला आलं. गाव टेकडीच्या आसऱ्याला आल आणि कैक वर्षाच्या दुष्काळाला सुरुवात झाली. सार उजाड झाल. 'ग्रामायनने' लिफ्ट सुरू केली आणि गावचे दिवस बदलले. जे पूर्वी सभासद नव्हते अशानी आणि सभासदापैकी काहीनी सामुदायिक लिफ्टबरोबरच स्वतःचो खाजगी लिफ्ट सुरू केली. विकासाला चांगलीच गती मिळाली. हळूहळू दुष्काळान मोडून पडलेलं गाव आकाराला येऊ लागलं. तरुण सरपच बबनराव काळे,

पैलवान अर्जुन काळे, दत्तोबा फडतरे-माजरेकर यांनी प्रथम चावडी बांधून काढली. शेख गुरुजी चंदर फडतरे यांनी या कामात पुढाकार घेतला. ग्रामायनने यासाठी सतत परिश्रम घेतले आणि बेवारशी शाळा नियमित भरू लागली, पोस्ट गावात आले. कूपनलिका खोदली गेली, त्याला चांगलं गोड पाणी लागल्यामुळे पाण्यासाठी दाही दिशा फिरण्याचे कष्ट संपले. गावातले-ग्रामदैवत फिरंगाई देवीची यात्रा जोरदार भरू लागली. 'कुस्त्याचा फड पडू लागला. शर्यती होऊ लागल्या. तमाशाला सुपारी दिली जाऊ लागली. पण नाचगाण्याचे वाचलेले पैसे, ग्रामपंचायतीचे काही अनुदान एकत्र करून सरपंचांनी पुढाकार घेऊन नवी शाळा बांधली, गावाला हळूहळू गावपण येत होतं. पण एकीकडे या सुधारणाच्या वाटेवरून जात असताना समृद्धीमुळे नकळत गाव एका अवघड वळणावर येऊन ठेपलं !

## तरुण मंडळ-विकास

गावाच्या जीवनातलं आजवर कधीही न आलेलं अवघड वळण. या ना त्या निमित्ताने या अवघड वळणावरचे धोके जाणवू लागले.

विकासाच्या टप्प्यावर असतानाच 'कारभारी' होऊ इच्छिणारी नवीन तरुणपिढी तयार झाली. बाहेरच्या जगात वाहू लागलेले नवे वारे गावात वाहू लागले. ग्रामायनमुळे त्याच्यात एक विचारीपणा आला आणि त्यांनाही गावात सुधारणा घडविण्याची इच्छा झाली. सुरेश पवारच्या पुढाकाराने बैठक झाली. कांतीलाल काळे, बन्सीलाल फडतरे, रतन लवगे, पंढरीनाथ ओरपे, माणिक हबीर, आनंदा मालेराव, भगवंता भागवत, आनंदा शुक्ल, शांताराम लवगे, तुकाराम काळे, चंदर नवले, शांताराम गाडवे, विठ्ठल लवगे, दत्तू नवले, शिवाजी ओरपे, गायकवाड असे सर्वजण जमले आणि 'हनुमान तरुण मंडळ' आकाराला आले कारभारी मंडळींनी मुलाचं कौतुक केलं. लग्न कार्यात मुलं झटू लागली. ढोल लेझिमी घुमू लागल्या एक दिवस तरुण मंडळानं निश्चय केला. महादेवाच्या देवळाजवळ बैठक झाली. दारूबंदी करायची निश्चित झाले. त्याला गावातील प्रौढांची साथ मिळाली. दर आठ दिवसानी बैठक घ्यायचे निश्चित झाले. गावचे पोलीस पाटील, तरुण मंडळाचे पदाधिकारी आणि ग्रामायनचे कार्यकर्ते यांचे दारूबंदीचे प्रश्न सोडविण्यासाठी मंडळ नेमले गेले गावात दारूची विक्री होत असे. पोलीसपाटलाच्या मार्फत पोलीसचौकीला तक्रार अर्ज देण्यात आला. पोलीस चौकशीला आले. नेहमी साध्या वेषात येणारे पोलीस वेषातच आल्यामुळे दारूची विक्री करणाऱ्यांना सुगावा लागला आणि ते धंदा आवरून पसार झाले पोलिसांना काही सापडले नाही. त्यांनी जबाब लिहून घ्यायचा प्रयत्न केला की, या ठिकाणी अशा प्रकारे विक्री होत नव्हती, असा. परंतु गावकऱ्यांनी जबाब दिला नाही. गावकऱ्यात निश्चय झाला, गावात संपूर्ण दारूबंदी करायची. गावचा जुना रोग घालवायला, एक दिवस तरुणांनी पिऊन येणाऱ्या एकेकाला गाठायला सुरुवात केली. विनंती, हात जोडून विनंती करण्यात आली. पोरांचं हे रूप पाहून काही जणांची बोबडी वळली. काही जणांनी त्याच ठिकाणी शपथा आणा-भाका घेतल्या. गावात एक चर्चेचा विषय झाला. सर्वजण पोरांचं कौतुक करू लागले. तरीही काहीजण पिऊन येत असत; पण पोरांच्या नजरेस पडणार नाही याची ते काळजी घेत. तरीही पोरांना त्याचा सुगावा लागे आणि मग त्या चोरून पिणाऱ्याची मजा विचारू नका. मेल्याहून मेल्यासारखं होई. आया-बायांच्या डोळ्यात पोराविषयी कौतुकाचं स्मित झळकू लागलं. एक दिवस पोरांनी गावाची पूर्ण नाकेबंदी केली. आज गावात दारू विकायला आणणाऱ्याचा समाचार घ्यायचा होता. तळेगावासन गोपाळांच्या सायकली येताना दिसल्या. सायकलीला लावलेल्या पिशव्यातून मोठे फुगे भरलेले. त्याचा 'घुच्युळं घुच्युळं' आवाज कानावर आला आणि इशारा झाला. गोपाळांनाही सुगावा लागला असावा. ते वाडग्यात पिशव्या टाकून राजरोस गावात आले. वाडग्यात लपलेल्या पोरांनी माल हस्तगत केला आणि गोपाळांना पकडून गावकऱ्यांसमोर उभं केलं. शंभर रुपये दंड वसूल करण्यात आला आणि पुनः गावात याल, तर याद राखा असा दमही भरण्यात आला.

तरुण मंडळाची आगेकूच चालू झाली. या उप्परही जे पिण्याचं थांबत नव्हते, रस्त्यावर येऊन आई-माई उद्धारत होते त्याचा समाचार घेतला जाऊ लागला आणि हळूहळू गावातली चार तोंडं विरुद्ध दिशेनं बोलू लागली. गावकीतलं भावकीत गेलं आणि भावकीतले वाद गावकीत आले. मोठ्या मंडळीच्यापुढे रोज नवीनच कटकटी वाढून ठेवल्या जाऊ लागल्या आणि तरुण मुलांना घरातून दम भरला जाऊ लागला. तरुण मंडळ जसं अचानक उभारलं गेलं, तसंच अचानक शांत झालं. एका वठलेल्या वृक्षाला पालवी फुटायला लागली होती; पण ती कोवळी पालवी हिरवी व्हायच्या आतच खुडली गेली. हिरमुसली मुलं शेतात-वस्तीवर मन रमवू लागली.

¤

लोकसभेच्या निवडणुका आल्या आणि पुनः तरुणांच्या मनानं उचल खाल्ली. काहीतरी निमित्त काढून पोरं तालुक्याला जाऊ लागली. बाहेरचे बदलते वारे गावात केव्हा वाहू लागले समजलच नाही. पोरांनी मनोमन ठरवलं होतं गावची परंपरा तोडायची. एक गठ्ठा डोळे झाकून होणारं मतदान या खेपेला होऊन द्यायचं नाही. गावात कधी पूर्वी लागली नव्हती, एवढी पोस्टर लागली. प्रथमच सामना रंगायचं चिन्ह दिसू लागलं. पोरं आहेत, त्यांचं काय एवढं असं म्हणणारे टरकले. निकाल लागला आणि तरुणांचे चेहरे उजळले. गावात कधी घडलं नव्हतं असं मतदान विरोधी पक्षाला झालं होतं, आणि शरद पवार निवडूनही आले होते.

तरुणांचे चेहरे उजळले गावातली कर्ती कारभारी मंडळी चिंतेत पडली. आजवर असं कधी घडलं नव्हतं. आता बाहेर तोंड दाखवायला जागा राहिली नाही. ज्यांनी आजवर गावावरच्या प्रेमापोटी गावाला मदत केली होती ते नाराज झाले. आता गावाला कोण मदत करणार ? सरकारदरबारी, अडलेल्या कामात मार्गदर्शन कोण करणार ? शेतीच्या कामी, बँकांच्या कामात आता कोण सहकार्य करणार ? गावात शाळा नव्हती. तिच्यासाठी अनुदान मिळवून दिलं. त्यामुळे शाळेची इमारत पूर्ण होऊ शकली. आता हे कोण करणार ? तरुण पोरांनी गावाचं नाक कापलं. अब्रू घालवली.

तरुणाचं म्हणणं पडलं, गावाच्या विकासाला ज्यांनी हातभार लावलाय, त्यांच्याशी आमची मैत्रीच राहील. त्यांच्या पाठीशी आम्ही सदैव राहूच. पण ते आहेत म्हणूनच काही मदत मिळते आहे असं नाही स्वतंत्रपणे स्वतःच्या पायावर गावानं उभं रहायला हवं. इतकी वर्षे लिफ्ट बंद होती. कुणी का आलं नाही सुरू करायला ?

या प्रश्नाला उत्तर नव्हते...

झालं हे बरं झालं नाही' असं सर्वांचं मत. अखेर तरुणांची बाह्यतः माघार. विधानसभेच्या नंतर लोकसभेची पोटनिवडणूक आली. तरुणवर्ग तटस्थ राहिला. मोठ्याप्रमाणात उत्साह नव्हता. जेमतेम मतदान झालं. लोक कट्ट्यावर बसून होते; पण चार पावलावर असलेल्या मतदान केंद्रावर जाऊन त्यानी मतदान केलं नाही.

¤

मार्चमध्ये एक बैठक झाली. अत्यत तप्त वातावरणात तरुण विरुद्ध इतर,अशी खडाजंगी झाली. लिफ्ट रजिस्ट्रेशनचा विषय होता. ज्यांच्या जुन्या स्वतंत्र लिफ्टस् होत्या अशानी लिफ्टच्या रजिस्ट्रेशनला विरोध केला, आणि लिफ्टमधून बाहेर पडण्याची धमकी दिली. आम्हाला ग्रामायनची गरज नाही. आमचं आम्ही पाहून घेऊ. पोरं बिघडायला लागलीत. आम्हाला या लिफ्टची आवश्यकता नाही. आमची कर्जं आम्ही फेडलीत. तरीही इतरांच्या बाकीमुळे आम्हाला बँकेचे अधिकारी बोलतात. हे कुठवर सहन करायचं ? त्या परिस ती लिफ्ट नको. दोन तास खडाजंगी चालली होती. ग्रामायनचे नामदेव माळी, ज्ञानोबा शुक्ल, सुरेश पवार यानी तापलेल वातावरण शात केलं. एकेकाला समजावत चुचकारत बैठकीत समेट झाला. प्रत्येकाच्या मनात ग्रामायनबद्दल आदरच होता. लिफ्टचे शिवधनुष्य तोलण्याचे अवघड कार्य ग्रामायनामुळेच होऊ शकले. आज गावचा जो विकास होत आहे तो ग्रामायनमुळेच. एकेकाळी आख्खं गाव खडी फोडायला जात असे. आज स्वतःच्या शेतात राबून दोन वेळचं पोटभर जेवून सुखात जगत आहे, हे ग्रामायनमुळेच होऊ शकलं. पोरीबाळीची लग्न धुमधडाक्यात होऊ लागलीत.

ग्रामायन येण्यापूर्वी गाव कसं होतं ? आणि आता कसं आहे ? ज्ञानोबा शुक्लांनी गावकऱ्याच्या हृदयाला हात घातला. बिघडू पहाणारा सूर पुन: जुळला. उधळला जाणारा खेळ सावरला गेला. मोठ्या कष्टाने उभं राहिलेलं काम क्षुल्लक राजकारणामुळे बिघडणार होतं. बैठकीनंतर प्रत्येकाला सुटल्या सुटल्या सारखं वाटत होते. पुन एकदिलानं काम करायचा मनाशी निश्चय करूनच जो तो घरी गेला.

¤

आज दोन चार शेतकऱ्यांचा अपवाद सोडला तर बहुतेकांची बागाईत आहे. कांद्याचं पीक घेतात. पुण्या-मुंबईला, नाफेडला कांदा घालतात. गेल्या तीन वर्षातील शेतकऱ्याच्यामधील बदल आश्चर्यकारक आहे. लिफ्ट सुरू होण्यापूर्वी फक्त एकाचीच बागाईत होती. हरिभाऊ नवले यांची. आज लिफ्टच्या सभासदांनी, सामुदायिक लिफ्टमधून झालेल्या फायद्यातून स्वत ची स्वतंत्र लिफ्ट करून बागाईत क्षेत्र वाढवले आहे. संपूर्ण शिवार हिरवगार दिसू लागलंय. जिथं सायकल घेणं परवडत नव्हतं तिथे आता मोटार सायकलीची भाषा बोलू लागले. ज्याचं पूर्वीपासूनच चागलं होतं अशावरचा भारही कमी झाला. लोकाच्या खिशात पैसा खुळखुळू लागला होता. पूर्वी दहा दहा एकरात दोन-चार पोती ज्वारी-बाजरी होत असे. त्यावेळी मोलमजुरी करावीच लागत असे. आता विकण्याएवढं धान्य होऊ लागलं होतं. गहू रेशनचा मिळविण्यासाठी पूर्वी धावपळ करावी लागे. आता घरच्या गव्हाच्या पोळ्या आल्या गेल्या पाहुण्याला करून घातल्या जाऊ लागल्या.


गाव बदलत होतं. प्रत्येकजण स्वत.च्या विकासाकडे लागला होता. तरी गावाचं गावपण अजून मूळ धरत नव्हतं. गावात अद्यापही डॉक्टर नाही. सरकारी डॉक्टर-नर्स कित्येक वर्षात फिरकलेले नाहीत. कुणाची प्रकृती गंभीर झाली तर शिक्रापूरहून मोटारसायकलवर डॉक्टरला घेऊन यायचं. मग औषधोपचार. किरकोळ आजार तर तसेच अंगावर काढायचे. बाळंतपणाच्या केसेस अवघडच. ज्याची सोय पुण्यात आहे, अशा आधीपासूनच पुण्यात जाऊन रहातात. पण ज्यांना ते शक्य नाही त्याच्यासाठी त्रास, दुःख, वेदनांशिवाय दुसरं काय वाट्याला येणार ? बैलगाडीतनं केस न्यायची शिक्रापूर-तळेगावला. बैलगाडीच्या हादऱ्यांनी कुठल्याही अवघड केसची सुटका गाडीतच व्हायला हवी.

इंदूबाई कंद म्हणाल्या, 'गावात पूर्वी पक्की घरंच नव्हती. झोपड्याच होत्या. गावाला डॉक्टर माहीत नाय. बाईचं बाळतपण गावातच सुईण करीत असे. अगदी हायरुनाला खिळलीच बाई तर गाडीत घालायची आन् शिक्रापूरची वाट धरायची. इकड शेताची-पोराची काळजी. तिकडं बायकोची काळजी. पोरास्नी शिकवावंसं मस वाटतं, पर चवथीपतुर शिकलं की व्यास. त्याच्यापुढं शिकून करायच काय ? गुरामागं कुणी तरी गडी लागतुच त्येला रोज देण्यापरीस पोर साबाळत आन त्येला अनुभव बी मिळतो. शिकून जे ग्येले त्येंची शेती पडीकच रहाणार उद्या... किंवा इकून टाकणार... कोन करनार ? आता पूर्वी परमानं रायल नाय. पोरं शिकली की, शेतातली कामं त्यास्नी नकोशी हुत्यात. नोकरीच्या मागं जात्यात. पोरी शिकल्या की त्याची लगीनं जमवायला अवघड जातंय. पोरीला खेड्यात द्यायच तर शिकल्येली नको असते. शहरात द्यायची तर चोथी पतूर शिकलेली पोरगी अडाणीच वाटते. वर हुंडा काय कुठं कमी पडतोय ? पोर कशीबी आसली तरीबी द्यायला हवा. तुमी शिबीर घेणार म्हता. आमाला काय शिकविनार शिबिरातून तुमी...? '

कदबाईंच्या प्रश्नानं अस्वस्थ होऊन मी म्हणालो, 'बरोबर आहे तुमच म्हणणं. आम्ही शिबिरात हेच विषय घेणार आहोत.'

शिबिरातून काय विषय असावेत याविषयी पुण्यात कार्यालयात चर्चा करताना शेतकऱ्याच्या विविध समस्या, बँकेसंबंधी, पिकासंबधी बीजेसबधी गावच्या सुधारणा, विषमता निर्मूलन, आरोग्य, शिक्षण याबरोबरच महिलांचे विषय घ्यावेत अशी सूचना केली गेली होती. महिलाच्यापुढे अनेक समस्या आहेत. महिलाच्या समस्या सुटल्या तर ग्रामीण भागाच्या विकासाचा मार्ग आपोआपच खुला होईल. हुंड्याचा प्रश्न, आजारपण, बाळंतपण, साक्षरता-निरक्षरता, द्विभार्या चाल, मानसिक कोंडमारा, सासू-सासरा-पती-मुलगा-समाज या सर्वांचे लक्ष स्त्रीच असते. शेतात राबणाऱ्या बैलांना काही वेळानंतर सुट्टी मिळते. आजारी पडला तर पोटच्या मुलासारखी काळजी घेतली जाते. ग्रामीण भागातील महिलाना या गुरांइतपतही किंमत नाही.

**तुमी शिबीर घेणार म्हंता. आमाला काय शिकविनार शिबिरातून तुमी ?**



यात्रेचं सांस्कृतिक स्वरुप संपलं. आता फक्त तमाशासाठीच यात्रा

¤

सतत पहाटे चार वाजल्यापासून त्या ज्या कामाला जुंपतात त्या रात्री गुरांच्या पुढे चारा घालून अंथरूणावर पडेपर्यंत. त्यानंतरही अंथरूणावर तिच्या मनाचा विचार पुरुष करीत नसतो. अशा परिस्थितीत जर सवत असेल तर तिच्या मानसिक–शारीरिक क्लेशाला पारावार नसतो.

शिबिरातून याचा विचार कशाप्रकारे होणार...? त्याचा उपयोग कितपत होईल...?

ग्रामायनच्या पुढच्या टप्प्यातील सामाजिक कार्याची दिशा कशा प्रकारे असेल...?

¤

गाव दुष्काळातून बाहेर पडले. हातात पैसा येऊ लागला. हळूहळू कर्जबाजारीपणा कमी झाला. तसतसं ख्यालीखुशालीकडे लक्ष जाऊ लागलं. गरजेतून म्हणा किंवा हौसेतून म्हणा. कधी मूल न होण्यामुळे, कधी मुलीच जन्मल्यामुळे, कधी शेतीतील गरजेमुळे, कधी पुरुषाच्या गरजेमुळे दुसरे लग्न होताना दिसते. मूल न होण्याच्या समस्येतून तर तीन तीन लग्न झालेली दिसतात. गावाचा विचार केला तर एक दोन आडनावं सोडली तर बरीचशी माहेरवाशिणीच्या वतनावर आलेली कुटुंबं आहेत. सर्वत्र असेच असते. वंशाला दिवा नाही आला की, सर्व जावयाची धन होणार. या काळजीनंच, दुसरं लग्न करायला घरातले–बाहेरचे भाग पाडतात.

ग्रामायनची जबाबदारी शेतकऱ्याला त्याच्या कर्जातून मुक्त करून बंद लिफ्ट सुरू करून किंवा अन्य एखादा आर्थिक विकासाचा कार्यक्रम हाती घेऊन त्याला विकासाच्या मार्गावर आणून सोडायचे. लिफ्ट पुन: बंद पडणार नाही यासाठी गावकऱ्यांना सक्रिय सहभाग घ्यायला लावायचा. प्रबोधनातून हळूहळू सर्व व्यवहार शेतकऱ्याच्या ताब्यात द्यायचे. त्यासाठी दैनंदिन व्यवहारातून, आचारातून शेतकऱ्याला कामासाठी प्रेरित करायचे आणि त्यासाठी वर्षातून एकदा अशा प्रकारच्या शिबिराचे आयोजन. आता त्यापुढील सामाजिकतेकडे अधिक लक्ष द्यावे लागणार का ?

¤

दारू पिण्यावरून गोष्टी निघाल्या. एके ठिकाणी एक बाई म्हणाल्या, ‘दारू पिणं वंगाळ हाय. पर काय करनार... दुस्काळ हुता तवाची गोष्ट हाय. तवा रुपय दोन रुपय मजुरी मिळायची. खानारी तोंडं सात आठ. त्या रुपय दोन रुपयात आनल्यालं पोरांच्या वठालाच पुरायचं नाय. दिवसभर काम करायचं. रातच्याला थोडी सुकडी खायची आन घोटघोट दारू पिऊन राह्यचो. आन झोपायचो. सकाळच्यालाबी असंच. खड्डु खणायचं, खडी फोडायची, पाटचा वहायच्या उपासपोटी. दारू प्यायल्यावर समदं स्रम निगून जायचं. पोरांचं दुखणं पाणी हायच वर. पैसं आनायचं कुठून ? आता तवाची दारू कुठली सुटाय बसलीय ? घरातल्या घरात कवातरी घेतु आमी.

समृद्धी हे वरदान तर खरेच; पण संकटकाळात नाईलाजानं ज्या गोष्टी कराव्या लागल्या, ज्या चांगल्या परंपराचा त्याग करावा लागला. त्यात अनेक सांस्कृतिक गोष्टी लोप पावल्या. यात्रेचे सांस्कृतिक स्वरूप संपले. आता फक्त तमाशासाठीच यात्रा असते. उत्तमोत्तम तमाशाचे फड यावेत. उत्तम गाणाऱ्या–नाचणाऱ्या बाया त्यात असायला हव्यात. त्यासाठी गावकरी चढ्या स्वरूपात वर्गणीही द्यायला तयार असतात. यात्रेतला कुस्त्यांचा फड लुटुपुटुचाच भरू लागला. तमाशाचा फड मात्र दिवसरात्र रंगू लागला.

सालाबादप्रमाणे फिरंगाईची यात्रा आली आणि गावात एक चैतन्याचे वातावरण निर्माण झाले. आयाबायांनी भिंती सारवायला–लिंपायला काढल्या. चुन्याच्या फकीनं रंगकाम होऊ लागलं. कारभारी मंडळी शिक्रापूर–तळेगावला जाऊ लागली. ज्यांचा कांदा निघाला होता त्यांची कांदा बाजारात न्यायची घाई सुरू झाली. ज्यांचा कांदा मागास होता त्यांनी हातउसने, कर्ज महिन्याच्या बोलीनं घेतलं. आया–बायांसाठी साडीचोळी, पोरांसाठी नवे कपडे, कापड चोपड आणलं जाऊ लागलं. थोरवे टेलरचं मशीन रात्ररात्र चालू लागलं. पावण्यारावळ्यांसाठी ठेवून दिलेले भात सडून आणलं. खपली निवडणं टिपणं झालं. बाजार भरला जाऊ लागला. दिवसभर कांद्याच्या काढणीमागे–गाडीमागे असणारे सांच्याला सरपंचांच्या घरासमोर जमू लागले. तंबाखू चोळत चोळत गप्पा रंगू लागल्या तमाशाच्या–वर्गणीच्या.

‘अमन तांबेचा तमाशा चांगला हुता......’, ‘अमन तांबेपरिस शिवा संभा’,–‘विठाबाईचा...’, ‘काळू–बाळूची सर कुणाला नाय यायची.’ ‘वीस हजार घेत्यात.’ ‘आपल्याला याखेपेला फसकलास तमाशा हवा. मग वर्गणी धा-पाच ज्यादा घ्या.’

दोन-चार दिवस कारभारी मंडळींनी नेट लावला आणि सुपारी देऊन आले. आठ हजाराला ‘भिका–भिमा सांगवीकर आणि मंडळी’. यांचा तमाशा ठरवून आले. किती बाया–किती बापे–किती गाड्या यांची वर्णने बघत बघता साऱ्या गावातून चघळली जाऊ लागली.

अखेर यात्रेचा दिवस उजाडला. पाहुण्या-रावळ्यांनी गाव गजबजून गेलं. पताका लावल्या गेल्या. घराघरातून नैवेद्य जाऊ लागला. देवीचं देऊळ लहानखुरसं. माणसांनी बायांनी फुलून गेलं. ही फिरंगाई देवी कुरकुमची. भक्तासाठी दूरवर आली. हिला नवस केलेला पावतो अशी हिची ख्याती. नवसाचे कोंबडे-बकरे देवीच्या देवळासमोरच्या दगडांसमोर कापले जातात देवीच्या देवळासमोरचे दगड म्हणजे दानव-राक्षस. त्यांना त्यांचा नैवेद्य मांसाहाराचा द्यावा लागतो. देवीला मात्र पुरण-पोळीचा नैवेद्य ! देवीने दानवांचा पराभव केल्या-

वर दानव शरण आले आणि देवीकडे त्यांनी आसरा मागितला आणि आपला आहार मागितला. देवीने त्याना ते दिले. अशी ही फिरंगाई देवी. मांसाहारी भक्ताचीही सोय पहाणारी. शाकाहारीचीही सोय पहाणारी !

छबिना निघाला. परंपरागत पद्धतीने सर्व गावकरी देवीच्या दर्शनाला निघाले. सरपच, पोलीसपाटील मानकरी, मागे गावातील ग्रामस्थ पाहुणे. सर्वात पुढे वाजत्रीवाले-पिपाणी-सनईवाले. छबिना झाला की लगेच कुस्त्यांचा फड होता. त्यामुळे परगावाहून आलेली पैलवानमंडळी घोळक्या-घोळक्यानं कुस्त्याच्या फडाकडं जमू लागली होती.

देवीच्या देवळाजवळचं वावर माणसानी फुलून निघालं होतं. पैलवान अर्जुन काळे, दत्तोबा फडतरे, कातीलाल काळे लोकाना गोलाकार बसवून घेत होते. कुस्त्या पहायला गर्दी होऊ लागली होती. राहू, पाठठाण, वडगावबांडे, पारगाव, आलेगाव, वाळकी, शिरूर, तळेगाव, सागवीसाडस, डोंगरगाव, पिंपरीसांडस न्हावीसाडस इत्यादी ठिकाणाहून तरुण पैलवान जमले होते. सुरुवातीला लहान-लहान मुलाच्या कुस्त्या झाल्या. हळूहळू मोठ्या तरुणाच्या होऊ लागल्या. पैलवानांचं नाव घेऊन पुकारल जायचं. साधारणपणे डावात वरचढता दिसू लागली की पंचमंडळी वरचढ पैलवानाला बक्षिस देत असत. विजयी जाहीर करीत असत. कुणाचीच पाठ जमिनीला लागू दिली जात नव्हती. फक्त पैलवानाचा कस पाहून परीक्षा केली जात होती. ही पद्धत चागली वाटली. पैलवानाची तयारी जोखण्यापुरतीच कुस्ती होत असे आणि कटुता किंवा पराभवाची जाणीव याचा लवलेशही त्यातून कुठे दिसत नव्हता. अलिकडे स्पर्धांतून खिलाडूपणा लोप पावून मैदानावर संतप्तपणाचे दर्शन घडते, पचाना मारहाणी-पर्यंत कधी कधी प्रकार झाल्याचे दिसतात. त्यामुळे या ठिकाणची ही पद्धत प्रोत्साहन देणारी, उत्साह वाढविणारी वाटली. एखाद्या जोडीनं अधिक चपळाईनं खेळ खेळला तर त्याची वाहवा होत असे. एखादा पैलवान गडी चपळाई करून प्रतिस्पर्ध्याला चितपट करतानाही दिसे. अशा वेळी जुनी जाणकार मंडळी पचानी कुस्ती लवकर न सोड-विल्याबद्दल नाराज होत असत. गावागावातले सबंध खेळीमेळीचे रहावेत, निकोप स्पर्धा व्हावी आणि मोठ्या निकाली कुस्त्याच्या फडासाठी पैलवानांची तयारी व्हावी यासाठी अशा प्रकारे कुस्त्या केल्या जात. सूर्य मावळून अंधार पडायला लागला आणि अखेरची एक हजार एकची कुस्ती झाली.

पुनः वाजतगाजत सर्व मंडळी गावात आली. छबिन्यात पुढे मोर आणि घोडा नाचविणारे होते. मोराचा मुखवटा आणि घोड्याचे मुखवटे अडकवून दोघजण चांगले नाचत होते बँडवाले हिंदी सिनेमातले गाणे वाजवत होते आणि मोराचं रूप घेतलेली स्त्री (हा पुरुषच असतो) आणि घोड्याचं रूप घेतलेला घोडेस्वार यांचा नाच गावात चावडीसमोर चालू झाला.

रात्री ९ वाजेपर्यंत शाळेसमोरचा परिसर स्त्री-पुरुषांनी भरून गला. तमाशाचा फड उभा रहात होता. पण दोन गाड्याच्या ऐवजी एकच गाडी आल्यामुळे लोकात नाराजी दिसत होती. एकच गाडी आलीय म्हणजे कलाकार कमी आलेत. कलाकार कमी म्हणजे नाचणाऱ्या कमी. जितक्या नाचणाऱ्या जास्त तितका तमाशा मोठा ! लाऊडस्पिकर सतत चालू होता.

जेवण-खाण उरकून एक-एकजण जमत होता. शाळेचं पुढचं आवार गच्च भरून गेलं. वस्त्यांवरून बैलगाड्या जुपून मंडळी आली होती. परगावाहून खास तमाशासाठी सायकलीवरून तरुण मंडळी येत होती. कारभारी मंडळी सर्वांची व्यवस्था करण्यात दंग होती. आया-बाया-तरण्या पोरी नटूनथटून जागा अडवून बसल्या होत्या ! जो तो आपली मोक्याची जागा शोधत होता, बसत होता. आनंदाची उधळण सुरू होती. प्रत्येकाचा चेहरा हर्षानं निथळत होता. चेष्टा-मस्करी-विनोदाना उत आला होता. नमन झालं. नमनाला सर्व कलाकार हजर असतात. पाच बाया आणि पाच-सहा इतर कलाकार. पेटीवाला, ढोलकीवाला असा सरंजाम होता. लोकात कुजबुज सुरू झाली. 'आयला पाचच बाया हायतो.' 'आरं तुणतुणवाला दिसत न्हाई,'

याची दुसरी गाडी आता येईल मग येईल करता करता ती तमाशा उभा राहिला तरी आली नाही.

कुणी तरी म्हणालं, दुसरीकडची सुपारी घेतली असेल. तिकडे गेली असेल. मग आता त्याला बोलीप्रमाणे पैसे नाही द्यायचे.

अशा गप्पांचा सूर सुरू झाला आणि तिकडे गण रंगू लागला. हळूहळू लोक रंगू लागले. सोंगाड्या आणि एक नाचणारीण याचा संवाद सुरू होता. नाचणारीण एक-दोन वाक्यं झाली की एखादी गिरकी घेत असे. ठुमकत ठुमकत येत बोलत असे. प्रत्येक वाक्य हे श्लेषार्थी—दोन अर्थ निघणारे असे संवाद चालू होते आणि वाक्या-वाक्याला कारंजं उडावं तसा समुदाय गदगदून हलत होता, हसत होता, शिट्ट्या फुकत होता. एकमेकाला चिमटे काढीत होता. पुरु-षाच्या बरोबरीने स्त्रियांमध्येही हास्याची उधळण होत होती !

नाचणाऱ्या स्त्रियांच्या नाचण्यात, बोलण्यात, अविर्भावात, शृंगार ओसडून चालला होता. कधी कधी त्याचे ते शृंगारिक बोलणे ऐकवत नव्हते. केवळ करमणूक, शृंगारिक संवाद, चाळे यापलिकडे त्यात काही नव्हते. एक संवाद झाला की एक गिरकी आणि मुजरे करीत करीत नाचत येण—'अरे किसना, अरे कान्हा मनरजन मोहना ऽऽऽ !' असा गाणाऱ्या आणि गाणारे सूर धरत. ढोलक्याची थाप कडाडून पडे आणि 'हो ऽऽ' करून पुनः संवाद सुरू होई.

त्या सर्व थुई थुई करणाऱ्या वातावरणात एका श्रोत्याला ते अधिक जाणवू लागलं. इतराच्या नोटा जात होत्या. त्याचबरोबर त्यानंही (दत्तोबा फडतरे) आनदा पाटकऱ्याच्या हस्ते दहा रुपये पाठवले. अल्ल्या गावात एकाचे तरी मत जागृत होते.

'या नोटेचे सांगणं हाय. तमाशा चांगला रंगू लागलाय. गौळण चागली रंगतीय पर इथं महिला आयापण हायत. तवा जरा अश्लिलता कमी करा !'

सोंगाड्यानं तेही हसून स्वीकारलं; पण कार्यक्रम तसाच चालू

**नाचणाऱ्या बायकांच्या नाचण्यात, बोलण्यात, अविर्भावात शृंगार ओसंडून जात होता.**

पाहिला. गणगौळणी नंतर वगाला सुरुवात झाली.

एकीकडे तमाशाला उधाण आलं होतं. सर्व गाव शृंगाररसात डुबत होतं, जीवाची करमणूक करीत होतं. लहान मुलंमुलींपासून तरण्याताठ्या पोरीबाळींसह म्हाताऱ्या कोताऱ्या बाया पुरुष सर्वजण तमाशात दंग झाले होते. ढोलक्याचा कडाडणारा आवाज, गाणाऱ्या बायकांचे चढेकर्कश्श्य आवाज या सर्वांमधून कान दुसऱ्याच एका ध्वनीचे वेध घेत होते. काळोखातून टाळमृदंगाची धूनही दूरवरून ऐकू येत होती' अभंगाची तान कानावर येत होती. आकाशात काळोखात लुकलुकणाऱ्या ताऱ्याप्रमाणे, चंद्राच्या प्रकाशाप्रमाणे मनाला त्या भजनाचे सूर एकदम शितल करून गेले. शरीराचे स्पर्श संपून हृदयाला स्पर्शून गेले. वादळवाऱ्यात वेशीवरच्या पडक्या देवळातील नंदादीप शांतपणे तेवत रहावा, त्याप्रमाणे शृंगाररसात आख्खं गाव डुबत असताना चार-सहा मंडळी मात्र एका बाजूला चावडीवर मिणमिणत्या दिव्याच्या उजेडात भक्तिरसात न्हाऊन निघाली होती. कृष्णाची दोन रूपं एकाच वेळी पहायला मिळत होती. एकीकडे मन रंजवणारा, गोपींच्यात रमणारा, अश्लिक विनोद करणारा, दहीदूध चोरणारा तमाशातला कृष्ण आणि दुसरीकडे आठ्ठाविस युगे आपल्या भक्तांसाठी कमरेवर हात ठेवून उभा असणारा भक्तिरसानंच साऱ्या महाराष्ट्राला वेड लावणारा पांडुरंगकांती कृष्ण ...... शृंगाराच्या उघळणीतही या दूर आडगावातील चार जणांना त्यानं वेडं केलं होतं.

रात्र वाढत होती. एकीकडे तमाशाही रंगात आला होता. दुसरीकडे भजनाचे सूर कानावर येत होते. माझं मन त्या गोंगाटापासून दूर गेलं होतं.

## कुठं तरी उणीव होती

तमाशा. साऱ्या गावाला तमाशाने वेडं केलं होतं. पहाटे चारपर्यंत रंगल्यानंतर सकाळी नऊ-साडेनवाला परत तमाशा उभा राहिला. आघोळी पांघोळी उरकून रात्रीप्रमाणेच गर्दी जमली. रात्रीपेक्षा प्रमाण थोडे कमी. पण गर्दी चांगलीच होती. रात्रीच्या काळोखात ट्यूब लाईटच्या प्रकाशात अप्सरा-मेनका वाटणाऱ्या नाचणाऱ्या आता थोड्या उतरलेल्या दिसत होत्या. झगमगाट नसल्याने त्यांचे सौंदर्यही रात्री इतके खुलून दिसत नव्हते. रात्री दहा ते चार असे सतत सहा तास नाचल्यानंतर सकाळी पुन: ९ वाजता वाढत्या उन्हात त्या आपली कला दाखविण्यासाठी तोंड रंगवून चाळ बांधून उभ्या होत्या. यातल्या काहींचे विवाह झालेले होते. दोन दोन मुलं होती. तमाशाबरोबरच प्रपंच चालू होता. पोटासाठी वणवण भटकावं लागत होतं. बारा बारा तास, चौदा तास पायात चाळ बांधून नाचावं लागत होतं. अवेळी जेवून झोपावं लागत होतं. कुठं तरी गाडीत-तंबूत झोप उरकून पुन: तोंडाला रंग फासून पायात चाळ बांधून लोकांची मनं रिझविण्यासाठी उन्हात उभं रहावं लागत होतं!

दुपारी दीडपर्यंत तमाशा चालला होता. संध्याकाळी त्यांची दुसरी गाडी आली. वाट चुकल्याने भलतीकडेच रात्री गेलेली गाडी आल्यामुळे लोकात आणि कलाकारातही उत्साह संचारला. रात्री पुन: ९ वाजता फड उभा राहिला. भरगच्च संचात स्टेजच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत नाचणाऱ्या बाया पायात चाळ बांधून मुजरा करीत उभ्या होत्या. ढोलकीवर कडाडून थाप पडली आणि नाचाला-नमनाला सुरुवात झाली.

¤

दोन रात्र आणि एक दिवस असे मनोरंजनात आबालवृद्ध स्त्री-पुरुषांनी घालविले. केवळ पधरा दिवसात बारा ते पंधरा हजार रुपये वर्गणी जमा झाली. शंभरसव्वाशे कोंबड्या कापल्या गेल्या. दहाएक बकरं कापली गेली. साधारणपणे कापडचोपड, मिरचीमसाला असा विचार केला तर सरासरी दीड ते दोन हजार रुपये घरटी खर्च झाले. साठ-पासष्ट घराचा हिशोब केला तर या दोन दिवसात एक लाखाच्या आसपास उलाढाल या यात्रेच्या निमित्ताने झाली. कापडचोपड हे वर्षात सहा महिन्यातून होणारा खर्च सोडला तर बाकी निव्वळ मौज, करमणूक, खाणं, पिणं यासाठी!

कांद्यानं आलेली समृद्धता! पुढच्या वर्षी याहीपेक्षा अधिक जोरात यात्रा होणार. दिवसेंदिवस हे प्रमाण वाढतच रहाणार. एकदा जवळ होऊ घातलेलं धरण पूर्ण झालं, धरणात पाणी साठलं की मग या कोरेगावचा दिमाख विचारू नका! हिरवा चारा होईल, बारमाही पाणी होईल. सरकारी दूध सोसायटीची बांधणी चालू आहे. एक एक विकासाच्या योजना आखल्या जात आहेत. एकेकाळच 'भिकार' कोरेगाव आता भिकार राहणार नव्हतं. भिकार राहिलं नव्हतं. समृद्धीची गंगा वाहू लागली होती; पण लोक आहे तसेच होते. डोंगर उघडेबोडके, सर्वत्र कुबाभुळीच जंगल. हळूहळू दारूचं प्रमाण वाढणार. स्वत च्या समृद्धीच्या मागे लागलेल्या शेतकऱ्याला गावाची सुधारणा कराविशी वाटत नव्हती. सरपंचांसारखी काही मंडळी राबताना दिसत होती; पण त्याला म्हणावे तसे रूप येत नव्हते. ग्रामायनच्या कार्यकर्त्यांचे अथक परिश्रम वाया जाणार की काय अशी भीती कधी कधी वाटत असे.

कोरेगाव बहरले होते; पण फळाला येत नव्हते. कुठं तरी कशाची तरी उणीव जाणवत होती.

¤

बँक ऑफ महाराष्ट्राचे कर्ज-हप्ते आणि पीक-पाणी-कर्ज हप्ते. लोकांची बाकी तशीच आहे. काहीजण नियमित भरणारे आहेत; पण बरेच जणांची थकलेली आहे. ८३ ला लिफ्ट सुरू झाली ८४ ला पहिला हप्ता भरला जायला हवा होता. काहींनी भरला. ज्यांची खाजगी लिफ्ट आहे त्यांनी भरला. काहींनी त्यासाठी खाजगी कर्ज काढून हप्ता भरला. कारण पहिलेच वर्ष असल्यामुळे पीकपाणी विशेष आलं नाही. पाणी पुरलं नाही. मागास कांद्याची पिकं जळून गेली. पीकपाणी कर्ज उशिरा मिळाल्यानं त्यासाठी खाजगी कर्ज. दरमहा शे. ३%, ५% व्याजानं काढावी लागली. पीकपाणी कर्ज उशिरा मिळाल्यावर वस्तुत: ते खाजगी कर्ज देऊन टाकायला हवं होतं; पण शेतीतल्या इतर कामात ते वापरलं गेलं त्यामुळे खाजगी-कर्ज, त्याचे व्याज भरमसाठ असल्यानं वर्षाअखेरीस पीक निघाल्यावर प्रथम दिले गेले. इतर खर्च-वगैरे वजा जाता हातात काहीच शिल्लक नाही, अशी अवस्था. त्यामुळे पुन: थकबाकी आहेच. यासाठी पीकपाणी कर्ज हे अगदी वेळेत मिळाले तरच या खाजगीकर्जाच्या बोजातून शेतकरी सुटू शकतो. त्यामुळे थकबाकीचा प्रश्न गंभीर बनला आहे. यावर्षी पीक उत्तम असल्याने हा बोजा काही प्रमाणात कमी होईल असे वाटते. पीकपाणी कर्ज वेळेवर न मिळाल्याने अनेकांना त्रास

झालाय. म्हस्के या दलित शेतकऱ्याची कहाणी अशीच आहे. स्वतःची थोडी शेती. लिफ्टचा सभासद. सभासद व्हायला पैसा नाही. सर्वांनी सहकार्य केले. पहिल्या वर्षी कर्ज काढून कांदा लावला. पाऊसपाण्या अभावी लिफ्टचं पाणी पुरलं नाही. कांदा जळाला. बँकेचे हप्ते भरायला पैसा नाही, पीकपाणी कर्ज घेतलं ते अंगावरच. घरात खायला दाणा नाही. खाजगी कर्ज कोणी देत नाही. या वर्षी त्यानं आपली जमीन दुसऱ्याला वाटघानं करायला दिली. ज्याला दिली त्यानं लिफ्टचे पाणी घेतले नाही. कारण त्याची बागाईत आहे. त्यामुळे बाजरी केली फक्त. ती सहा पोती झाली. तीन पोती म्हस्केंच्या वाटघाला आली. त्यातले एक पोतं पैशासाठी विकलं. राहिलेली दोन संपत आलीत. स्वतः म्हस्के दुसऱ्याला शेतावर 'सालाना' कामाला राहिले. त्याचे ३००० रु. मिळणार. त्यातली बरीचशी उचल दर महिन्याला होतच असते. एकूण हातात काहीच नाही. जमीन असूनही पीक नाही. वर बँकेचं कर्ज आहेच. अर्धपोटी रहाणंही नशिबी आलंच. म्हस्के हे नवबौद्ध कुटुंब. देवदेवस्कीवर विश्वास ठेवणारं. या अडचणींच्यामुळे त्रासून गेलेलं. देवाचं 'जागरण' घातलं नाही म्हणून या अडचणी आहेत, असं समजणारं. कर्ज काढून जागरण घालणारं.

या कर्जबाजारीपणाचे एक उदाहरण हृदयाला पीळ पाडणारं आहे. आनंदा शुक्ल हा २० वर्षांचा तरुण सभासद शेतकरी. वडील वारल्यामुळे घराची जबाबदारी अंगावर पडलेली. थोरली बहीण नवऱ्याशी न पटल्यामुळे घरीच. आई म्हातारी. आनंदाचं लग्न दीड-दोन वर्षांपूर्वी झालं. स्वतःच शेतीत राबणारा आनंदा अचानक पडलेल्या सर्वच जबाबदाऱ्यांनी खचून गेलेला. पीकपाणी कर्ज उशिरा मिळालं. पेरण्या करताना, खतासाठी, बियाणासाठी ६०० रु. सासऱ्याने आनंदाला दिले ऑगस्टमध्ये. पुनः बँकेचा हप्ता मागच्या वर्षाचा थकला होता तो भरण्यासाठी डिसेंबरात सासऱ्याकडून ८०० रु. आनंदानं आणले. या वर्षी कांद्याचं पीक चांगलं आलं आनंदा खूष होता. गावकरीही आनंदाच्या सासऱ्याला धन्यवाद देत होते. सर्वांच्याबरोबर आनंदानंसुद्धा नाफेडला कांदा घातला आणि एक दिवस, पट्टी मिळायच्याच आदल्या दिवशी सासरा हजर झाला. आनंदाची जबाबदारी त्यानं स्वीकारलीच होती. शिक्रापूरला पट्टी आणायला सासरेबुवा गेले. २८०० रु. कांद्याची पट्टी आली. सासरेबुवा आनंदाला म्हणाले, मी जातो गावी. नंतर ये तिकडे. आनंदा सासुरवाडीला गेला तर सासरेबुवांनी त्याच्या हातावर २८०० रुपयातील ४० रु. ठेवले आणि म्हणाले, बाकीचे पैसे दरमहा १५ टक्के व्याजाने मी माझे काढून घेतले! आनंदाच्या डोळ्यासमोर काजवे चमकले. वर्षभराचे सर्व श्रम वाया गेले या वर्षी प्रथमच आलेला पैसा सासऱ्यानं गोड बोलून भरमसाठ व्याज लावून लुबाडला होता. ६०० रु. वर दर महिन्याचे १५ टक्के ने ९०० रु. व्याज, म्हणजे मुद्दल धरून १५०० रु. दहा महिन्यात. डिसेंबरमध्ये घेतेलेल्या ८०० रु. चे पाच महिन्यात ६०० रु. म्हणजे मुद्दल धरून १४०० रु. झाले. एकूण २९०० रु. होतात सुरुवातीचे सहाशे ज्यावेळी दिले होते, त्यावेळी १६० रु. सासऱ्याने कट करून घेतले होते. ते या २९०० वजा केले २७६० रु. आलेल्या २८०० रु. कांद्याच्या पट्टीमधून ते वजा करून घेऊन आनंदाच्या हातावर सासऱ्याने कृपावंत होऊन ४० रु. ठेवले! सख्ख्या सासऱ्याने अशा प्रकारे नागवल्यावर आनंदाचे डोळे उघडले. पण पुढचे वर्ष-पाऊस काळातील खर्च, प्रपंच, बँकेचे कर्ज हप्ते त्याच्यासमोर आवासून उभे आहेत. यातून गावकऱ्यांच्या सहकार्याने सुरेश पवार आणि कार्यकर्ते काही तरी मार्ग काढतील, आनंदाची तात्पुरती गरज भागेल. पण आनंदाची या कर्जाच्या चक्रातून मुक्तता कशी होणार? म्हस्केची मुक्तता कशी होणार? केवळ पाणी शेतीला देऊन हे प्रश्न सुटणार नाहीत आणि मदत देऊनही भागणार नाही. मदतीबरोबरच प्रबोधन करावे लागणार. सातत्याने कार्यकर्त्यांना कंबर कसून काम करावे लागणार आहे आणि ग्रामायनचे कार्यकर्ते ते करतही आहेत. पण आनंदासारख्या फसलेल्या शेतकऱ्यांवर काय उपाय?



गावातला आजचा बदल चकित करून टाकतो

¤

फसणं एकट्या आनंदाचंच आहे असं नाही लिफ्टच्या बाबतीत सर्वांचीच फसवणूक झाली. लिफ्टच्या योजनेत ३ इलेक्ट्रिक मोटारी बसवायच्या होत्या. सर्व काम पूर्ण झाले; पण फक्त दोनच मोटारी बसल्या. लिफ्ट सुरू झाली तरी तिसरी मोटार आलीच नाही. कॉन्ट्रॅक्टर तर पैसे घेऊन बसला! कुणीच काही करू शकलं नाही. लिफ्ट बंद पडण्याची जी अनेक कारणे आहेत त्यात त्यावेळच्या संचालकांच्याकडून घडलेल्या अशा निष्काळजीपणाच्या चुकाही आहेत. पूर्वी मोटारला पट्टा असे हा पट्टा तुटत असे. तो आणायला पुण्याला जावं लागे. गाड्या वेळेवर नसत मग कधी कधी रिक्षाने-टॅक्सीने यावे लागे!

हे ऐकलं की हसावं की रडावं हेच समजत नाही. वेळोवेळी येणाऱ्या अडचणींवर गाव मात करीत करीत उभं रहात होतं. दुष्काळाच्या चटक्यानं शहाणं बनलं होतं.

ग्रामायनच्या कार्यकर्त्याला हे गाव कसं सापडलं आणि नेमकं हेच एवढं आडभागातलच कसं सापडलं याबद्दल कधी कधी लोक आश्चर्य व्यक्त करताना दिसतात गावातला आजचा हा बदल पाहिला तर आश्चर्यानं तोंड बंद होईल.

¤

मुंबई विद्यापीठातील प्रा. स. ह. देशपांडे आणि श्रीमती प्रा. सावंत कोरेगावच्या या सर्व बदलाचा, विशेषतः शेतीतल्या बदलामुळे झालेल्या कौटुंबिक बदलाचा अभ्यास करण्याकरता या गावचे सर्वेक्षण करीत आहेत.

एक अत्यंत दुर्गम, आडगावी असणारे कोरेगाव भिवर. नकाशातला हा सूक्ष्मसा ठिपका, विकासाच्या मार्गावर येत आहे हे मात्र खरे.

¤

शिबिराची तयारी सुरू झाली होती. कार्यकर्ते वस्तीवस्तीतून हिंडत होते. घराघरातून जात होते. धान्य– गहू, ज्वारी, तांदूळ जमा करीत होते. प्रत्येकजण आपल्या गावच्या शिबिरासाठी मदत करीत होता. गावच्या इतिहासात अशा प्रकारचा कार्यक्रम प्रथमच होणार होता. चावडीला प्रथमच रंग देण्यात आला. शाळा सारवण्यात आली. पताका लावून मारुतीचे मंदिर सजविण्यात आले. या शिबिराने नव्या बांधलेल्या शाळेचे उद्घाटन करायचे ठरले. गावकरी, सरपंच-काळे, अर्जुनराव काळे, बबनराव नवले, दत्तोबा फडतरे, म्हस्के सर्वजण झटत होते. तरुण मंडळातील कार्यकर्ते खांद्याला खांदा लावून खपत होते. भोजन व्यवस्था समिती, निवास व्यवस्था, कार्यक्रम व्यवस्था अशा समित्या काम करीत होत्या. सुरेश काळेच्या मातोश्रींनी स्वयंपाकाची जबाबदारी स्वीकारली. त्यांच्या जोडीला दोघी तिघीजणी आल्या. लाईटची व्यवस्था श्री. काळभोर यांनी केली. प्रत्येकजण सोपविलेली जबाबदारी आपुलकीने पार पडत होता. कांतीलालची पत्नी पुण्यात हॉस्पिटलमध्ये आजारी असूनही तो हजर होता. ज्ञानोबा शुक्लाच्या घरी असेच आजारपण होते. प्रत्येकाच्या मागे कांहींना कांही काळजी, कामाचं ओझं होतं. तरीही प्रत्येकजण शिबिराच्या उभारणीत सहभागी होत होता. ग्रामायनच्या कार्यक्षेत्रातून कार्यकर्ते येणार होते. सागवी सांडस, देवकरवाडी, दहिटणे, शिवतक्रार म्हाळुंगी, निमगाव, पुणे इ. ठिकाणचे आणि खुद्द कोरेगाव असे मिळून शभरजण उपस्थित झाले.

## शिबिराचा पहिला दिवस

शिबिराची सुरुवात सामूहिक गीताने झाली. ग्रामायनचे कार्यकर्ते– मुंबई विद्यापीठासाठी कोरेगावचे सर्वेक्षण करण्यासाठी आलेले मारुती आढावकर यांनी 'श्रमदेवते जनदेवते' हे गीत सांगितले. गावचे सरपंच बबनराव काळे यांच्या हस्ते श्रीफळ फोडून शिबिराचे उद्घाटन झाले. 'माणूस' साप्ताहिकाचे संपादक आणि ग्रामायनचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. श्री. ग. माजगावकर यांनी उद्घाटनपर भाषण केले पहिल्या दिवसाचे पहिले सत्र पुण्यातील सामाजिक कार्यकर्ते आणि 'जाणीव' संघटनेचे प्रमुख श्री. विलास चाफेकर यांनी 'युवक संघटन' याविषयावर घेतले. ग्रामीण भागातील युवकांना येणाऱ्या अडचणी, ग्रामविकासातील युवकांचा सहभाग कशा प्रकारे वाढविता येईल, शेती करता करता गावातील सामाजिक कार्यात कशा प्रकारे सहभागी होता येईल याविषयी चर्चात्मक असे हे सत्र झाले. प्रत्येक गावाच्या वेगवेगळया बैठका घेण्यात आल्या. त्या बैठकांमधून गावात कोणत्या गोष्टीची गरज आहे यावर चर्चा करण्यात येऊन त्यातील अग्रक्रमाने गरजांची यादी बनविण्यात आली आणि युवक मंडळाद्वारे या अडचणी कशा प्रकारे सोडविता येतील याचा विचार झाला. रस्ता, विहीर, पिण्याचे पाणी, दवाखाना, पोस्ट ऑफिस, एस्. टी. ची सोय बालवाडी, प्रौढसाक्षर वर्ग, महिला मंडळ, ग्रंथालय, झाडे लावणे इ. कार्यक्रम आखण्यात आले. त्यासाठी पुढील सहा महिन्यात कशा प्रकारे आपापल्या गावात युवक मंडळाचेद्वारा प्रयत्न करता येईल यावर चर्चा करून कार्यक्रम निश्चित करण्यात आला. या सत्रामध्ये ग्रामायनचे नामदेव माळी, अनिल काळे हरिभाऊ टेमगिरे, धनवडे यांनी भाग घेतला. भोजनोत्तर दुपारी याच सत्राचा उत्तरार्ध घेण्यात आला. त्यामध्ये विविध ठिकाणहून आलेल्या शिबिरार्थींनी आपले ग्रामीण भागातील अनुभव कथन केले. प्रा. विलास चाफेकर यांनी या सत्राला मार्गदर्शन केले. या सत्राला जोडूनच महिलांची एक बैठक झाली. 'अभिजात' वार्षिकाच्या संपादिका स्मिता पटवर्धन यांनी महिलांच्या बैठकीत मार्गदर्शन केले. शिवतक्रार म्हाळुंगीच्या पारधी प्रकल्पातील पारधी महिला, कोरेगाव भिवरमधील पारधी महिला आणि इतर महिला अशा पंधरा महिला या बैठकीस उपस्थित होत्या. कौटुंबिक अडचणीपासून गावातील प्रश्नावर, महिलांच्या प्रश्नावर यामध्ये चर्चा झाली. दारूचे व्यसन, अशिक्षितपणा, हुंडा, अंधश्रद्धा, आरोग्य कसे राखावे यावर चर्चा झाली. स्मिता पटवर्धन म्हणाल्या, 'आपण क्षुल्लक कारणावरून भांडणाऱ्या बायका मोठमोठ्या सामाजिक प्रश्नावर गप्प बसतो. आपण बोललं पाहिजे. शिकलं पाहिजे. गावातील सामाजिक विषयात रस घ्यायला हवा. पाणी आणणं, घरातील सर्व कामे आपणच करतो. मग आपणच आपल्या स्थितीकडे लक्ष द्यायला हवं. भांडायला हवं पण केवळ स्वत करिता नव्हे सर्वांकरिता तुम्ही प्रौढसाक्षर वर्गात जायला हवं. तरच तुमची मुलं शिकतील. डॉक्टरकडे किरकोळ कारणांवरून न जाता काही काही आजार हे आपल्या दुर्लक्षामुळे होत असतात. थोडी स्वच्छता अधिक पाळलीत तर हे रोग –अतिसार वगैरे होणार नाहीत. सारं जग सुधारलंय मग आपण नको सुधारायला ?'

पटवर्धनबाईंनी पारधी स्त्रियांना बोलकं केलं. या बैठकीत सौ. अजनीबाई फडतरे, सौ. मंदाकिनी फडतरे, सुनिता ओरपे, जना काळे, शांताबाई भोसले (पारधी) शांताबाई–शाम पिंपळे (म्हाळुंगी–पारधी), जराबाई पिंपळे यांनी भाग घेतला.

अशा प्रकारच्या शिबिरात स्त्रिया प्रथमच भाग घेत होत्या. मोकळेपणाने आपल्या व्यथा मांडत होत्या. तीन दिवसांच्या शिबिरात महिला मंडळ कसे असावे, आरोग्य, साक्षरवर्ग, बालवाडी याविषयावर महिलांनी चर्चा केली. सौ. मंदाकिनी फडतरे आणि सौ. अंजनीबाई फडतरे यांनी सर्व महिलांच्यावतीने विचार मांडले आणि आता गावच्या विकासात महिला मागे रहाणार नाहीत असा विश्वास दिला. महिलांवर येणाऱ्या घरगुती–सामाजिक बंधनांवर सौ. अंजनीबाई फडतरे यांनी टीका केली आणि पुरुषांनी समजून घेऊन जर घरकामात मदत केली तर महिलांसाठी काही कार्यक्रम घेता येतील असे सांगितले. महिलांच्या सहभागाने सुरुवातीला काहीसे तणावाचे बनलेले कोरेगावचे वातावरण दुपारपर्यंत निवळले आणि पुन: मुक्तचर्चेला सुरुवात झाली.

पहिल्या दिवशी रात्री 'सामना' चित्रपट दाखविण्यात आला.

¤

दुसरा दिवस हा गावकऱ्यांच्या विज मंडळासंबंधीच्या अडचणी, बँकेसंबंधीच्या अडचणी आणि सहकारी दुग्ध व्यवसाय या विषयावरील चर्चेकरिता होता. त्यापूर्वी आरोग्य दक्षता मंडळ, पुणे, यांचेतर्फे आरोग्यविषयक सचित्र भित्तीपत्रकाचे प्रदर्शन भरले होते. त्यासंबंधी सौ. स्मिता पटवर्धन यांनी माहिती दिली. वीज मंडळासंबंधीच्या चर्चेस विशेष रंग चढला. लोकांच्या विविध प्रकारच्या अडचणींवर मंडळाचे वरिष्ठ अधिकारी श्री. रानडे यांनी उत्तरे दिली. अडचणी-

बाबत नुसतीच कारणे न सांगता त्यानी शेतकऱ्याच्या अडचणी समजून घेतल्या आणि ज्याची कार्यवाही होण्यासारखी आहे अशांची नोंद करून घेतली. एका ज्वलत विषयाचे खेळीमेळीत रूपातर करून श्री. रानडे यांनी एक प्रकारची जवळिकच निर्माण केली.

दुपारचे सत्र विंझारचे अनुभवी कार्यकर्ते श्री. चंद्रकाका रायरीकर यांनी 'सहकारी दूध व्यवसाय' या विषयावर घेतले. आपल्या अनुभवातील किस्से सागत सागत त्यानी सहकारी दूध व्यवसाय कशा प्रकारे करावा, त्यातील अडचणी, धोके, फायदे याविषयी तपशिलवार माहिती दिली. अनेकाच्या प्रश्नाचे समाधान केले.

युवक मडळासंबधी श्री. अनिल काळे, रविकांत आदरकर, नामदेव माळी, आढावकर यानी स्वतत्र बैठका घेऊन पुढील सहा महिन्यातील करावयाचे कार्यक्रम निश्चित केले. रात्री 'जांणीव' या पुण्याच्या संघटनेने पथनाटयाचा कार्यक्रम करून लोकांची मने जिकली· हुडयाच्या अनिष्ट प्रथेवरील पथनाटय लोकाच्या हृदयाला जाऊन भिडले. महिलाचे डोळे पाणावले. पथनाटयाद्वारे प्रबोधनाचा हा कार्यक्रम अत्यत यशस्वी झाला. 'जाणीव'च्या कलाकाराचे सर्वांनी कौतुक केले.

याच वेळेस कोरेगाव भिवरच्या तरुणानी पाणी वाटपावरील प्रश्नावर उत्स्फूर्त पथनाटय सादर करून गावकऱ्यांची दाद मिळवली. ग्रामायनचा कोरेगावचा कार्यकर्ता आनंदा भालेराव, आत्माराम भागवत, विठ्ठल लवंगे, बन्सीलाल फडतरे यानी यात भाग घेतला. पोवाडे–गाणी म्हणून कोरेगाव सांस्कृतिक बाबतीतही मागे नाही, हे दाखवून दिले. आनंदा भालेरावच्या नकला, विनोदी स्वभाव यामुळे त्याने कार्यक्रमात रग भरला. कोरेगाववरचा एक पोवाडा, डॉ. बाबासाहेब आबेडकरावरचा पोवाडा हे त्याने स्वत: लिहिले आणि गायले. पाण्यावरील पथनाटयाचे लेखनही आनदाचेच. आत्माराम भागवत हा आनदाप्रमाणेच कविता, गाणी करणारा. दारूच्या दुष्परिणामावरील एक छोटेखानी एकांकिका त्याने लिहून बसविली होती· त्यालाही लोकानी टाळ्या दिल्या. महिलानी आणि भजनी मंडळाने भजने म्हणून दुसऱ्या दिवसाचा कार्यक्रम खूप रात्री सपवला.

¤

समारोपाचा तिसरा दिवस हा वेगवेगळ्या अर्थाने गाजला. आरोग्यदक्षता मंडळाचे डॉ. अरविंद पटवर्धन यानी समारोपापूर्वीचे सत्र घ्यायला सुरुवात केली आणि शिबिराच्या यशस्वितेने कळस गाठला. पटवर्धनाचे गप्पाटप्पा–सवादातून प्रात्यक्षिकाद्वारे चाललेले सत्र सपूच नये असे लोकाना वाटले. डॉ. पटवर्धनानी आरोग्य, वनीकरण, सामाजिक समता, इ. विषयांवर चर्चा केली. बिनधुराच्या चुलीच्या प्रात्यक्षिकाला महिलावर्गाने गर्दी केली आणि समारोपाला संपूर्ण गाव शिबिरमय होऊन गेले.

नाशिक, निफाडचे लोकप्रिय आमदार, माजी मंत्री श्री विनायकराव पाटील, राहूचे जि प. सदस्य मा सुभाषअण्णा कूल, पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र सस्थेचे डॉ गेडाम, महाबँकेचे एक अधिकारी श्री. देशपाडे ही मंडळी समारोपासाठी खास आलेली. श्री. विनायकराव पाटलानी आपल्या विनोदी व खुशखुशीत शैलीत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. परपरागत शेतीव्यतिरिक्त काही नवे करण्यास सांगितले आणि त्याकामी स्वतः केलेल्या घायपात-निलगीरीच्या लागवडीच्या प्रयोगांची माहिती दिली आणि त्यासाठी लागेल ते सहकार्य देण्याचे मान्य केले. सुभाषअण्णा कूल यांनी शिबिराबद्दल ग्रामायनला धन्यवाद दिले. ग्रामायन करीत असलेल्या शेतकऱ्याच्या पाण्याच्या कामासबंधी त्यानी गौरवोद्‌गार काढले. ग्रामायनचे अध्यक्ष डॉ. देशपाडे यांनीही शिबिरार्थींना मार्गदर्शन करून शिबिराचा समारोप केला. कोरेगाव भिवरचे सरपंच बबनराव काळे याचे हस्ते श्रीफल देऊन सुरेश काळे यांनी आभार मानले.

¤

तीन दिवस चाललेले शिबिर संपले. सर्वजण आपापल्या गावी गेले. संपूर्ण गाव तीन दिवसातील विविध कार्यक्रमाने भारून गेले होते. सुरुवातीला न पटणाऱ्या गोष्टी लोकाना पटू लागल्या होत्या.

शिबिर यशस्वी होण्यासाठी हनुमान तरुण मडळाचे कार्यकर्ते रात्रंदिवस झटत होते. गावकरी, महिला सर्वांच्या प्रयत्नाने शिबीर यशस्वीपणे पार पडले. लहान मुलांनी–सांस्कृतिक कार्यक्रम केले. शाळेचे श्री. माने गुरुजी यानी त्यासाठी परिश्रम घेतले मुलींची सख्या अधिक असल्याच जिल्ह्यातलं तिसऱ्या क्रमांकाचं बक्षिसही शाळेला मिळालंय. शिबिराच्या उभारणीत त्यांचा हातभार लागला.

¤

ज्ञानोबा शुक्ल भेटले. काही कारणामुळे ते पूर्ण वेळ शिबिराला उपस्थित राहू शकले नव्हते.

'आता बघा पोरं कशी कामं करतील ते. अहो त्यांना हे असं काही असतं हे माहीतच नाही. आमच्या बायका कधी कुठं गेल्या नाहीत. आता काही तरी होईल. पहिलं ग्रंथालय सुरू व्हायला हवं वाचनाचा नाद लागायला हवा.'.

शुक्लाच म्हणण खरं होत. त्याना स्वत ला लिखाणाचा नाद आहे. सकाळी सरपच काळे यांनी तर धक्काच दिला. 'प्रभुणे हे सरपंचपद गळयात पडलय. नाही तर मला एक कादंबरी लिहायचीय. पूर्वी मी थोड थोडं लिहिलय. एकदा बसू आपण'

कोरेगाव भिवर असं एका एका अंगानं उलगडत होत. इथं आनंदा भालेराव, पाटकरी, भागवत, विठ्ठल लवगेसारखे कथा–कविता–पोवाडे लिहिणारे गावात आहेत, सरपंचांसारखे कादंबरी लिहिण्याचा प्रयत्न करणारे आहेत. भजनी मडळ आहे. येथील स्त्री–जीवन अनुभवान समृद्ध आहे कोरेगावमध्ये स्त्रियाची संख्या पुरुषापेक्षा अधिक आहे. त्यामुळे येथील स्त्रियाच्यात जागृती होत होती हे चांगले चिन्ह होतं.

¤

पारधी वस्तीवरचा येथला अनुभव वेगळाच आहे. पारध्याचे कुटुब इथं राखणीसाठी आहे. राखणो करायची आणि पोटं भरायची. त्याना जमिनी नसल्यामुळे हे भूमिहीन आहेत. खाऊन–पिऊन सुखी असणारे पारधी कुटुंब गावाशी मिळून मिसळून जमून वागत असते.

## पहिलं ग्रंथालय सुरू व्हायला हवं. वाचनाचा नाद लागायला हवा....

कामधंदा करून जमा झालेले पैसे कुणा अडलेल्याला व्याजानंही देण्या-इतपत पारधी पैसे साटवून आहेत. दारू गाळणं हा परंपरागत व्यवसाय सोडून पैसे व्याजानं देणारा पारधी हा झोपड्यातूनच रहातोय. बायकाच्या अगावर परंपरागत दागिने आणि वेश आहे. शिबिरात पारधी स्त्रियानी जमीन मिळवून देण्यासाठी प्रयत्न करायची विनंती केली.

पैलवान अर्जुन काळे, सरपच बबनराव, तरुण मंडळातील कार्यकर्ते खूष होते. या प्रकारचा अनुभव त्यांना प्रथमच येत होता. शहरातील नामवत मंडळी जमिनीवर बसून गप्पागोष्टी करताना, जवळकीने वागताना, बोलताना, जेवताना पाहून त्यांना आश्चर्य वाटत होते. प्रत्येकजण शरीराबरोबरच मनाने एकरूप होत होता. ग्रामायनच्या जवळ येत होता. कोरेगावच्या विकासाचे ठरवत होता. ग्रंथालयाची सुरुवात करण्यासबधी बोलत होता. काही जणाना 'एक होता कार्व्हर' चे वेड लागले होते. विकासाची दिशा सापडली होती. हृदयातल्या दुःखावर फुकर घातली गेली होती. आपण एकटे नाही. आपल्याबरोबर अनेकजण आहेत. फक्त पावलाला पाऊल जुळवून मनाला मन जुळवून जायला हवे आणि आता केवळ स्वतःकडे पहायचे नाही. महिलानाही त्यात सामावून घ्यायचे.

एका बाजूला, जगापासून दूर असलेल्या कोरेगावची भीमा कोरडी ठणठणीत पडली असली तरी कोरेगावकरांच्या अतःकरणातील भीमेला पाझर फुटला होता. अंदमानाप्रमाणे एकाकी जीवन जगणारे कोरेगावकर मनापासून मनावरची बधने झुगारून देऊन मुक्त झाले.

कर्जमुक्तीच्या मार्गावर आज कोरेगाव उभे आहे. जुन्या ढासळलेल्या सांस्कृतिक पायावर नव्या संस्कृतीची इमारत उभी रहात असताना काही प्रश्न उभे रहाताना दिसत आहेत. दोन पिढ्यातील अपरिहार्य सघर्षाला विधायक वळण लावण्यात यश मिळाले असले तरी तणाव काही प्रमाणात कायम रहात असतोच. कोरेगाव एका बाजूने पहाटेपूर्वीच्या काळोखात उभे आहे. अधार आहे पण गडद नाही. उजेड आहे पण दिसत नाही. अशा संमिश्र वातावरणातून तरुण पिढीच्या मनात नव्या जाणिवांची ज्योत फुलू लागलीय. हळूहळू त्या आत्मज्योतीच्या प्रकाशाने गाव उजळून निघेल.

¤

तीन महिन्याच्या वास्तव्यानंतर परतण्याच्या मार्गावर होतो. येतानाच्या उन्हाच्या झळाळ्याचा आता कुठेच पत्ता नव्हता. मधे पडलेल्या वळवाच्या पावसाने थडगार झुळुका येत होत्या. उघड्या बोडक्या दिसणाऱ्या डोंगर पठारावर हिरवीगार मखमल तुरळकपणे दिसू लागली होती. दूरदेशी गेलेली पाखरं आभाळात उडताना दिसत होती. जणू गावातल्या बदललेल्या वातावरणाची चाहूल त्यांनाही लागली असावी. □

## दोन मुलाखती : पृष्ठ ११ वरून

आपल्या जीवनाचा सर्वोच्च आनंदाचा आणि दुःखाचा क्षण कोणता ?

—माझ्या जीवनातला सर्वोच्च आनदाचा क्षण म्हणजे मी जन्माला घातलेली शिवसेना, प्रथम मुबई महापालिकेत सत्तारूढ झाली तो. त्यावेळी इतर पक्षांचे मुबईत चागले बळ होते. सर्वांना शह देऊन यश मिळवता आल्याने आनद वाटला. दुसरा मोठा आनदाचा क्षण म्हणजे दादाच्या 'जीवनगाथे'चे प्रकाशन. दादाना त्याची जीवनगाथा त्याच्या हयातीत आणि त्याच्या आवडत्या शिवसेनेच्या महापौराच्या हस्ते प्रकाशित झालेली पहायला मिळाली १९७३ मध्ये ! या कार्यक्रमानंतर महिनाभरातच दादा गेले. अर्थात जिवत असताना आपले पुस्तक पाहण्याचे भाग्य अनेकांना लाभते हा भाग वेगळा, दादांना आपल्या 'जीवनगाथे'चे प्रकाशन स्वतःच्या डोळ्यांनी पहायला मिळाले हे महत्त्वाचे. त्या कार्यक्रम सोहळ्याचा क्षण हा माझ्या जीवनातला अत्यंत आनदाचा क्षण. दुःखाचे क्षण सांगायचे तर बरेच सांगता येतील. पण कोणाचेही नाव न घेता मी असे म्हणेन की, ज्यांना शिवसेनेनी नावारूपाला आणले, मोठे केले, प्रतिष्ठा दिली त्यानी त्याचा विचार न करता माझ्या अडचणीच्या काळात माझ्या पाठीत विश्वासघाताचा वार केला व ते निघून गेले, हे मी कदापि विसरू शकणार नाही. हे माझे दुःखाचे क्षण. मला सत्तेचा मोह नाही. आमदार, खासदार, मुख्यमंत्री वगैरे काही काही व्हायचे नाही. कसलाही मोह नाही, आकर्षण नाही. जीवनात काही तरी भव्य दिव्य करून आनदाचे सोने लुटावे हा माझा विचार आहे. हाच विचार रात्रदिवस डोक्यात घोळवत मी भटकत असतो, धडपडत असतो. □


**राजहंस प्रकाशन**

**कुंपण आणि आकाश**

मंगला गोडबोले

वीस रुपये

बाईचं सुख ? तिला दुःख आहेच कुठे ?
हा युक्तिवाद एकीकडे आणि
आपल्या सांस्कृतिक, सामाजिक संदर्भात
बाईला सुख मिळणं शक्य नाही
ही भूमिका दुसरीकडे
खरं तर या दोन टोकांमध्येच
स्त्रीजीवनाच्या अमर्याद शक्यता,
सामर्थ्य आणि मर्यादा असण्याची
शक्यता आहे. त्या शोधण्याचा
एक प्रयत्न !

# यात्रा उत्तराखंडाची
## एका दाक्षिणात्याच्या नोंदवहीतून

● अजित ना. कानिटकर ●

### १७ मे ते २२ मे ८५

'आज झेलम एक्स्प्रेस वेळेवर सुटली!' ही पुण्यातील वृत्तपत्रांमध्ये २ कॉलमी शीर्षकाची व मजकुराची बातमी होऊ शकेल. निदान तिच्या वेळेवर सुटण्याने आमच्या प्रवासाचा–यात्रेचा आरंभ तरी चांगला झाला आहे. सीमेवर रक्षणासाठी जाणाऱ्या जवानांची, मोठमोठ्या काळ्या रंगाच्या अवजड ट्रंका घेऊन, गाडीत चढताना होणारी दुर्दशा व आबाळ नेहमीचीच आहे. आजही त्याचीच आवृत्ती आहे. दिल्लीपर्यंतचा प्रवास हा वेगवेगळ्या स्थानकांवर मिळणाऱ्या मुबलक पाण्यामुळे निदान काहीसा सुसह्य झाला आहे.

दिल्लीपासूनचा प्रवास मात्र आता आराम बसने सुरू झाला आहे. हरिद्वार व त्यानंतर ऋषिकेश हे प्रवासातील पहिले दोन मोठे टप्पे. हरिद्वारला गंगामैय्याचे पहिले दर्शन घडले आहे. यापुढे १५–१८ दिवस प्रवासात वेगवेगळ्या ठिकाणी भागिरथीची म्हणजे गंगामैय्याची सोबत आहे हरिद्वारमध्ये दिवसभर टांग्याने हिंडून वेगवेगळी मंदिरे आम्ही पाहतो आहोत. 'भारतमाता मंदिर हे या मंदिरामधील वेगळे मंदिर. इंदिराजींच्या हस्ते ३–४ वर्षापूर्वीच त्याचे उद्घाटन झालेले छायाचित्र तेथे लावलेले आहे. संपूर्ण हिंदुस्थानचे मानचित्र व 'भारतमाता' मंदिरात स्थापलेले आहे. याचे उद्घाटन इंदिराजींनी केले हे विशेषच म्हणायचे. एकूण Double Standards! संघाने एकात्मता यज्ञात हेच सांगितले. पण त्यावेळेस प्रचंड शिव्याशाप यांनीच दिल्या. राजीवजींनी गंगाजलाचा कलश 'सीन' मध्ये ओतला की तो दोन संस्कृतींचा अनोखा संगम! एकात्मता यज्ञात असेच गंगाजल देशभर नेण्यात आले. तो प्रयत्न मात्र देशाची अखंडता व ऐक्य यांना बाधक ठरला.

दुपारी ४–४॥ पासून हरिद्वार गंगा मंदिराशेजारी घाटाच्या पायऱ्यांवर पाण्यात पाय सोडून जागा पटकावून आम्ही बसलो आहोत. अंधार पडण्यापूर्वीच घाटाच्या पायऱ्यांवर लोट गर्दी जमली आहे. समोर प्रवाहापलिकडे दिसणारा काठही भाविकांनी भरून गेला आहे. गंगेच्या प्रवाहात, एका द्रोणाच्या होडीत फुले व त्यामध्ये कापूर–वात प्रज्वलित करून, हे फुलांचे व दिव्यांनी सजलेले द्रोण सोडून देण्यासाठी हे लोक व आम्हीही जमलो आहोत.

६॥ नंतर अंधार पडल्यावर हे दृश्य, वेगवान प्रवाहातून जाणाऱ्या या प्रकाशज्योतींमुळे आणखी गंभीर बनले आहे. सर्व भारतभरातून आलेले लक्षावधी भाविक वर्षानुवर्षे अशा 'गंगाजीकी आरतीके लिए' तेथे येत असतात. आजही वेगवेगळ्या प्रांताचे प्रतिनिधी तेथे सहजच उठून दिसतात. हा खरा भारत–हे भारताचे यथार्थ प्रतिनिधित्व. एक त्या विवेकानंदांना या देशाची खरी व अचूक नाडी गवसली. बाकी केवळ वेषाने भगवे–धुपारत्या करण्यात गुंतलेले साधू-महंत व अनेक भोंदूही! एकीकडे प्रवाहाचा खळखळाटाचा आवाज व त्या प्रवाहासोबत फुलाच्या द्रोणांच्या होड्यांमधून जाणारे शेकडो दिवे...फार सुंदर दृष्य आहे. काय या सगळ्याचा अर्थ असावा? मनुष्य ही एक लहान चैतन्याची ठिणगी व तिचा अनंताकडे–सागराच्या प्रचंड सूर्याकडे–एकरूप होण्यासाठी चाललेला हा प्रवास–गंगामैयाच्या साथीनं. का अन्य काही पौराणिक–धार्मिक गूढ? बरोबर ७॥ वा. मंदिरात आरती सुरु होते आहे ॐ जय जगदीश हरे ही आरती सुरू झाली आहे. प्रचंड समया घेऊन मंदिराचे पुजारी घाटावर आले आहेत. त्या समयांच्या प्रकाशात संपूर्ण किनारा उजळून निघाला आहे. आमचीही मने त्यामुळे उजळली गेली आहेत!

हरिद्वारनंतर ऋषिकेशकडे प्रयाण. ऋषिकेशमध्ये पाहण्याच्या लक्ष्मण झूला, गीताभवन मंदिर, स्वर्गाश्रम व आणखीही सात-आठ मंदिरे आहेत. काली कमलीवाला यांचे मंदिर लक्षणीय आहे. हिमालयातील विविध तीर्थक्षेत्रांच्या यात्रा करणाऱ्या यात्रिकांवर काली कमलीवाला या महात्म्याचे अनेक उपकार आहेत. जागोजागी आसऱ्यासाठी अनेक धर्मशाळा–निवासस्थाने या महात्म्याने बांधली. एकच कांबळे अंगावर घेऊन वावरणाऱ्या या महात्म्याला नावच पडले 'काली कमलीवाला बाबा!' ऋषिकेशला हरिद्वारप्रमाणेच पुन्हा एकदा मनसोक्त स्नान झाले आहे. या सर्वच ठिकाणी मंदिरांमध्ये प्रेक्षणीय स्थळांच्या जागी Photography strictly prohibited ही चपराक. आता सॅटेलाईटने तासातासाला ब्रिगेड फॉर्मेशन्स व त्यांच्या हालचालींचे फोटो मिळतात, गोपालन् व कुमार नारायण ते विकूनही मोकळे होतात पण; श्रद्धेने भाविकतेने फोटो काढणाऱ्यांना हा बांबू! ऋषिकेशला संध्याकाळी सर्व ७०-७२ यात्रिकांची रामभाऊ वैद्य यांनी छोटी बैठक बोलावली आहे. परस्पर परिचयाचा

ओळख–कार्यक्रम झाल्याने ग्रुप अधिक एकसंघ झाला आहे. खरे यानी एक छान कथा सांगितली. 'प्रत्येक गोष्ट विनिमयात मोजता येते ! त्याग–सेवा–प्रेम आपुलकीही त्यात मोजणार?' प्रवास–सहल रगात चालली आहे.

## गुरुवार २३ मे १९८५

आज पायी प्रवासाचा शुभारंभ आहे. पुणे ते दिल्ली व हरिद्वार–ऋषिकेशच्या पुढेही रेल्वे व बसचा प्रवास चालू आहे. त्यानतर आज प्रथमच हिमालयात 'चालण्याचा' अनुभव आम्ही घेतो आहोत. ८ किलोमीटर म्हणजे साधारण ५ मैल अंतर चालायचे आहे. हिमालयातील पायी प्रवास सह्याद्रीतील भ्रमंतीपेक्षा अनेक पटीनी सुदर आहे. हिरवीगार झाडी, चालताना सतत उजव्या किंवा डाव्या बाजूस सोबतीस असणारे यमुनामैय्याचे पाणी, लांबच लाब पसरलेली खोरी आणि या सगळधात जान आणणारी साधी–भोळी, मायाळू, प्रेमळ पण राकट व कणखर अशी ही गढवाली माणसे.

चढ चढताना मला शबरीमलय अय्यप्पास्वामीच्या यात्रेची सतत आठवण येते आहे. त्या यात्रेत प्रत्येकजण जाती–उपजाती–पंथ–धर्म–वय विसरून 'स्वामी' होतो आणि पढरीचा वारकरी एकदा माळकरी झाला की भेदाभेद सपते तसे प्रत्येक यात्रिक एकमेकाना सबोधतो 'स्वामी' म्हणून, यात्रेकरूचे गट एकमेकाना भेटल्यावर स्वागताची गर्जना करतात– 'स्वामीये शरणम् अयॅप्पो !' येथे या घोषणेची जागा 'यमुना मैय्याकी जय, गंगा मैय्याकी जय' या स्वागत घोषणानी घेतली आहे 'स्वामी' ची जागा 'माताजी, बहनजी, दादाजी' यानी घेतली आहे. दर्शन घेऊन उतरणारे यात्रेकरू व आम्ही वर चढणारे यात्रेकरू अशा घोषणांच्या साद–प्रतिसादात चढतो आहोत. चढता चढता थोडासा बर्फ पडलेली काही शिखरे दिसू लागली आहेत. अजून पूर्ण हिमाच्छादित शिखर पाहायचे आहे. हनुमानचट्टी ते जानकीचट्टी हे अंतर ३–३॥ तासात कापून झाले आहे.

माझ्या मनात सर्वच पायी प्रवासात आम्ही शहरवासीय व आजूबाजूस वावरणाऱ्या गढवाली मंडळींची तुलना चालू आहे. सर्व गोष्टी 'विनिमयाच्या' भाषेत बोलणारे आम्ही शहरवासी या भोळ्या भाबड्या मडळींना नासवून टाकत आहोत. मी लिहायला बसलोय त्या चहाच्या दुकानात असेच काही 'विनिमयवाले' चहा पिण्यास येऊन बसले आहेत. 'टेबल साफ कर !' ही कडक आज्ञा अर्थातच त्यांच्याकडून त्या पाठोपाठ येते.

आमच्याच गटातले काहीजण व्हिडिओवर लावलेला सिनेमा एका खोलीत पाहात आहेत. गावात कोठेही वीज नाही; पण जपानी 'होंडा' 'इंडियावाल्याच्या' गरजा पुरवण्यास आठ हजार फूट उचीवरही समर्थ आहे !

'भारतवासियानो !' या इंडियावाल्यांना समुद्रात बुडवून टाका, याच हिमशिखरावरून ढकलून द्या. तुम्ही याना घोड्यावरून वाहवता, आणखी धनवानाना पाठीवरच्या करंडोत बसवून गळघाशी येणारे हे चढ चढता, त्यातल्या आणखी मातबराना तर पालखोतून चार-चार जण वाहून नेता; पण हेच घोड्यावर बसणारे, तुम्ही ज्याना रक्त आटवून वाहून नेता ते तुमच्याशी किती तुसडेपणे वागतात. तुम्ही ते ऐकून घेता. पोट जाळण्यासाठी ? तुम्ही सर्वजण एक दिवस वाहतूकच करू नका. या मडळींना आम्हाला–तुमच्या पाया पडायला लावा. पैशाच्या बळावर सर्व काही विकत घेता येईल अशी 'विनिमयाची' गुर्मी आलेल्या आम्हा सर्वांना अडवा. विनिमयाऐवजी प्रेम, गोडवा, आर्जव, सद्विचार, माणुसकी ही मूल्येही जगात महत्त्वाची आहेत, असे आमच्याकडून दहा वेळा तरी घोकून घ्या. मगच सोडा आणि तरीही आम्ही ऐकले नाही तरी... तर घोड्याला एक पाय थोडा वाकडा टाकायला सागा.

काय आमच्या गटातील एकेक मंडळी आहेत. काही ट्रेकिंग करायला आल्यासारखी. How beautiful and marvellous अशी आईने न शिकवलेल्या भाषेत बोलणारी. हिमालय ही जागा काय दारूच्या बाटल्या व चारमिनारची पाकिटे फोडण्यासाठी आहे ? हो– यानिमित्ताने बायकानाही पुरुषी कपडे घालता येतात बरं ! ट्रेकिंग ना ! एक सद्गृहस्थ दिवसातून तीन–चार वेळा तरी ब्रशिंग (टीथचे !) करतो आहे. अशी ही सहल म्हणजे अनेक प्रकारच्या स्वभावांचे–नमुन्याचे एक प्रदर्शनच. प्रत्येकांचेच लोभ–मोह–मद–मत्सर इ. इ. सर्व विकाराचे अनोखे मिश्रण त्रयस्थपणे लाबून पहायला मिळते.

संध्याकाळचा वेळ या लहानशा गावातीलच एका गढवाली दुकानात घालवितो आहे. आम्हास त्याच्याकडील रेडिओवरून तो खास गढवाली लोकगीते ऐकवतो आहे. भाषा हिंदीच्या जवळची, मोजके शब्द समजता आहेत. चाली व गाण्यामधील कल्पनाही सुदर सुदर आहेत. दुकानात गाणी ऐकायला जमलेल्या घोळक्यातही अनेकाचे ओठ ही गाणी गुणगुणू लागले आहेत. तो मला सागतो आहे– 'रेडिओ आम्ही चोवीस तास लावतो.' खरेच आहे. या दुर्गम प्रदेशात रेडिओ त्याचा जीव की प्राण आहे मागच्या-लाबच्या पर्वत-शिखराकडे बोट दाखवून तोच सागतो आहे– 'दुष्मन (म्हणजे चीन) कभी भी आ सकता है, हमें सतर्क रहना चाहिए ना !' कमाल आहे या सतर्कतेची !

वाटेत पायी प्रवासात अनेकानेक म्हणजे १०० तरी दृष्ये अशी होती की ज्यांची छायाचित्रे काढावीत असे वाटत होते. भव्य हिमालय तुम्ही ६×५ च्या चित्रात बंदिस्त करण्याचा मूर्खपणा करता आहात ! कजुषपणा करत जेमतेम १५ छायाचित्रे काढली.

## शुक्रवार दि. २४ मे

जानकीचट्टीहून यमुनोत्रीकडे जाण्यास सकाळीच आम्ही सर्वजण निघालो आहोत. थंडी–ऊन–थडी अशी सुखद हवा आहे. यमुनोत्री येथील मदिराच्या दर्शनाबरोबरीने प्रथमच सपूर्ण हिमाच्छादित शिखराच्या रागाचे दर्शन घडते आहे. आमच्या घरच्यांना घोड्यावरून नेण्यास कालीबहादुदूर व भजनसिंग हे दोघे गढवाली आहेत.

यमुनोत्री हे यमुनेचे उगमस्थान भारतीय विचारात नदी ही पाणी म्हणजे $H_2O$ देणारी एक निर्जीव सस्था नाही. त्यामुळे रिव्हर, नदी या शब्दानी जे भाव व्यक्त होत नाहीत,अशा आणखी काही भावभावना म्हणजे यमुनामैय्या. हजारो मैल आजूबाजूचे जीवन फुलवणारी नदी ही एक आईच ! यमुनामैय्यावरील एक निमुळता लाकडी ओडका टाकून केलेला पूल ओलाडून आम्ही मदिराकडे जातो आहोत. १५-२० फूट

अंतरावर बर्फाहून थंडगार पाणी वाहवणारे पात्र आहे आणि इकडे गरम पाण्याचे कुड आहे! इतक्या थंडीत, इतक्या उंचीवर हे गरम पाण्याचे कुंड कसे आले? ते सतत प्रवाही कसे आहे? ते थड कधी होत नाही का, आटतही नाही. त्यात म्हणे गधकाचा अश असतो. हे कुड यमुनोत्री मंदिरापाशीच का? हृषिकेश–दिल्ली–पुण्यास कसे नाही? पर्वतातील गधकाचा साठाही सपत कसा नाही. 'निसर्गालाही मानवाची काळजी आहे' असे कोणीतरी उत्तरादाखल म्हणून जातो.

*गरम पाण्याच्या कुडात (अ) स्नान* (उत्तर भारतीय हिंदीत अस्नान!) केल्यानंतर मंदिरात प्रसन्नपणे दर्शन होते. मदिर लहानसेच असले तरी नीटनेटके आहे. पाठीमागच्या भव्य हिमशिखरामुळे गोपुरे व अन्य इमारतीचा सागाडा नसूनही मदिर प्रेक्षणीय झाले आहे.

न्याहारीनतर परतीचा प्रवास सुरू आणि मधल्या वाटेत हिमालयाने आपला दणका दाखवला! काही मिनिटाच्या आत आभाळ दाटून आले व पाऊसाचे मोठे थेंब, जमिनीवर यायच्या आत थंड होऊन गाराचा सपाटा सुरू झाला. सर्वांचीच फारच तारांबळ उडाली. अर्थात बऱ्याच दिवसांनी बर्फाचा–गाराचा पाऊस लागल्यामुळे मजा आली. हिमालयातील हवेचा कोण भरवसा देणार? आणि हिमालयात चढणे म्हणजे काय पोरखेळ आहे की कोणीही उठावे व त्याला लाथा घालाव्यात. हिमालयातील यात्रा करणे हे येऱ्यागबाळघाचे काम नव्हे.

दुपारच्या पावसात भिजल्यानंतर ३ ते ९॥ हा वेळ चट्टीतील एका चहा दुकानातच घालवला आणि त्यामुळे त्या दुकानमालकाशी स्नेहसंबधही जुळले. प्रवासात ठिकठिकाणी असलेली १०–२० घराची ही आसरास्थाने म्हणजे एक गाव अथवा चट्टी. हे चार–सहा महिने धंदा होऊन जे काही पैसे मिळतील त्यावर थडीचे म्हणजे सर्व प्रदेश बर्फमय झाल्यानतरचे सहा महिने गुजराण करायची. या चहा दुकानात विस्तवापाशी वेळ घालवल्यानतर सर्व थंडी पळाली. रात्रीच्या बातम्यामध्ये 'मार्शल लॉ' हा शब्द ऐकल्यावर त्याने कान टवकारले. श्रीलकेसबधीची ती बातमी आहे हे समजल्यावर त्याला हायसे वाटले. 'शेरका एकही बच्चा होता है, गधेके होते है बीस–पचीस!'– आमच्या घरी कोणकोण भावडे आहेत याची माहिती घेतल्यावर त्याने सांडलेले हे खास पहाडी शहाणपण! इदिराजीचे भाषण कधीतरी देहरादूनला याने ऐकलेले पण त्या भाषणाची स्मृती त्याला कायम आहे. राज्य पाहिजे तर कांग्रेसचे असा आणखी त्यावरून बांधलेला साधा सोपा आडाखा!

## शनिवार २५ मे १९८५

जानकीचट्टीहून हनुमानचट्टीकडे जेथपर्यंत पक्का रस्ता आहे व वाहने येऊ शकतात– सकाळीच परतीच्या पायी प्रवासाला सुरुवात केली. ८ कि. मी. चे हे अंतर दीड तासाच्या आतच कापून झाले.

आमच्या घरच्यांबरोबरचे भजनसिंग व कालीबहाद्दूर माझे मित्र बनून गेले आहेत. काल व आजही पोटचा मुलगा करणार नाही इतकी काळजी घेऊन त्यानी चढाच्या व उताराच्या रस्त्यांवरून त्याना प्रवास घडवला आहे. आईने यमुनोत्री मंदिरात ओटी भरण्यासाठी आणलेला खण कालीबहाद्दूरच्या बायकोसाठी दिला आहे!

हे असे शेकडो बहाद्दूर–भजनसिंग येथे काल–आज दिसता आहेत. हे सगळे तुम्हाला कोणी शिकवले, या नद्यानी, देवदार वृक्षानी, पक्षानी की या ओझी वाहणाऱ्या मुक्या–गरीब खेचरानी? तुमच्यापासून लाब राहणाऱ्या सिमेंट कॉंक्रिटच्या जगलातील आम्हा Social animal ला हे तुम्ही माणुसकीचे गुण शिकवाल का?

दुपारच्या जेवणानतर गगोत्रीकडे बसने आमचा प्रवास सुरू झाला आहे. बडकत या गावापासून गगोत्रीचा वेगळा रस्ता सुरू झाला आहे आणि आता यमुनेचे खोरे सपून साथीला गगेचे खळाळते पाणी आले आहे. उत्तरकाशी येथे रात्रीचा मुक्काम आहे. नेहरु गिर्यारोहण सस्थेमुळे या गावास ख्याती लाभली आहे मनकर्णिका घाट व तेथे जाऊन गंगेच्या पाण्याने अस्नान! या सर्वच प्रदेशातील नद्या व त्याचे पाणी यांमध्ये काहीतरी जादू असली पाहिजे. उत्तरकाशीमधील शिवमंदीर हेही एक महत्वाचे तीर्थक्षेत्र मानले जाते.

## रविवार २६ मे १९८५

गंगोत्रीच्या दिशेने आमचा बस–प्रवास सकाळपासूनच सुरू झाला आहे. वाटेत गंगनानी येथे काही वेळ आम्ही थाबलो आहोत. पाराशर ऋषीनी तपश्चर्या करून येथे गरम पाण्याचे कुंड निर्माण केले अशी या जागेची आख्यायिका आहे. या सर्व आख्यायिका व प्रसंगी गूढ वाटणाऱ्या कथा जागोजागी ऐकताना स्वा. विवेकानद या महात्म्याचेच विचार कानात घुमतात. 'असा देश तुम्हाला माहिती आहे का की जेथील मोठमोठे सम्राट आपली कुलपरपरा कोण्या राजाशी नेऊन भिडवीत नाहीत, अथवा कोण्या दऱ्याखोऱ्यांमध्ये लपून राहणाऱ्या, वेळी अवेळी लोकाना लुटणाऱ्या पेंढारी सरदाराशी जोडीत नाहीत, तर अर्धनग्न–गुहेत राहणाऱ्या ब्रह्मवेत्त्याशी नेऊन भिडवितात?

...हिंदुस्थान हा देश असा आहे!' या देशाच्या प्राचीन-अर्वाचीन कथा–इतिहास–पुराणांवर याहून उचित असे कोणते भाष्य असू शकेल.

गगनानी येथे अर्थातच स्नान व मदिर दर्शन घेऊन प्रवास पुढे चालू आहे. हा सर्व रस्ता सैन्याने तयार केलेला व त्याची व्यवस्था-दुरुस्तीसाठीही सैन्याकडे जबाबदारी सोपवलेला असा आहे सैन्याची एक लहान तुकडी गंगनानी येथेच भेटली. उत्तरकाशीपासून गंगोत्रीपर्यंत सुमारे पाच हजार जवान या व्यवस्थेसाठी– 'सोमा सडक संघटन' या यत्रणेद्वारा काम करतात, तेव्हा यात्रेकरू निर्धोकपणे हा सर्व प्रवास करू शकतात अशी माहिती या जवानाने दिली हिमालयातील हे रस्ते व पूल ही भारतीय अभियते व कारागीर याच्या कर्तृत्वाची लहानशी झलक आहे. अर्थातच पहिल्यादा आभार मानायचे चीनचे! कारण त्यानी आक्रमण केले म्हणून काहीही न पिकणाऱ्या या प्रदेशामध्ये निदान रस्ते तरी अग्रक्रमाने झाले, प्रथम निदान जवान दूरदूरवर पोचले व या देशाला आपल्या सीमा कोणत्या हे अधिकपणे माहिती झाले

हरसोल येथे एका झऱ्याशेजारी बसून जेवण झाल्यानतर दुपारी लंका येथे येऊन पोहोचलो आहोत. वाटेत प्रवासात आमच्या गटाचा मार्गदर्शक उपेंद्र माहिती देतो आहे. 'अमका रस्ता आत्ताच तयार झाला आहे,

१५ दिवसांपूर्वी तो Landslide ने वाहून गेला तेव्हा यात्रिकाना २० कि. मी. पायी चालावे लागले इ. इ.'

लकेहून भैरवघाटी येथे जाण्यास जडगंगेवर एक नवा पूल अलिकडेच बाधला गेला आहे १४५ कोटी रुपयांचा हा पूल बांधणे गेले १०–१५ वर्षे चालू आहे. ७८–७९ मध्ये गंगामैय्याने क्रोधाने पुलाचे सामानच पाण्यात फरफटत वाहवून टाकले. पुन्हा सामान आणण्यापासून सुरुवात ! पुलावरून खाली पाहिले तरी डोळे भिरभिरतात व कोणाचा तरी आधार घ्यावा लागतो अशी खोली–पाण्याची रौद्रता व घनदाट झाडी आहे. पूर्वी हा पूल होण्यापूर्वी ४५० फूट एकदम उतरायचे, एक लहान बांध पार करायचा व पुन्हा सरळसोट, तितकेच अंतर, छातीवर येणारा चढ चढायचा– अशी कथा होती ! पुलाच्या राखणीस–ज्याबद्दल नुसतेच आजवर ऐकत होतो त्या–इंडो तिबेट बॉर्डर पोलीसचे तगडे जवान भेटले. इंदिराजीच्या हत्येनंतर (ITBP) पतप्रधानाच्या संरक्षक पथकात ज्या जवानाना भरती केले ते याचे पथक. सर्व प्रकारची मजबूत कामे करण्याची या पथकाची ख्याती, पाकिस्तान सीमेवर ज्याप्रमाणे पहिले रक्षक–सीमा सुरक्षा दलाचे, तसे संपूर्ण चीन सरहद्दीवर पहिले रक्षक या दलाचे जवान, मग त्याच्यापाठोपाठ नियमितपणे लढणाऱ्या सैन्य तुकड्या.

या जवानाशी दिलखुलास गप्पा झाल्या. सैन्यामधील जवान वा अधिकारी बोलताना 'हिंदुस्थान' असाच अजूनही उल्लेख करतात. या जवानानाही देशाचा इतिहास व भूगोल पक्का माहिती होता. यानीही इंदिराजीना लेहमध्ये एका सभेत ऐकलेले– 'वो तो देवी जैसी थी !' दोनच दिवसापूर्वी याच भागात बर्फात गाडल्या गेलेल्या व मृत्युमुखी पडलेल्या त्याच्या एका कमांडंटची कथाही ते स्थितप्रज्ञपणे ऐकवत होते. 'हम तो तनख्वाह लेते है लेकिन गोलियोका तो सामना करते है न' दिल्ली–मुंबईतील मात्र सुटाबुटातील क्लास–वन्–वाले 'Five day week' साजरा करत आहेत. या जवानाबरोबर, चहा दुकानात व रस्त्याने जाणाऱ्या धनगर–मेंढपाळांच्या गळ्यातही लटकणारा रेडिओ पाहिजेच. (जशी मल्याळी माणसाकडे उघडछाप करणारी छत्री !) रेडिओ हा येथील जीवनाचा आविभाज्य भाग. 'ये आकाशवाणी है, अब आप अशोक बाजपेयीसे समाचार सुनिए' या वाक्याने मिळणारा दिलासा येथेच अनुभवायला हवा.

भैरवघाटीपूर्वी लका येथे बस थांबल्यावरही १५–२० मिनिटे जवानाशी गप्पा करता आल्या. ही सर्व सरदारजी मडळी. पजाबात हिंडताना कृपाण–तलवारधारी शिखाची भीती नाही, पण मनातून एक दबदबा वाटायचा, जरा अंतर ठेवावे असे वाटायचे; पण हेच सरदारजी हिरव्या वर्दीत रुंद छातीवर डझनभर सन्मानपदके लावून एल. एम. जी. पेलत दिमापूर–इफाळच्या रस्त्यांवर आणि येथेही सीमांच्या जवळ दिलासा देतात, हे कसे काय ? 'शीख समाज भारताचा खड्गहस्त आहे.' वगैरे वगैरे टाळधांची वाक्ये. प्रत्यक्षात त्यासाठी सीमा जाऊन बघा.

## सोमवार दि. २७ मे ८५

भैरवघाटीहून गंगोत्री हा ८–१० कि.मी. बसचाच प्रवास आहे. गंगेचे खरे उगमस्थान म्हणजे गोमुख, येथून १८ कि. मी. लाब व पायी प्रवासाचा रस्ता असल्याने ते आमच्या कार्यक्रमात समाविष्ट केलेले नाही. मदिरात दर्शनास जाण्यापूर्वी अर्थातच गगेवरचे स्नान अत्यावश्यकच आहे. गंगोत्रीची उंची सुमारे साडेदहा हजार फूट इतकी आहे. नदीचे पाणी थंडगार अत्यत थंडगार–सुया टोचाव्या असे शहारे आणणारे, बर्फासारखेच जणू आहे पण तरीही ते अत्यंत उबदार आहे. कारण ते गंगामैय्याकडून आले आहे ! हिमालय हा या देशाचा पिता, गंगामैय्या ही माता, आईच्या कुशीत झोपल्यानंतर थंडी वाजेल का ?

अनेक वृद्ध स्त्रिया–पुरुषही आयुष्यात कदाचित एकदाच मिळणारी ही संधी घेऊन त्या 'उबदार' पाण्यात भाविकतेने स्नान करत आहेत. आम्हीही त्या गटात सहभागी झालो. किनाऱ्यावरच गंगापूजन इ. धार्मिक विधीसाठी भटजी मंडळी सुसज्जच होती. भगिरथाने ज्या शीलेवर तपश्चर्या केली तेथे एक लहान मंदिर आहे व त्यानंतर मुख्य मदीर गगामैय्याचे. स्नान व त्यानतर मदिर दर्शनाचा कार्यक्रम व्यवस्थित पार पडला आहे.

आम्ही भगीरथाची परंपरा सागतो आहोत. आणि त्या परंपरेचा वारसा सांगणाऱ्या ज्यानी ज्यांनी ही मंदिरे वर्षानुवर्षे जपली, साभाळली आणि पुढच्या पिढीच्या हवाली केली, त्या अज्ञात भाविकाची धन्य आहे त्याची नावे इतिहासात नोंदवलेली नाहीत त्यांनी मदिराच्या शीलावर आपल्या निशाणीच्या सह्या ठोकलेल्या नाहीत की त्यांचा बायो–डेटा वृत्तपत्रांतून छापून आलेला नाही पद्मश्री–पद्मविभूषणही ते कधी मिळवणार नाहीत; पण त्यानी श्रद्धेने–भाविकतेने अत्यत कष्टपूर्वक खडतर परिस्थितीत ही ज्योत तेवती ठेवली. तुम्हा अज्ञात भाविकांना शतशः प्रणाम. आज मात्र तुमची आठवण आम्ही अत्यत कृतज्ञतापूर्वक करतो आहोत.

गंगोत्री म्हणजेच भागिरथीच्या प्रवाहाच्या पार्श्वभूमीवर सुदर सुदर हिमशिखरे, दिवसभर त्यांची वेगवेगळी रूपे पाठशिवणीचा खेळ चालावा तशी क्षणाक्षणाला बदलणारी दिसत होती. कोणतेही एक दृष्य दीर्घकाळ न टिकणारे आणि ढग–ऊन–सावली याच्या पाठशिवणीतून नजरेस येणारी नवी दृष्ये पहिल्यापेक्षा आणखी मनोवेधक ! हा सर्व चित्रपट गंगोत्री ते भैरवघाटी १० कि. मी. बसच्या 'बाल्कनीत' बसून पाहिल्याने त्यातील लज्जत आणखीनच वाढली वरंधा ते भोर कोळशाच्या ट्रकच्या हौद्यात बसून पाहिलेल्या दुसऱ्या एका चित्रपटाची आठवण झाली; पण सह्याद्री राकट–दणकट–साधा पण मस्तीत असलेला, हिमालय मात्र भाविक शात–सात्विक प्रसन्न वाटणारा.

## मंगळवार २८ मे, १९८५

आजचा दिवस लांबच लांब अशा प्रवासाचा होता. प्रवास म्हणजे घाटामधूनच. भागीरथी व यमुनेची खोरी, पर्वतरांगा ओलांडून, त्यांना मागे टाकून केदारनाथकडे जाणाऱ्या रस्त्याने हा प्रवास आहे. गगनानी, उत्तरकाशी, हरसोल, कीर्तीनगर मार्गे श्रीनगरला रात्रीचा मुक्काम आहे.

येताना टिहरी येथे गगेवर होणाऱ्या आशियातील सर्वात मोठ्या धरणाच्या ( भाक्रा–नानगलपेक्षाही मोठे ) कामाची सुरुवात झालेली दिसते आहे. श्रीनगर

( काश्मीरची राजधानी नव्हे ) जसे जसे जवळ येऊ लागले तसे सोबतीस अलकनंदा नदी रस्त्याच्या कडेकडेने आली आहे. श्रीनगरला गढवाल पर्यटन निगमच्या राजेशाही बंगल्यात आम्हा यात्रिकाचा निवास आहे. हनुमानचट्टीतील मेणबत्तीचा प्रकाश, 'ओपन अेअर' व झऱ्याचे पाणी येथपासून येथील बटन दाबल्यावर लागणारे दिवे, नळ सोडल्यावर बेसिनमध्ये येणारे पाणी व W C. त्यामुळे पब्लिक आज भलतेच खूष आहे !

ता. क – रात्री अनेक खोल्यामध्ये 'बाटल्या' फुटल्या. टिहरीलाच म्हणे खरेदी झाली होती. अरेरे... यासाठी निदान हिमालयात तरी येऊ नका. बाकी ठिकाणे काय कमी आहेत ?

## बुधवार २९ मे, १९८५

श्रीनगर ते गौरीकुंड हा आजचा प्रवास झाला. गौरीकुंड हा केदारनाथच्या प्रवासासाठी बस जाणारा शेवटचा टप्पा, त्यापुढची चढण पायी सुमारे १८ कि. मी. ची.

श्रीनगरहून पुढे लगेच लागणारे गाव रुद्रप्रयाग. अलकनदा व मदाकिनी यांचा हा संगम, हिमालयात प्रत्येकच संगमाला प्रयाग म्हणजेच तीर्थक्षेत्र असे नाव दिले आहे. अलकनदेचे पाणी गढूळ वाटणारे तर मदाकिनीचे स्वच्छ, नितळ पाणी, सगमातही दोघीचे वेगळेपण उठून दिसत होते. १९१८ ते १९२६ आठ वर्षे धुडगूस घालून दोनशेहून अधिक माणसाचे बळी घेणारा 'मॅनइटर ऑफ रुद्रप्रयाग' इथलाच. रुद्रप्रयाग, गुप्तकाशी व सीतापूर असा प्रवास घेऊन सीतापूर येथेच मुक्कामाची व्यवस्था झाली आहे.

काल–आज पाहिलेली दोन परस्पर–विरोधी दृश्ये म्हणजे रस्त्याच्या आजूबाजूस लहानलहान गोरी गोरी हात हलवणारी गढवाली बालके ! आणि अशाच रस्त्यावर अधूनमधून दिसणारी, अशीच लहानलहान गोरी पण भीकेसाठी हात पसरणारी गढवाली मुले. यांना भीकेस कोणी लावले ? तुम्हास भीकेस कोणी लावले ?

गेल्या पंधरा दिवसात टिहरी गढवाल, उत्तरकाशी, पौडी गढवाल व चमोली गढवाल अशा चार जिल्ह्यात प्रवास झाला. पौडी गढवाल हा दलबदलू बहुगुणांचा जिल्हा !

मुक्काम सीतापूर :– सध्याकाळी पडितजीचे अर्धा तास भाषण झाले. अर्थातच भाषणाचा विषय या भागाचा, या मदिराचा इतिहास हाच होता हा इतिहास म्हणजे महाभारताच्या कथा व त्या कथा रगवून सागणारी पंडितजीची मिठासदार गढवाली हिंदी. 'क्या बताऊ महाराज !' हे पालुपद. बहार आली. येथेच ४–६ हजार वर्षांपूर्वी कदाचित आठ–दहा हजार वर्षांपूर्वी पाडव येऊन गेले. महाभारत युद्धानंतर प्रायश्चित्त घेण्यासाठी स्वर्गाच्या व भगवान शंकराच्या शोधात निघालेले द्रौपदीसहचे यात्रिक, त्यांनी म्हणे स्थापलेले केदारनाथचे शिवमंदीर

तेव्हा माणसांनी बाधलेले रस्ते नसतील, उभारलेले कृत्रिम विजेचे दिवे व धर्मशाळाही नसतील असतील फक्त घनदाट जगले, वन्य श्वापदे, खळाळणारे पाणी आणि लाबवर साद देणारी हिमशिखरे आणि त्या जोडीला या यात्रिकाची स्वर्गाकडे म्हणजे हिमालयाकडे जाण्याची अदम्य इच्छा व तपश्चर्या. महाभारत कधी घडले का घडलेच नाही याचा निर्णय इतिहास सशोधकांनी भाडणे करून ठरवावा (वा कधीच ठरवूही नये )पण सीतापूरला संध्याकाळी याच सर्व प्रदेशात पंडितजीकडून तोच यापूर्वी ऐकलेला–वाचलेला इतिहास-कथा पुन्हा ऐकताना भाकडपुराणकथाऐवजी त्या ऐतिहासिक सत्यकथाच असाव्यात असे वाटून गेले. पडितजीच्या रोचक सागण्यामुळे महाभारताचे भारत पुन्हा स्मरणात आले.

हा सर्व प्रदेश म्हणजे बर्फाची शिखरे, घनदाट वनश्री ज्यात दुर्मिळ स्पेशीज् सापडतात अशी निर्जीव स्मारके नाहीत. कदाचित यापेक्षा जास्तच सौंदर्य आल्पसमध्ये वा स्वित्झर्लंडमध्ये असेल. पण ही सर्व स्मारके म्हणजे या देशाची गेली पाच हजार वर्षे चाललेली अखड स्पंदने आहेत. त्यामुळेच ही स्मारके अमूल्य आहेत.

## गुरुवार ३० मे ८५

सीतापूर ते गौरीकुंड हा वीस कि. मी.चा छोटा प्रवास सकाळीच पूर्ण होऊन केदारनाथच्या पायथ्याशी आम्ही पोचलो आहोत. वाटेतील एक गाव सोनप्रयाग, येथे सोनगंगा व मंदाकिनीचा संगम; म्हणून हे आणखी एक तीर्थक्षेत्र. या देशातील प्रत्येकच नदीस गंगा नाव आहे–पैनगगा, शिवगगा, पाताळगगा, सोनगगा. कारण पाणी देणारी, सस्कृती फुलवणारी, जीवन फुलवणारी ती गगा म्हणजेच माता. त्यामुळेच ही नावे देऊन त्याबद्दलची ही कृतज्ञता भारतवासीय व्यक्त करतात. पण 'गंगा' याचे नाव 'गॅंजीस' (Ganges) झाले की या भावभावनाचे वाटोळेच झाले समजायचे !

गौरीकुड येथेही गरम पाण्याचे एक कुंड आहे. पार्वतीने येथे स्नान केले व त्यावेळेस गणपती राखणीसाठी होता इ. इ. कथा प्रसग ज्या स्थानाशी सबंधित आहे तीच ही जागा. गौरीकुडात स्नान करून पायी प्रवासाला सुरवात केली आहे. १६ कि. मी. चा खडा चढ चढून सुमारे ११,००० फूट उंचीवर केदारनाथ येथे आज रात्री पोहोचायचे आहे. जंगलचट्टी, रामवाडा, गरूडचट्टी अशा टप्प्याटप्प्याने दुपारपर्यंत हळूहळू आम्ही सर्वजण पोहोचलो आहोत. पायी प्रवासात 'गंगामैय्याकी जय' ची जागा 'केदारनाथ भगवान की जय' घोषणेने घेतली आहे. गरूडचट्टी आल्यानंतर यात्रिकाच्या जीवात जीव येतो कारण १३ कि मी हुलकावणी देत असलेले मदिर ३ कि.मी. का लाब असेना पण हिमशिखरांच्या पायथ्याशी दृष्टीस पडते. येथेही मंदिराच्या जवळच उगमापासून जवळ असलेली मदाकिनी नदी आहे १६ कि. मी. च्या पायी प्रवासात दगडा–कपाऱ्याचा आधार घेऊन अनेक 'भोंदू' अंगाला राख फासून अर्धनग्न स्थितीत पोटाची खळगी भरण्यासाठी शंकराचा व अन्य तसबिरीचा बाजार माडून बसलेले आहेत. बगालातून आलेल्या भाविकाची संख्या विशेष जास्त असावी. कारण कानावर सतत पडणारी भाषा बंगालीच आहे. अर्थात पंजाबी–हिंदी–गुजराती बरोबरीने पाढऱ्या 'मुंडुमध्ये' आलेले दाक्षिणात्य भाविक स्त्री–पुरुषही आहेत.

## शुक्रवार ३१ मे ८५

सकाळी ५॥ लाच उठून गरम पाण्याच्या बादलीत स्नानाचा देखावा करून मदिराबाहेर लागलेल्या रागेत आम्हीही कुडकुडत

बसलो आहात. मंदिरामागच्या हिमशिखरांवरून येणारा वारा सोबत थंडीही आणतो आहे. मंदिर जनतेस दर्शनास ७ वाजता उघडले, त्यापूर्वी स्पेशल अभिषेक, व्ही. आय. पी. दर्शन इ. इ.

१२ ज्योतिर्लिंगांपैकी एक व महत्त्वाचे मानले गेलेले केदारनाथचे हे शिवमंदिर; याही मंदिराशी भीम–पांडव–शंकरपार्वती यांच्या आख्यायिका–कथा–इतिहास जुळलेला आहे. महाभारत युद्धानंतर पापशमनासाठी ईश्वरप्राप्तीसाठी निघालेल्या पाच बांधवांनी बांधलेले हेच ते मंदिर, असे ऐकताच क्षणभर अंग शहारले. याच ठिकाणी पांडव येऊन गेले होते ? क्षणभर त्या सर्व आख्यायिका ज्याला पंडितजींनी उजाळा दिलेल्या,डोळ्यासमोर येऊन गेल्या. भारतीय-हिंदु विचारांचा एक आणखी तन्हेवाईकपणा पण वैशिष्ट्य म्हणजे केदारनाथची यात्रा पशुपतीनाथास गेल्याशिवाय पूर्ण होत नाही ! असे शास्त्र आहे ही त्यास वर पुरवणी ! शास्त्राचा आधार म्हणून पुन्हा काही कथा की रेड्याच्या रूपात आलेल्या शंकराची व भीमाची क्षुज, त्यात त्या रेड्याच्या पाठीचा भाग येथेच व मुखाचा भाग पशुपतीनाथ येथे पडणे इ. इ. शास्त्र असो वा कथा असो तात्पर्य एकच काशीची गंगा रामेश्वरला अभिषेकासाठी नेली पाहिजे या सबबीखाली या देशवासियांनी हा देश हिंडला पाहिजे, न्याहाळला पाहिजे, समजावून घेतला पाहिजे व अखंड एकात्म ठेवला पाहिजे !

केदारनाथनंतर मंदिराच्या मागे असलेल्या श्रीशंकराचार्य समाधीचे दर्शन घेण्यास आम्ही गेलो आहोत. पेरियार नदीकाठची शांत कालडीची जागा गेल्या तीन वर्षात पुष्कळदा पाहून झाली होती. पेरियार नदीपासून प्रवास करत करत गोदावरी, नर्मदा, यमुना, गंगा ओलांडून हिमालयात येऊन देशभर चार कोपऱ्यांमध्ये धर्मपीठे स्थापणारा तो महापुरुष–कालडी ते केदारनाथ कल्पनेने एक सलगत्व नजरेसमोर येत होते. काल प्रवासात लागलेले असेच एका ठिकाणाचे नाव 'अगस्त्यमुनी '. त्रिवेंद्रमजवळील ४० कि.मी. अंतरावर पश्चिम घाटाच्या कुशीत वसलेले ' अगस्त्यकुटम् ' म्हणजे तेथे अगस्त्यमुनींनी तपश्चर्या केली ते ठिकाण. अगस्त्यमुनी ते अगस्त्यकुटम् हा प्रवास. हजार वर्षांपूर्वी दळणवळणाच्या–प्रवासाच्या अत्यल्प सुविधा असताना, देश जोडणारे हे दुवे मंदिराच्या, कथांच्या, कलाच्या, शिल्पाच्या, संगीताच्या रूपाने, जसाजसा अधिकाधिक प्रवास करावा, तसेतसे सापडत जातात, उलगडतात असे वाटून गेले. केदारनाथ येथे आदिशंकराचार्य आपला वारसा शिष्याकडे दडरूपाने सोडून पुढे निघून गेले अशी कथा आहे, त्यामुळेही त्यांचे समाधीस्थान येथे बांधलेले आहे. India is not one Nation असे म्हणणाऱ्या arm--chair historians ना कालडी ते केदारनाथ (नको ते फारच होईल) गौरीकुंड ते केदारनाथ १८–२० कि.मी. थडीत चढू द्यात म्हणजे मग सत्यच त्याच्या मुखातून वदेल !

जेवणानंतर परतीचा पायी प्रवास सुरू झाला आहे आणि यास योगायोग का काय म्हणावं– उतारूंची घोड्यांवरून–करंडीतून वाहतूक करणाऱ्या सर्वांचा बेमुदत संप आहे असे कळले. आदल्याच दिवशी एका यात्रिकाची शाल चोरल्याचा आरोप एका मजुरावर ठेवण्यात आला. चौकशी न करता पोलिसांनी या घोड्याच्या मालकाची पिटाई केली. काही वेळाने तीच शाल त्या यात्रिकाच्याच सामानात सापडली मग संतापलेल्या मजुरांनी त्या यात्रिकाची व पोलिसाचीही खूप पिटाई केली !

येथेही लाल झेंड्याच्या नेतृत्वाखाली संपाचा बावटा होता. म्हाताऱ्या-कोताऱ्या, लहान-मोठ्या यात्रिकाचे हाल झाले. कारण १५ एक कि. मी. रपेट सक्तीने पायी करणे भाग पडले ना; पण बरे झाले. मग्रूर यात्रिकांना काहीशी अद्दल या निमित्ताने घडली. खरं तर हे यात्रिक सुधरेपर्यंत असे संप वारंवार व्हायला हवेत. न्याय्य मागण्यांसाठी, शोषितांच्या, पददलितांच्या मुक्तीसाठी कोणत्या का रंगाचा झेंडा असेल तरी तो चालेल, असेही वाटून गेले.

---

## शनिवार, १ जून १९८५

---

प्रवासातील संकल्पित चार ठिकाणांपैकी गंगोत्री–यमुनोत्री व केदारनाथ ही तीन ठिकाणे पाहून झाल्यानंतर शेवटचे ठिकाण बद्रिनारायणकडे जाण्यासाठी सकाळीच केदारनाथहून निघालो आहोत. सुमारे २५० कि. मी. चा संपूर्ण घाटाचाच प्रवास आहे. रुद्रप्रयाग, कर्णप्रयाग, नंदप्रयाग, ज्योतिर्मठ (जोशीमठ) ही वाटेतील काही गावे आहेत. दिवसभराच्या प्रवासानंतर दुपारी ५॥ च्या सुमारास बद्रिनारायण मंदिराचे दर्शन घडले आहे. याचीही उंची सुमारे साडेदहा हजार फूट इतकी आहे.

वाटेतच गोविंदघाट हे एक गाव लागले आहे. गुरू गोविंदसिंहही येथे येऊन गेले ही भावना दिलासा देणारी आहे. गोविंदघाट येथे गुरुद्वार आहे व येथूनच १६,५०० फूट उंचीवरील हेमकुंडसाहिब गुरुद्वाराकडे जाणारा पायी रस्ता निघतो. त्यापुढे valley of flowers-अलिकडे पाच वर्षे त्यात कोणालाच प्रवेश दिला जात नाही. कारण ज्या वेळेस प्रवेश सर्वांना मुक्त होता तेव्हा मानवाने तेथील सौंदर्याचे आपल्या कृत्यांनी वाटोळे केले. आता तर म्हणे ' keep the Himalayas clean ' अशी मोहीम सुरू झालीय. कारण खिळे ठोकून दोर लावणाऱ्या व लाथा मारणाऱ्या अनेक भारतीय व पाश्चात्य पर्यटक-गिर्यारोहकांनी आपल्या स्मृती घाणीच्या-अस्वच्छतेच्या राशीमागे ठेवून जतन केल्या आहेत. छान– म्हणजे सुरुवातीसच होत्याचे नव्हते करायचे आणि पुन्हा सांभाळण्यासाठी नवनिर्मितीसाठी ५-१० वर्षे वाट पहायची.

समाजाचे मानसशास्त्र काही और असते. ऑपरेशन ब्लू स्टारचा वार्षिक पूर्तीप्रसंगी खवळलेले सरदारजी म्हणे बद्रिनारायणचे मंदीर उडवून देण्याच्या योजनेत आहेत, अशी आम्ही तेथे असताना उठलेली एक अफवा ! त्यात मध्यमवर्गीय मनोवृत्तीच्या यात्रेकरूंनी व भोळ्या-भाबड्या पहाडी जनतेने भरीस घातलेल्या मीठ-मसाल्याची फोडणी, मग तर काय विचारायलाच नको ! वाटेत एक-दोन ठिकाणी बसची नाममात्र तपासणी झाली. मंदिराच्या आसपास व वाटेत मात्र बऱ्यापैकी सख्येने पोलिसाचे जवान आहेत. पटनासाहिब, हुजूरसाहिब, हेमकुंडसाहिब सोडून देऊन–वगळून काय खलिस्तान करणार आहात, असा प्रश्न उग्रवादींना विचारायला हवा. हा सर्वच देश शीख-खलिस्तानी-शिख्यधारी-कडवा-एकनिष्ठ व गुरू गोविंदसिंहासारखा ' सिंह ' करून टाका म्हणावं !

## ता. क. १४ जून १९८५

पंतप्रधान राजीव गांधी वॉशिंग्टनमधील नॅशनल प्रेस क्लबच्या रात्रीच्या मुलाखतीत म्हणत आहेत– 'महाराजा रणजितसिंह यांच्या साम्राज्याची राजधानी लाहोर होती, हे येथे बसलेल्या काही शीख मित्रांना मी स्मरणात आणून देऊ इच्छितो!' अमेरिकेतील ३०० रेडिओ केंद्र १८० दूरदर्शन उपकेंद्रे व सर्व भारतभर ही पत्रकार परिषद व मुलाखत live दाखवण्यात आली आहे!

## रविवार, २ जून १९८५

बद्रिनारायण येथील थंडी बोचरी आहे, ती हाडापर्यंत जाऊन भिडते! बद्रिनारायण मंदिराच्या आजूबाजूस बर्फाचे पहाड नाहीत पण लांबवरून येणारे वारे मात्र बर्फाच्या पहाडांची सोबत घेऊन येतात. नर व नारायण पर्वतांच्या कुशीत हे मंदीर वसलेले, मागेच नीळकंठ पर्वतही दिसतो. मंदिराबाहेर थंडगार पाण्याची अलकनंदा नदी व मंदिराजवळच तप्त पाण्याचे स्नानासाठीचे कुंड. केदारनाथ ही शिवाची भूमी तर बद्रिनारायण विष्णूचे स्थान; पण दोघेही एकाच हिमालयात वास करतात. पण हे न समजलेले पोथीनिष्ठ शैव-वैष्णव आडव्या-उभ्या गंधाच्या मारामाऱ्या आयुष्यभर करीत राहिले. पुन्हा विवेकानंदांनीच त्यांना सुनावले!

केदारनाथ मंदिरात अगदी मूर्तीपर्यंत–गाभाऱ्यात जाऊन जनतेस दर्शन घेण्याची सोय आहे. येथे मात्र काही अंतरावरूनच दर्शन घेऊ दिले जाते. आम्ही मंदिरात असताना गढवाल व कुमाव रेजिमेंटचे १००–१५० जवान ,अधिकारी मंदिरात दर्शनास येऊन गटागटाने परतत होते. बद्रिनारायणनंतर माना हे भारतीय हद्दीतले शेवटचे गाव. त्या पलिकडे आणखी ३०–४० कि. मी. ही भारतीय प्रदेश-पूर्णपणे सैन्याच्या अधिपत्याखाली असलेला व मग भिडणारी चीनची सरहद्द आहे. माना येथे भारतीय सैन्याची मोठी छावणी आहे.

बद्रिनारायणजवळच व्यास गुहा, गणेश गुहा, भीमकुंड व भीमपूल ही आणखी पौराणिक कथांशी संबंधित ठिकाणे आम्ही दुपारी बघतो आहोत. मानापासून काही अंतर चालून गेल्यावर पर्वतातील एक गुंफा जेथे व्यासांनी महाभारत सांगितले व साक्षात् गणपतीने ज्याचे लेखन केले त्या जागा या गुहांमध्ये दाखवतात. स्वर्गाकडे जाण्याच्या मार्गात पांडव व अर्थातच भीम जेथे येऊन गेले, त्या जागा भीमकुंड येथे दाखवतात. पांडव कोठे कोठे भटकून आले कोण जाणे!

गेले आठ-दहा दिवस दिसणारी गढवाली माणसे-मुले-स्त्रिया यांचा चेहरामोहरा पूर्वांचलातील आसाम-नागालॅंड-मणिपूरमधील मुले-स्त्रिया यांच्यासारखाच. त्यांच्याशी पुष्कळ मिळता-जुळता असा वाटतो. अगदी घरांची बांधणी, पाठीवर सामान वाहून नेण्याच्या पिशव्या, स्त्रियांचे दागिने याबाबतही साम्य दिसते.

पण एक महत्त्वाचा जाणवण्याइतका फरक म्हणजे इथल्या स्त्रियांच्या कपाळावर ठसठशीत कुंकू आहे, केसांमध्येही कुंकू भरले आहे, पुरुषांच्याही कपाळावर गंधाचा तिलक आहे पूर्वांचलात मात्र याची जागा येशूच्या ताईताने सर्वत्र घेतली आहे. हा सर्व पहाडी प्रदेश येशूभक्तांच्या तावडीतून वाचला हे आश्चर्यच म्हणावे लागेल. कदाचित गंगोत्री यमुनोत्रीसारख्या मंदिरांमुळे या वनवासियांना पहाडवासियांना बांधून ठेवले गेले असावे. तसेच पाहिले तर अरुणाचलातील परशुरामकुंड, कामरूपचे कामाक्षी मंदीर, मणिपुरी वैष्णवधारा याही गोष्टी पूर्वांचलातील सात भगिनींना अन्य देशवासियांसाठी बांधून ठेवणाऱ्या होत्याच; पण आम्ही त्या पुरेशा सजकपणे सांभाळल्या नाहीत, बळकट केल्या नाहीत आणि ब्रिटिशधर्जिण्या पाद्र्यांनी या फटी अचूक हेरल्या व आता त्यामुळे केवढे मोठे प्रश्न निर्माण झाले आहेत. १९४७ नंतर जवळपास चाळीस वर्षे होऊनही या प्रश्नांची गाठ सोडविता आलेली नाही. निष्कर्ष एकच, समाजजीवन–देशजीवन जोडणारे, सांभाळणारे, टिकवणारे दुवे आम्ही हरवून बसलो, दुर्लक्षिले, त्यांची प्रसंगी उपेक्षा व हेटाळणी केली व त्याची फळे आज भोगतो आहोत

## ३ जून ते ७ जून

गंगोत्री-यमुनोत्री–बद्रिनारायण-केदारनाथ या चारही तीर्थक्षेत्रांची यात्रा व प्रवास कालच पूर्ण झाला आहे. ऋषिकेश-हरिद्वारमार्गे परतीचा प्रवास दिल्लीपर्यंतही आज झाला. परतीच्या प्रवासातही आश्चर्यकारकरित्या 'झेलम' वेळेवर आहे.

१४ मे ते ०७ जून–साधारण दक्षिण-उत्तर असा ४–६ हजार कि. मी. चा प्रवास पूर्ण झाला. प्रवासातील असंख्य व्यक्ती, कानावर पडलेल्या भाषा, मंदिरे, पाहिलेल्या नद्या-पर्वतरांगा एकापाठोपाठ एक डोळ्यांसमोरून सरकत आहेत. कालडी ते केदारनाथ, अगस्त्यकुटम् ते अगस्त्यमुनी, कन्याकुमारी ते गौरीकुंड अशीही त्यातील सलग सूत्रेही हळूहळू भावता आहेत. जसा जसा जास्त प्रवास करावा तसतसे हा देश जोडणारे अनेक मुलायम दुवे सापडत आहेत. गेल्या महिन्यातील प्रवासानंतर असे आणखी मूल्यवान धागे सापडले आहेत. त्यांची जपणूक ,वर्धन आता करायला हवे! □




## रंगभूमी

# रंगभूमीवरील शब्द कोणाचा ?

वि. भा. देशपांडे

रंगभूमीच्या संदर्भात अनेक वाद अनेक वर्षे चाललेले आहेत. त्यातल्या काहींची उत्तरे माहीत असूनही किंवा नेमकी सांगता येत नसूनही त्यावर सतत बोलणे चालू असते. असावे लागते. त्यात गैर काहीच नाही. असाच एक सनातन वाद म्हणजे 'रंगभूमीवरील शब्द कोणाचा ?' निमित्त होते अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या वार्षिक सोहळ्याचे. मुंबईच्या साहित्य संघ मंदिरात हा चर्चेचा आणि काहीसा भांडणाचा कार्यक्रम अतिशय मनोरंजक पण विचार करायला लावणारा असा झाला.

या रंगतदार सनातन भांडणाचे सूत्रधार होते प्रा. भालबा केळकर. त्यांच्याशी वाद करण्यासाठी, भांडण रंगवण्यासाठी साथीला होते बाळ कोल्हटकर, चित्तरंजन कोल्हटकर, जयंत सावरकर, कीर्ती शिलेदार, सुहास जोशी, वि. भा. देशपांडे आणि नंतर सहभागी झाले प्रभाकर पणशीकर, कमलाकर सोनटक्के.

वास्तविक नाट्यनिर्मितीची प्रक्रिया ही सर्वांनाच स्थूलमानाने माहीत असते. नाटककार नाटक लिहितो. ती संहिता दिग्दर्शकाकडे येते. कलाकार तंत्रज्ञांच्या साह्याने ती प्रयोगरूपाने सिद्ध होऊन प्रेक्षकांपर्यंत पोहोचते. इतका सरळ, सोपा वाटणारा असा हा प्रवास. यात वाद होण्याचे कारणच काय ? असा प्रश्न मनात येऊन जातोच. पण नाटक ही अशी विचित्र आणि गमतीदार गोष्ट आहे की, ती कोणा एकामुळे उभी राहू शकत नाही. ती सामूहिक कला असल्याने प्रत्येक घटकाचा सहभाग आपापल्या परीने असतोच. नाटककाराने मूळ शब्द किंवा संहिता लिहिल्याशिवाय पुढे काहीच घडू शकत नाही ही सर्वमान्य गोष्ट आहे. मग नाटककाराचा शब्द हाच प्रमाणभूत मानून सारे व्हायला पाहिजे. इथेच वाद मिटायला हवा. प्रश्न येतो तो नाटकाच्या यशापयशानंतर. नाटक चालले तर कोणामुळे आणि पडले तर कोणामुळे ? याची चिकित्सा किंवा चिरफाड सुरू झाली की अनेक प्रश्न निर्माण होतात.

नाटककाराचा लिखित शब्द हा तर महत्त्वाचा आहेच; पण या लिखित शब्दाला जेव्हा रंगरूप येऊ लागते किंवा तो उच्चाराच्या स्तरावर जातो तेव्हा त्याच्या अर्थाच्या छटा बदलू शकतात. त्यामुळे नवा आशय निर्माण होण्याची शक्यता असते. दुसऱ्या पद्धतीने सांगायचे तर नाटककाराच्या लिखित शब्दाला जे जिवंतपण येते, मूर्तपण येते ते कलाकाराच्या उच्चारीत शब्दांमुळे, त्याच्या अभिनय कौशल्यामुळे. दिग्दर्शक दोन शब्दांमधला, दोन ओळींमधला अर्थबोध घेत असतो आणि अलिप्तपणाने ती संहिता दृश्यरूपात कशी येईल यासाठी प्रयत्नशील असतो. म्हणजे आपापल्या पद्धतीने प्रत्येकाचे योगदान प्रयोगरूपात असावेच लागते. केवळ नाटककाराचा शब्द मोठा असून चालत नाही. तो शब्द अर्थवाही, आशयघन असायलाच हवा. तो तितक्या ताकदीने पेश करण्याची क्षमता नट-दिग्दर्शकादी मंडळींमध्ये असायलाही हवी. अन्यथा मूळ लिखित शब्द उत्तम आहे, तो केवळ पुस्तकातच राहील. त्या शब्दांचे–संहितेचे रंगमंचीय रूप कसे होते हेही तितकेच महत्त्वाचे ठरते.

हे आणि असे अनेक मुद्दे या चर्चेत येत राहिले; पण शेवटी प्रत्येक क्षेत्रातील कलाकाराचा एक विशिष्ट दृष्टिकोन असतो, कधी अहंकार असतो, तर कधी वादासाठी वाद करण्याची तयारीही असते. तसे या चर्चेत काही वेळेला घडले. बाळ कोल्हटकर म्हणत होते की, 'रंगभूमीवरचा शब्द नाटककाराचासुद्धा नसतो. ईश्वरी शक्ती त्याला प्रेरणा देते आणि त्याच्या हातून लेखन होते. त्यामुळे तो शब्द त्याचा ( परमेश्वराचा ) असतो. आता असे म्हटल्यावर सारेच वाद निकालात निघतात. सर्व श्रेय ईश्वरावर सोपवले की, माणसाच्या कर्तृत्वाचा विचार बाजूलाच ठेवायला पाहिजे. बाळासाहेबांचे म्हणणे परमार्थानेच घ्यायला हवे. प्रभाकर पणशीकरांचे महत्त्व मान्य करून त्यांनी आग्रहाने सांगितले की, रंगभूमीवरील शब्द हा नटाचाच असतो. त्याच्या म्हणण्याचा मतितार्थ असा की, नाटककाराच्या शब्दांना सजीव करण्याचे काम नटच करीत असतो. याच पद्धतीचा विचार चित्तरंजन कोल्हटकर यांनीही मांडला.

यातला वादाचा मुद्दा होता तो म्हणजे नाटककाराच्या लिखित शब्दाला जेव्हा उच्चारीत शब्दाने एक रूप प्राप्त होते तेव्हा मूळच्या शब्दात नटाने किती आणि कसा बदल करावा ? नटाने फेरबदलाची सवलत किती घ्यावी ? व्यावसायिक रंगभूमीवर हे प्रश्न नेहमीच विवाद्य झालेले आहेत. याच्यातच एक प्रश्न अंतर्भूत आहे. दिग्दर्शकाने दिग्दर्शित केलेले नाटक किती प्रयोगांपर्यंत त्याचे राहिलेले असते ? ज्या वेळी एखाद्या नाटकाचे प्रयोग शेकड्यांनी होत असतात, त्यावेळी मूळच्या संहितेतील, तसेच दिग्दर्शनातील झालेल्या बदलांबाबत नाटककाराची, दिग्दर्शकाची भूमिका काय राहते ? ते प्रयोग थांबवतात का ? ह्या आणि अशा प्रश्नांची उत्तरे व्यवसायातल्या मंडळींना परिचित आहेत. आपण लिहिलेल्या शब्दांनुसार आपले नाटक चाललेले नाही असे लक्षात आल्यावर ( काही अपवाद वगळल्यास ) कोणीही नाटककार नाटक थांबवीत नाही. दिग्दर्शक जरी नाटक थांबवू शकत नसला तरी तसे जाहीरपणाने बोलत

नाही. कारण कलात्मकतेची तात्त्विक चर्चा आणि व्यवहार ही विचित्र गोष्ट असते. अनेकदा व्यवहारच सांभाळला जातो. तोच बलवान असतो.

विनोदी भूमिका करणाऱ्या नटांवर मूळ शब्द बदलाचे आरोप नेहमीच केले जातात. त्यात अनेकदा तथ्यही असते. त्यातले अनुभव जयंत सावरकर, बाळ कोल्हटकर यांनी सागितले. तर संगीत नाटकाच्या संदर्भात काय काय घडते ते कीर्ती शिलेदारने खुमासदार पद्धतीने सांगितले. सुहास जोशीनेही आपले काही अनुभव कथन केले. असा हा न संपणारा, सनातन असणारा वाद किंवा लटके भांडण सर्वच मंडळींनी रंगवले. पण ते नंतर गंभीर झाले. त्यामुळे अनेकजण अंतर्मुख झाले असतील. काहींच्या विचाराला चालना मिळाली असेल !

याशिवाय 'आमचं हे असंच' या शीर्षकाखाली सुरेश खरे यांनी ज्याची 'अर्धांगी' रंगभूमी क्षेत्रात काम करतात त्यांच्या 'ह्यांची' मुलाखत घेतली. यामध्ये मनोहर वागळे, ( मनोरमा वागळे), सुभाष जोशी, ( सुहास जोशी ) आणि दामू केंकरे (ललिता केंकरे ) ही नवरेमंडळी होती. अशा प्रश्नोत्तरांचा तपशील लिहिणे अवघड असते, त्या मुळातच ऐकण्यासारख्या असतात. तशीच ही प्रश्नोत्तरे झकास झाली.

संध्याकाळी शबाना आझमी यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. रात्री गडकऱ्यांच्या नाटकांवर आधारीत दोन कार्यक्रम झाले. १४ जूनला होणारा हा सोहळा एक छोटेसे संम्मेलनच असते. दिवसात अनेक कलाकारांनी आपली हजेरी लावल्याने सोहळ्यात चैतन्य जाणवत होते. □

चित्रपट

# ठराविक वळणाची प्रेमकथा 'मुहब्बत'

'हम पांच', 'बेजुबान', 'वो सात दिन' अशी चित्रे देणाऱ्या दिग्दर्शक बापूचा 'मुहब्बत' हा ताजा चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला आहे. आपल्या या आधीच्या चित्रपटात चौकटीत राहूनच काही तरी वेगळं द्यायचा प्रयत्न या दिग्दर्शकानं केला होता. त्यामुळे इतर दक्षिणी दिग्दर्शकांपेक्षा बापूचं वेगळं स्थान आहे. पण 'मुहब्बत' मध्ये मात्र त्यांना ते साधलेलं नाही. त्यामुळं अनिल कपूर आणि विजयता पंडितसारखे ताजे चेहरे हाताशी असूनही हा चित्रपट कटाळवाणाच बनला आहे.

हिंदी चित्रपटात सूडकथा आणि प्रेमकथा या दोन कथाप्रकारांची भरपूर चलती आहे. पैकी या चित्रपटात प्रेमकथा आहे हे वेगळं सांगायला नकोच. आता चित्रपटातल्या नायक–नायिकांचं प्रेम हे कधीही सुरळीतपणे यशस्वी होत नाही. यात खलनायक किंवा नायक–नायिकेचे वडील असे अडथळे आलेच (त्याशिवाय चित्रपट पूर्ण लांबीचा होणार कसा ? ) असे अडथळे 'मुहब्बत'मधल्या नायक – नायिकेच्या नशिबीही अर्थातच आहेत.

रूपा ( विजयता पंडित) ही गावातली एक भोली–भाली तरुणी. आपलं लग्न पटकन जमू दे एवढीच देवाजवळ प्रार्थना करणारी. त्याचं कारण काय तर तिच्या मैत्रिणीचं लग्न लवकर न जमल्यानं तिला जो बोलणी ऐकून घ्यावी लागत असतात ती ऐकायची रूपाची इच्छा नसते. तिची इच्छा पूर्ण होते. आणि शेजारच्या गावातल्या शेखरशी (अनिल कपूर) तिचं रीतसर लग्न ठरतं. पण पुढं शेखरच्या आईने (शुभा खोटे) अवाजवी हुंडा मागितल्यानं आणि तो देणं रूपाच्या वडिलांना, चौधरींना (अमरीश पुरी) शक्य नसल्यानं ते मोडतंही.

पण एवढं सगळं होईपर्यंत रूपा आणि शेखर एकमेकांच्या प्रेमात पडलेले असतात. शेखर चौधरींना आर्थिक मदत देऊ करतो. ते तो नाकारतात. दुसरा मार्ग न उरल्याने रूपा आणि शेखर पळून जाऊन लग्न करायचं ठरवतात. ठरलेल्या वेळेस रूपा येते पण शेखर घराच्या कुंपणात सोडलेल्या विजेचा धक्का बसून बेशुद्ध पडतो. त्यामुळं येऊ शकत नाही.

रूपा घरी परत येते. पण तोपर्यंत ती घरातून गेल्याचं सगळ्यांनाच कळलेलं असतं. तिला घरातच कोंडून ठेवण्यात येतं. काही दिवसांनंतर शेखर परत येतो. पण त्याच्या सांगण्यावर कोणीच विश्वास ठेवत नाही. फक्त गावातल्या गामा पहिलवानाला (अमजदखान) तो सांगतो ते खरं आहे हे माहित असते. तो शेखरला आपल्या घरात ठेवून घेतो. चौधरी रूपाचं लग्न आत्मारामशी (शक्ती कपूर) ठरवतात. पण शेवटी रूपाची आई (अरुणा इराणी) हे लग्न होऊ देत नाही. तिनं चित्रपटात शेवटी दिलेल्या भल्या मोठ्या लेक्चरमुळं चौधरींचं मतपरिवर्तन होऊन ते रूपा आणि शेखरचं लग्न लावून देतात.

'मुहब्बत'च्या कथेत काहीही नावीन्य नाही. सुरुवातीला नायिकेचा निरागसपणा दाखवताना 'उपहार' मधले काही तुकडे उचलल्यासारखे वाटतात. हुंड्याचा प्रश्न वगैरेचोही फोडणी देण्याचाही प्रयत्न उगीचच केला आहे. चौधरींचा रूपा शेखरच्या लग्नाला असलेला विरोध पुढंपुढं फारच ताणल्यासारखा वाटतो.

बापू यांचं दिग्दर्शक म्हणून अस्तित्व चित्रपटात कुठेही जाणवत नाही. चित्रपटाचा गंभीर परिणाम जो पूर्वार्धात आहे तो उत्तरार्धात घालवून टाकला आहे. अनिल कपूर, अमजदखान यांचं दारूच्या नशेतलं



विजयता–पुन्हा एकदा

गाणं, शक्ती कपूरची वाह्यात बडबड, विजयताची रडारड यामुळ नतरनतर हास्यास्पद आणि कंटाळवाणा वाटतो. इतर दक्षिणी दिग्दर्शकांप्रमाणं स्वप्नदृश्य आणि नायक–नायिकेला फुलांच्या राशीवर बसून गाणं म्हणवण्याचा मोह बापूनाही इथं आवरलेला नाही चित्रपटाचा नायक हा छोटया गावात रहाणारा. पण चित्रपटभर तो अत्यत आधुनिक कपडयात वावरतो. ही विसगती दिग्दर्शकाच्या लक्षात आली नसेल असं कस म्हणणार ?

चित्रपटाचं सवादलेखन गुलजारचं आहे. पण हे सागूनसुद्धा खर वाटत नाही. गुलजारला करण्यासारख फारसं काही नसल्यामुळच असेल पण ' गुलजार टच ' या संवादात कुठंही जाणवत नाही. ' दुनिया की कोई भी ताकद-अशा पद्धतीचे सवाद सर्रास आहेत. शेवटी रूपाची आई चौधरीना सुनावते तेव्हाच तिचं बोलणं मात्र प्रभावी आहे.

आज काल दोन हिंदी चित्रपटांमागं एका चित्रपटाला बप्पी लाहिरीच सगीत असतं. ' मुहब्बत ' मध्येही तो संगीतकार आहे पण बराच आटोक्यात आहे. चित्रपटाच पार्श्वसंगीत चांगलं आहे. शिवाय किशोरकुमारच्या आवाजातलं ' सासोसे नही कदमोसे नही मुहब्बतसे चलती है दुनिया ' आणि लताच्या आवाजातलं ' नैना ये बरसे, मिलनेको तरसे' ही गाणी त्यान चक्क सुश्राव्य दिली आहेत.

शेखरचं काम अनिल कपूरनं केलं आहे. त्याची अभिनयक्षमता लक्षात घेतली तर या भूमिकेत त्याला आव्हानात्मक अस काहीच नाही. गाणी, मारामाऱ्या आणि दोन–चार भावनात्मक प्रसग हे सगळ त्यानं नीट निभावलं आहे. ' लव्ह स्टोरी ' च्या यशानंतर पडद्यावरून गायब झालेली विजयेता इथ परत नायिकेच्या भूमिकेत दिसते. सबघ चित्रपटात तिला रडण्याशिवाय फारस काही करण्यासारख नाही. सुरुवातीच्या दाखवण्याच्या प्रसंगापासून ती जे रडायला सुरुवात करते ते चित्रपट सपेपर्यंत सुरूच रहातं. चित्रपटात वयानं ती लहान दिसत असली, तरी निरागस मात्र बिलकुल वाटत वाटत नाही.

गामा पहिलवानाच्या भूमिकेत अमजदखाननं आणि चौधरीच्या भूमिकेत अमरीश पुरीनं चागले रग भरले आहेत. संपूर्ण चित्रपटात या दोघाच्याच भूमिका अधिक लक्षात रहातात. त्याच्या अभिनयातली सहजता उल्लेखनीय.

अरूणा इराणीनं नायिकेच्या आईचं काम केलंय. चित्रपटात तिला फारसा वाव नाही. पण नवऱ्याच्या धाकाखाली दबलेली आणि शेवटी मुलीवरचा अन्याय पाहून चिडून उठलेली स्त्री तिनं चांगली दाखवली आहे. शक्ती कपूरचा विनोदी पद्धतीचा खलनायक बघून आता प्रेक्षकांना कटाळा आला असला तरी त्याला मात्र त्याच त्या भूमिका करायचा कटाळा आला नसावा. म्हणूनच इथंही वाह्यात बडबड करणारा मूर्ख खलनायक त्यान परत एकदा रगवलेला दिसतो.

—सीमा कुलकर्णी

## सप्रेम नमस्कार : पृष्ठ १ वरून

आमच्यासारख्या वाचकमित्रांना साद घाला पण ' माणूस ' आहे त्याच स्वरूपात चालत रहायला हवाय. ' स्वधर्मे निधनम् श्रेय: ' हे मी का सांगायला हव ?

' माणूस 'ला– माझ्या लाडक्या मित्राला– त्याच्या २५ व्या वाढदिवसानिमित्त माझ्या मनस्वी शुभेच्छा !

९ जून अप्पा सलागरे
पाग–चिपळूण

¤ ' पंचविसाव्या वर्षारंभानिमित्त ' आपण एक आवाहन केले आहे. (१ जून अकात) त्या सदर्भात थोडेसे. माझ्यासारखा वाचक सा. माणूसकडे समग्र, साधार, सकस लेख देणारे साप्ताहिक म्हणून पाहतो. व्यावसायिक पद्धतीचा अवलब म्हणजे अधिक जाहिराती मिळवणे असा असू द्यावा. आजच्या स्वरूपात छायाचित्रांची भर पडू द्यावी. रगीत पारदर्शिका देणे शक्य झाल्यास चांगलेच पण मजकुराची विविधता व समग्रता कायम रहावी. चित्रपट व गॉसिप यांना आपण स्थान देणार नाही. (अवाजवी) यात शंकाच नाही. आहे तो दर्जा टिकवून अधिक आकर्षक करावा. बद अजिबात करू नये. ' ठेव योजना ' अंमलात आणता येईल का ? अधिक जाहिरात करणे शक्य होईल का ? पंचवीस वर्षांच्या अनुभवामुळे, वाचक, लेखक संपर्कामुळे आपल्याला आलेला अनुभव वाचकांच्या फायद्याचा व्हावा.

११ जून चंद्रशेखर राजे
डोंबिवली

¤ माणूसच्या पचविसाव्या वर्षातल्या पदार्पणाबद्दल मन:पूर्वक शुभेच्छा. माणूसने आपले मूळचे प्रबोधनाचे ध्येय न सोडता सध्याच्या टि. व्ही. युगात आपले स्थान टिकवले आहे. ते नुसते मतपत्र राहिले नाही हे विशेष उल्लेखनीय.

यंदाच्या वर्धापनदिनाच्या वेळी गेल्या वर्षीच्या वासंतिक अंकांची आठवण आली. माणूसचे जुने अक मला जागेच्या अडचणीमुळे रद्दीत काढावे लागत असले तरी माणूसचे दिवाळी अक आणि हे ५ वासतिक अक जपून ठेवले आहेत.

एकात्मता व हिंदुस्थान यावरचे आपले विचार (८ जून अक) फारच मौलिक आणि मननीय आहेत. म्हणूनच आपले ' निर्माणपर्व ' वाचण्याची उत्सुकता निर्माण झाली आहे.

पचविसाव्या वर्षात पदार्पण करताना लिहिलेल्या आपल्या निवेदनात कुठे तरी निराशा डोकावते. नव्या सकल्पाचा उल्लेख टाळलात तरी दि. ८ जूनच्या अकातील टवटवीत विशेषाकाची घोषणा वाचून बरे वाटले. त्याची वाट पहातोय.

१४ जून मंगेश नाबर
मुंबई

¤ आपण निरनिराळे प्रयोग करीत पण प्रबोधनाचे, विधायकतेचे ध्येय ठेवून 'माणूस' साप्ताहिक अव्याहतपणे २५ वर्षे चालवीत आहात. बघता बघता त्याला २४ वर्षे झाली व २५ व्या वर्षात पदार्पण केले म्हणून प्रथम आपले व माणूस परिवाराचे हार्दिक अभिनदन करतो

या वर्षारंभानिमित्त आपण एक प्रकट निवेदन दिले आहे. माणूसला चाकोरीबद्ध व्यावसायिक रूप येऊ दिलेले नाही, हे त्याचे वैशिष्टय आहे. त्यामुळेच आणीबाणीतही आपण ठसा उमटवू शकला त्यामुळे आहे त्याच स्वरूपात यापुढेही तो प्रसिद्ध करावा असे वाटते मराठीमध्ये प्रबोधन करणारी, विधायकतेला प्रसिद्धी देणारी व वाचकांना समष्टीबद्दल जागे करणारी नियतकालिके जवळजवळ नाहीतच. अगदी अपवादात्मक काही आहेत. त्यामुळे ' माणूस ' बंद करणे योग्य होणार नाही. ती एक गरज आहे

डॉ. कार्व्हर, आयडा स्कडर, योद्धा शेतकरी, धुळ्याची अबरसिंग महाराजांची चळवळ, भूमिपुत्र अशा अनेक अपूर्व धनपेटया आपण वाचकासमोर उघडया केल्यात. तेव्हा आहे त्याच स्वरूपात माणूस चालू ठेवावा ही विनंती.

९ जून मोरेश्वर दाते
नातेपुते, जि. सोलापूर

# माणूस तरुण–तरुणी विशेषांकात....

- कर्तबगार तरुण-तरुणींची ओळख—लहान वय मोठे पद —**गिरीश प्रभुणे**
- आपल्या वयाचे प्रश्न मांडणारा तरुण मुला-मुलींचा पुण्यातला नवा छोटा ग्रुप —**अनुभव**
- एका संपादकाचे तरुणपणातले अनुभव —**विद्या बाळ**
- ' जनरेशन गॅप ' की ' जनरेशन टक्कर ' याबद्दल —**मंगला गोडबोले**
- स्वतंत्र जाहिरात संस्था चालवणाऱ्या एका तरुण व्यावसायिकाचं मनोगत —**शुभदा रानडे**
- मुला-मुलींना आकर्षित करणारं नवं चमकदार क्षेत्र मॉडेलिंग —**ललिता बर्वे**
- ट्रेकिंगचे हळुवार आणि थरारक क्षण —**अस्मिता दीक्षित, अभय कुलकर्णी**
- एका तरुणानं आपल्या मित्र-मैत्रिणींबद्दल केलेलं मुक्त चिंतन— चेहरे बोलतात, डोळे बोलतात —**विनय हर्डीकर**
- मराठी प्रकाशन व्यवसायाचा स्तर उंचावणारं एक नवं धाडसी प्रकाशन—त्याचा चकित करणारा निसर्ग कोषाचा पहिला खंड— याबद्दल तरुण प्रकाशक— विवेक परांजपे यांच्या मुलाखतीवर आधारित विशेष लेख —**मेधा राजहंस**
- जाहिरात व्यवसायातल्या नव्या वेगवान संस्कृतीची ओळख करून देणारी नवी, संपूर्ण कादंबरी—शार्पएज—**राजेंद्र बर्वे**

आणि

कथा—**विनया खडपेकर**

कविता— **नारायण कुलकर्णी, कवठेकर, रवींद्र लाखे, राजन रत्नाकर, भारती बिर्जे, हेमंत जोगळेकर.**

व्यंगचित्रं—**विजय पराडकर**

**एक संपूर्ण कादंबरी आणि तरुण–तरुणींच्या मनांचा, आकांक्षांचा वेध घेणारं भरघोस साहित्य**

## फक्त आठ रुपयात

**जुलै तिसऱ्या आठवड्यात प्रसिद्ध होणार**

या:विशेषांकामुळे ' माणूस 'चे नेहमीचे साप्ताहिकाचे अंक जुलै महिन्यात प्रसिद्ध होणार नाहीत याची वाचकांनी–विक्रेत्यांनी कृपया नोंद घ्यावी.

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No–11 ) Regd. No. PNCW–28


# राजहंसची दोन नवीन प्रकाशने

मराठी माणसाला "नाटक" हा आणखी एक अवयव विधात्याने बहाल केला आहे. असे अनेक कलावंत आहेत की आपली वहिवाटीची वाट सोडून नाटकाच्या बिकट वाटेकडे वळले आहेत. म्हणूनच आपली मराठी रंगभूमी एक वेगळाच घाट घेऊन मानाने मिरवीत आहे. रंगभूमीच्या या हृद्य आठवणी अगत्याने सांगण्याचा हेतु इतकाच की, आजच्या पिढीला आपल्या पूर्वसुरींची ओळख व्हावी, आठवण रहावी नि त्यांच्याबद्दल सदैव कृतज्ञता वाटावी.

साप्ताहिक माणूस मधील
गाजलेल्या लेखमालेचा संग्रह

## नाट्यपंढरी

गो. रा. जोशी

किंमत वीस रुपये

---

## ऊर्जा प्रश्न

### आशा उद्याच्या

प्रि. खं. कुलकर्णी

किंमत पंचवीस रुपये

श्री. कुलकर्णी यांनी या पुस्तकात ऊर्जेच्या प्रश्नासंबंधी माहिती, आपल्या देशाच्या संदर्भात दिली आहे आणि तिच्या वापरासंबंधी सर्वांची जबाबदारी काय आहे याविषयी चांगले विचार मांडले आहेत. निरंतर मिळणाऱ्या ऊर्जेच्या उपयोगासाठी माणसाचे काय प्रयत्न चालू आहेत आणि भावी काळात त्यांची दिशा काय राहील याचेही चांगले दर्शन मिळते. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही सर्व शास्त्रीय माहिती व आकडेवारी, किचकट न करता, सुलभ भाषेत सांगितली आहे. विद्यार्थ्यांना आणि सर्वसामान्य वाचकांना, ऊर्जेची आजची समस्या, त्याची कारणे आणि त्यावरील उपाय याविषयी सोपी परंतु मूलभूत माहिती या पुस्तकाद्वारे होईल, असे वाटते.

वि. ग. भिडे
कुलगुरु
पुणे विद्यापीठ

---

## राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११ ०३० फोन : ४४ ३४ ५०

C/o श्री. वा. र. गोडे ८१, भवानी शंकर रोड, चितळे पथ कॉर्नर जोशी वाडी, दादर (प.) मुंबई ४०० ०२८ फोन : ४२ २५ ४५५